

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १० एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १५२ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com



**आजचा सामना**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु वि. दिल्ली कॅपिटल्स्

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरु


## विचारपुष्प



इतरांच्या मदतीची अपेक्षा करणे व तशी याचना करणे, हे शुद्ध दुर्बलतेचे चिन्ह आहे. हे आपल्या सर्व वागणुकीत स्पष्टपणे व्यक्त होत आहे. म्हणून, स्वयंसेवक बंधूंनो, अगदी निर्भय वृत्तीने 'हिन्दूंचा हिन्दुस्थान' ही घोषणा करा. आपल्या मनाचा कमकुवतपणा सर्वस्वी नष्ट करा. परकीयांनी या देशात राहू नये, असे आमचे म्हणणे नाही. परंतु, त्यांना या गोष्टीची सदैव जाणीव असावयास पाहिजे की ते हिन्दूंच्या हिन्दुस्थानात राहत आहेत. हिन्दूंच्या अधिकारावर त्यांना अतिक्रमण करता येणार नाही. आपल्या देशात परके लोक शिरजोर होणार नाहीत, अशी परिस्थिती आपण उत्पन्न केली पाहिजे.

**- डॉ. केशव बळीराम हेडगेवार**

रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक



आज भगवान महावीर यांची जयंती

# सलग दुसऱ्यांदा व्याजदरात कपात

## गृह कर्जदारांना दिलासा, घराचे हप्ते होणार कमी

## रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीचा निर्णय

**◆ मुंबई, ९ एप्रिल**

**अमेरिकेच्या नुकसानकारक शुल्काच्या पुढील दबावाला तोंड देत अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने बुधवारी सलग दुसऱ्यांदा व्याजदरात कपात केली आणि आणखी सवलती देण्याचे संकेत दिले. व्याज दरातील कपातीमुळे गृह कर्जदारांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. गृह कर्जाचे हप्ते कमी होऊ शकतात.**

तीन केंद्रीय बँक सदस्य आणि समान संख्येने बाह्य सदस्यांचा समावेश असलेल्या चलनविषयक धोरण समितीने पुनखरेदी आणि रेपो दर २५ बेसिस पॉइंटने कमी करून ६ टक्के करण्याचा निर्णय एकमताने घेतला. फेब्रुवारीमध्येही रिझर्व्ह बँकेने समान प्रमाणात दर कमी केले होते. ले २०२० नंतरची ती पहिलीच कपात होती. महागाई कमी होत असताना आणि तेलाच्या किमतीत घट होत असताना, या निर्णयामुळे कर्ज घेण्याचा खर्च नोव्हेंबर २०२२ नंतरच्या सर्वांत कमी पातळीवर आला आहे.



पतधोरण समितीच्या निर्णयांची घोषणा करताना गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितले की, रिझर्व्ह बँकेने आपला धोरणात्मक दृष्टिकोन 'तटस्थ'वरून 'समाधानकारक'वर बदलला आहे, ज्यामुळे भविष्यात आणकी व्याजदर कपात होण्याच शक्यता दिसून येते. अमेरिकेत निर्यात होणाऱ्या भारतीय वस्तूंवर २६ टक्के अतिरिक्त शुल्क लागू झाले, त्या दिवशीच ही दर कपात करण्यात आली.

अमेरिकेच्या आयात शुल्कामुळे अनिश्चितता वाढत आहे. काही अर्थतज्ज्ञांनी १ एप्रिलपासून सुरू झालेल्या चालू आर्थिक वर्षात भारतीय जीडीपी वाढीवर २०-४० बेसिस पॉइंटचा ताण येण्याचा अंदाज वर्तवला आहे. (वृत्तसंस्था)

### आर्थिक वाटीचा अंदाज घटवला

₹ रिझर्व्ह बँकेने २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी आर्थिक वाढीचा अंदाज ६.७ टक्क्यांवरून ६.५ टक्क्यांपर्यंत कमी केला. महागाईचा अंदाजही ४.२ टक्क्यांवरून ४ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला, ज्यामुळे तो २-६ टक्क्यांच्या लक्ष्य मर्यादित राहिला. ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाथ भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ६.५ टक्क्यांनी वाढला, जो महामारीनंतरचा सर्वांत कमकुवत वेग आहे.

### महागाईचा दर चार टक्के राहणार

% चांगले कृषी उत्पादन आणि कच्च्या तेलाच्या घसरत्या किमती लक्षात घेऊन रिझर्व्ह बँकेने बुधवारी चालू आर्थिक वर्षासाठी महागाईचा अंदाज ४.२ टक्क्यांवरून ४ टक्क्यांपर्यंत कमी केला.



व्यापार शुल्काशी संबंधित उपाययोजनांमुळे सर्व क्षेत्रांतील आर्थिक परिस्थिती कमकुवत झाली आहे. यामुळे जागतिक वाढ आणि चलनवाढीसाठी नवीन अडचणींचा धोका निर्माण झाला आहे. जागतिक अनिश्चिततेमुळे व्यापारी मालाच्या निर्यातीवर ताण येईल, तर सेवा निर्यात लवचिक राहण्याची अपेक्षा आहे. जागतिक व्यापारातील व्यत्ययांमुळे निर्माण होणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीमुळे घसरणीचे धोके निर्माण होत आहेत.

**संजय मल्होत्रा,**
भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर

### ठळक वैशिष्ट्ये

- सलग दुसऱ्यांदा कमी झालेल्या प्रमुख व्याजदरात (रेपो) २५ बेसिस पॉइंटसनी घटवून ६ टक्के केला.
- सहा सदस्यीय पतधोरण समितीचे रेपो दर कमी करण्यासाठी एकमत.
- आर्थिक दृष्टिकोन अनुकूलतेत बदलला, म्हणजेच पतधोरण समिती दोन पर्यायांचा विचार करेल. तो म्हणजे यथास्थिती किंवा दरकपात
- आर्थिक वर्ष २०२६ साठी जीडीपी वाढीचा अंदाज ६.७ वरून ६.५ टक्क्यांपर्यंत कमी केला.
- शाश्वत विकास आणि दरांमध्ये स्थैर्य या दोन उद्दिष्टांकडे भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिर वाटचाल.
- व्यापार शुल्काशी संबंधित उपाययोजनांमुळे सर्व प्रदेशांमधील आर्थिक दृष्टिकोनावर अनिश्चितता वाढली.
- व्यक्ती ते व्यक्ती व्यापारी पेमेंटसाठी यूपीआय व्यवहार मर्यादा वाढवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने एनपीसीआयला परवानगी दिली.
- सोन्याच्या दागिन्यांवर कर्ज देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांचा आढावा घेण्याचा रिझर्व्ह बँकेचा प्रस्ताव.
- मध्यवर्ती बँकेने सह-कर्ज देण्याची व्याप्ती वाढवण्याचा आणि सामान्य नियामक चौकट जारी करण्याचा प्रस्ताव दिला आहे.

# तहव्वूर राणाचे विमान भारताच्या दिशेने

## अजित डोवाल यांच्या निगराणीत 'मोहीम'

**◆ वॉशिंग्टन, ९ एप्रिल**

मुंबईवर झालेल्या भीषण २६/११ हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा अखेर भारताच्या ताब्यात आला आहे. भारताने तब्बल १७ वर्षांपासून त्याच्या प्रत्यार्पणासाठी केलेल्या प्रयत्नांना अखेर यश आले. प्रत्यार्पण कराराच्या अंतर्गत अमेरिकेने त्याला राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएच्या हवाली केले. अमेरिकेत पाठवण्यात आलेले विशेष विमान त्याला घेऊन बुधवारी भारताच्या दिशेने रवाना झाले आहे.

तहव्वूर राणाला घेऊन निघालेले विमान अज्ञात ठिकाणावर काही वेळ थांबेल. त्यानंतर ते भारताच्या दिशेने उड्डाण करेल. ते बुधवारी रात्री उशिरा किंवा गुरुवारी सकाळी भारतात पोहोचेल, अशी माहिती सूत्रांनी दिली. भारतात आल्यावर तहव्वूर राणाला सर्वप्रथम राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएच्या न्यायालयात हजर केले जाईल. त्याची कोठडी घेतल्यावर अधिकारी कसून चौकशी करतील.

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल खुद्द तहव्वूर राणाला भारतात आणण्याच्या मोहिमेवर नजर ठेवून आहेत. तहव्वूरला भारतात आणण्यापूर्वी दिल्लीतील एनआयए कार्यालयाच्या बाहेरची सुरक्षा वाढवण्यात आली. दिल्ली आणि मुंबईत तहव्वूर राणासाठी तुरुंगाची कोठडीही सज्ज ठेवण्यात आली, अशी माहिती सूत्रांनी दिली.




### हल्ल्याच्या पाच दिवस आधी काढला पळ

हल्ल्यापूर्वी तहव्वूर राणा दुबईमार्गे भारतात आला होता. ११ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर २००८ या कालावधीत तो पवईतील हॉटेल रिनैसा येथे थांबला होता. या कालावधीत त्याने हल्ल्याशी संबंधित ठिकाणे आणि व्यवस्थेचा आढावा घेतला. त्याने हल्ल्याच्या पाच दिवसांपूर्वी मुंबईतून पळ काढला होता.

सर्वांत पहिले एनआयए तहव्वूर राणाची चौकशी करणार असून, त्यानंतर मुंबई पोलिसांना ही संधी दिली जाणार आहे, असे सूत्रांनी सांगितले. पाकिस्तानातील १० अतिरेक्यांनी मुंबईवरील केलेल्या हल्ल्याशी संबंधित अनेक रहस्य त्याच्या चौकशीतून समोर येणार आहेत. जगासमोर पाकिस्तानचा बुरखा फाडण्यासही यामुळे मदत मिळेल. तहव्वूर राणा मूळ पाकिस्तानी आणि कॅनडाचा नागरिक असून, तो लष्कर-ए-तोयबाचा सक्रिय सदस्यही आहे. (वृत्तसंस्था)

# नौदलाला मिळणार २६ राफेल विमाने

## सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीची मंजुरी

**◆ नवी दिल्ली, ९ एप्रिल**

विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांतवर तैनात करण्यासाठी जवळपास ६४ हजार कोटी रुपयांच्या निधीतून फ्रान्स सरकारकडून २६ नौदल राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या प्रस्तावाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीने बुधवारी मंजुरी दिली, अशी माहिती संरक्षण विभागातील सूत्रांनी दिली.

भारत आणि फ्रान्समधील आंतरसरकारी चौकटीच्या अंतर्गत कंत्राटावर स्वाक्षरी झाल्यानंतर जवळपास पाच वर्षांनी भारताला राफेल विमानांची खेप मिळणे सुरू होईल. राफेल विमानांच्या चाचण्या आणि चर्चांच्या मालिकेनंतर संरक्षण मंत्रालयाने जुलै २०२३ मध्ये या मोठ्या खरेदीसाठी प्रारंभिक मान्यता दिली होती.

या सौद्यानुसार, भारतीय नौदलाला राफेल मरीन जेट उत्पादक दसॉँ एव्हिएशनकडून शस्त्रास्त्र प्राणी व सुट्या भागांसह संबंधित सहाय्यक उपकरणेही मिळणार आहेत. भारतीय



वायुदलाने उड्डाणास सज्ज असलेली ३६ राफेल विमाने घेतली होती. राफेल लढाऊ विमानाच्या दोन स्क्वाड्रन उभारण्याचा विचार भारतीय वायुदल करीत आहे. मागील काही वर्षांत भारत आणि फ्रान्समधील संरक्षण संबंध बळकट झाले आहेत.

भारत आणि फ्रान्सने जुलै २०२३ मध्ये हेलिकॉप्टर इंजिनच्या संयुक्त विकासासह अनेक महत्त्वपूर्ण संरक्षण सहकार्य प्रकल्पांची घोषणा केली. दोन्ही धोरणात्मक भागीदारांनी तिसऱ्या देशांना लाभ देण्यासाठी प्रगत संरक्षण तंत्रज्ञानाच्या सह-विकास आणि सह-उत्पादनात सहकार्य करण्याची वचनबद्धता व्यक्त केली होती.

संरक्षण मंत्रालयाने भारताच्या नौदलाच्या कौशल्याला आणखी बळकटी देण्यासाठी तीन स्कॉर्पिन पाणबुड्या खरेदी करण्याच्या प्रस्तावाला सुमारे दोन वर्षांपूर्वी मंजुरी दिली होती. मात्र, याला अद्याप सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीने मंजुरी दिलेली नाही. भारतीय नौदलाया प्रोजेक्ट-७५ अंतर्गत फ्रान्सच्या नौदल गटाच्या सहकार्याने माझगाव डॉक लि. द्वारे भारतात सहा स्कॉर्पिन पाणबुड्या आधीच आणल्या गेल्या आहेत. (वृत्तसंस्था)

### रेल्वेच्या दोन पायाभूत प्रकल्पांना मान्यता

रेल्वेगाड्यांतील गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने केंद्रीय मंत्रिमंडळाने दोन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी दिली, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. पंजाब आणि हरयाणामध्ये १८१७.३१ कोटी रुपयांच्या १९.२ किमी लांबीच्या सहा पदरी प्रवेश नियंत्रित झिरकपूर बायपासच्या बांधकामाला मंजुरी देण्यात आली. आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूमध्ये १-४ किमी लांबीच्या तिरुपती-पकला-कटपाडी या एकाच रेल्वे मार्गाच्या दुपदरीकरणालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. याचा एकूण खर्च १,३३२ कोटी रुपये असल्याचे वैष्णव यांनी सांगितले.

## भारतात दररोज सरासरी ५२ गर्भवतींचा मृत्यू

**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्रांनी गर्भधारणेदरम्यान आणि प्रसूतीदरम्यान महिलांच्या मृत्यूंबद्दल एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. जगात दर २ मिनिटांनी एक महिला गर्भधारणा किंवा प्रसूतीशी संबंधित समस्यांमुळे मृत्युमुखी पडत असल्याचे सांगण्यात आले. अहवालानुसार, २०२३ मध्ये भारतात सुमारे १९ हजार गर्भवती महिलांचा मृत्यू झाला. याचा अर्थ दररोज सरासरी ५२ महिला आपला जीव गमावत आहेत. हे प्रमाण जगात गर्भधारणेदरम्यान होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी ७.२ टक्के आहे. या यादीत भारत नायजेरियानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. या अहवालात पाकिस्तानमध्ये होणाऱ्या मृत्यूंचा डेटा देखील समाविष्ट करण्यात आला आहे. २०२३ मध्ये पाकिस्तानमध्ये ११ हजार मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे. याचा अर्थ दररोज सरासरी ३० मृत्यू होतात. आकडेवारीनुसार, नायजेरियामध्ये ७५,000 महिलांचा मृत्यू झाला. हे जगातील गर्भवती महिलांच्या एकूण मृत्यूंपैकी २८.७ टक्के आहे



अहमदाबाद येथे अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या सत्रादरम्यान काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्याशी ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा केली

# महाराष्ट्र-हरयाणा निवडणुकीत घोटाळा

## मल्लिकार्जुन खडगेंनी पुन्हा आळवला मतपत्रिकेचा राग

**◆ अहमदाबाद, ९ एप्रिल**

इव्हीएमच्या विश्वासाहर्तेवर प्रश्न उपस्थित करीत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी बुधवारी भाजपाने महाराष्ट्र व हरयाणा विधानसभा निवडणूक घोटाळा करून जिंकल्याचा आरोप केला तसेच देशातील निवडणुका पुन्हा मतपत्रिकेवर घेण्यात याव्या, असा राग पुन्हा आळवला आहे.

येथील साबरमती नदीच्या काठावर सुरू असलेल्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या सत्राला ते संबोधित करीत होते. केंद्रातील भाजपा सरकार पद्धतशीरपणे लोकशाही संस्था उद्ध्वस्त करीत आहे आणि काही भांडवलदारांना फायदा मिळून देण्यासाठी देशाची संपत्ती विकत आहे, असा आरोप खडगे यांनी केला.

गुजरातमध्ये अखिल भारतीय काँग्रेस समितीची ही ६४ वर्षांनी प्रथमच बैठक होते आहे. यापूर्वी १९६१ मध्ये पक्षाची बैठक झाली होती. संपूर्ण जग इव्हीएमकडून मतपत्रिकेकडे चालले असताना आपण मात्र इव्हीएमचा वापर करीत आहोत. हा एक घोटाळा आहे. केवळ सत्ताधाऱ्यांना फायदा होतो आणि विरोधकांना तोटा, असे तंत्र तुम्ही काढले आहे, अशी टीका खडगे यांनी केली. त्यानंतर खडगे यांनी महाराष्ट्र आणि हरयाणा विधानसभा निवडणुकीच्या निकालाबद्दल आपल्या पक्षाच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. काँग्रेसने अद्याप या राज्यांमध्ये पराभव स्वीकारलेला नाही आणि निवडणूक प्रक्रियेत घोटाळा झाला असल्याचा दावा केला आहे. महाराष्ट्रात काय झाले? हा मुद्दा आम्ही सर्वत्र उपस्थित करीत आहोत, असे खडगे म्हणाले. (वृत्तसंस्था)

# धनंजय, करुणा मुंडे यांचे संबंध विवाहासारखेच

## करुणा मुंडेंना पोटगीचा अधिकार : न्यायालय

**मुंबई, ९ एप्रिल-**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांचे त्यांची पहिली पत्नी असल्याचा दावा करणाऱ्या महिलेशी असलेले संबंध प्रथमदर्शनी 'विवाहाच्या स्वरूपाचे' आहेत व घरगुती हिंसाचार कायद्याअंतर्गत तिला पोटगी मिळण्याचा अधिकार आहे, असे येथील सत्र न्यायालयाने म्हटले आहे.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश शेख अकबर शेख जाफर यांनी शनिवारी दिलेल्या आदेशात महाराष्ट्राच्या माजी मंत्र्यांनी दंडाधिकाऱ्यांच्या अंतरिम भरणपोषणाच्या आदेशाविरुद्ध केलेली अपील फेटाळून लावली. आपला कधीही अर्जदार करुणा मुंडे यांच्याशी विवाह झाला नव्हता, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते धनंजय मुंडे यांनी आपल्या अपीलात केला होता. ती कायदेशीररित्या विवाहित पत्नी आहे की नाही, हे योग्य मंचाने ठरवावे. न्यायालयाने म्हटले आहे. परंतु माजी राज्यमंत्री धनंजय मुंडे यांचे संबंध विवाहाच्या स्वरूपाचे आहेत, कारण तिने आपल्या दोन मुलांना जन्म दिला आहे व ते 'सामायिक घरात राहिल्याशिवाय शक्य नाही'. एका प्रसिद्ध राजकीय व्यक्तीची जीवनशैली लक्षात घेता दंडाधिकाऱ्यांनी करुणा मुंडे यांना अंतरिम भरणपोषण देणे योग्य असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्याने उपभोगलेल्या जीवनशैलीचाच अधिकार करुणा मुंडे आणि त्यांच्या मुलांना आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. करुणा मुंडे यांना भरणपोषण देण्याचे निर्देश देणाऱ्या अंतरिम आदेशाविरुद्ध राजकारण्याचे अपील न्यायालयाने फेटाळून लावले. ४ फेब्रुवारी रोजी, वांद्रे दंडाधिकारी न्यायालयाने करुणा मुंडे यांची अंतरिम याचिका अंशतः मान्य केली आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदाराने महिलेला दरमाह १ लराख २५ हजार रुपये व त्यांच्या मुलांना दरमहा ७५ हजार रुपये अंतरिम भरणपोषण म्हणून देण्याचे निर्देश दिले. महिलेने २0२0 मध्ये धनंजय मुंडे यांच्याविरुद्ध घरगुती हिंसाचाराचा खटला दाखल केला होता व दंडाधिकारी न्यायालयाने अद्याप मुख्य याचिकेवर निर्णय दिलेला नाही. माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी अंतरिम आदेशाविरुद्ध सत्र न्यायालयात अपील दाखल केले होते.



# ट्रम्प औषधांवर आयात शुल्क लावण्याच्या तयारीत

## जगाला आणखी एक धक्का देणार

**◆ वॉशिंग्टन, ९ एप्रिल**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरू केलेल्या टॅरिफ (आयात शुल्क) वॉरमुळे जगभरातील अनेक देशांचे शेअर बाजार गडगडले आहेत. ट्रम्प विविध देशांवर आयात शुल्क लावून थांबले नाहीत. आता त्यांनी फार्मा उत्पादनावर (औषधे आणि वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित इतर उत्पादने) मोठे टॅरिफ लावणार असल्याची घोषणा केली आहे. ट्रम्प यांच्या या घोषणेने अनेक देशांचे धाबे दणाणले आहेत.

नॅशनल रिपब्लिकल काँग्रेसनल कमिटीच्या एका बैठकीला संबोधित करताना डोनाल्ड ट्रम्प यांनी औषध उत्पादनांवरील टॅरिफबाबतचे वक्तव्य केले. (वृत्तसंस्था)

## पंतप्रधान मोदींना 'व्हिक्टरी डे परेड'साठी रशियाचे निमंत्रण

**◆ मॉस्को, ९ एप्रिल**

जागतिक युद्धात जर्मनीच्या विरोधात मिळवलेल्या विजयाच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त ९ मे रोजी होणाऱ्या परेडसाठी रशियाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण पाठवले आहे, अशी माहिती रशियाचे उप परराष्ट्र व्यवहार मंत्री ॲन्ड्रयू रुडेन्को यांनी दिली.

९ मे रोजी होणाऱ्या परेडसाठी रशिया भारताचे पंतप्रधान येतील अशी अपेक्षा करीत आहे. याबाबतचे निमंत्रण अगोदरच पाठवण्यात आले. त्यांच्या रशिया भेटीवर काम केले जात आहे, असे रुडेन्को यांनी सांगितल्याचे वृत्त सरकारी तास या वृत्तसंस्थेने दिले आहे.

आम्ही त्यावर काम करीत आहोत. हे याच वर्षी होईल. त्यांना निमंत्रण देण्यात आले, असे रुडेन्को यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# अरबी समुद्राखालून धावणार मुंबई-दुबई हायस्पीड ट्रेन!



**नॅशनल ॲडव्हायझर ब्युरो लिमिटेडची योजना**

| ताशी १००० किमी वेग | दोन तासांचा प्रवास | १.२ अब्ज डॉलर्सचा खर्च |
|---|---|---|

**◆ नवी दिल्ली, ९ एप्रिल**

बांधकाम क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करून भारताने मोठी मजल मारली असून याचा प्रत्यय कोलकाता येथील हुगळी नदीखाली बांधण्यात आलेल्या पाण्याखालील मेट्रो प्रकल्पातून दिसून आला. हावडा आणि एस्प्लेनेडला जोडणारा हा देशातील पहिला भूमिगत मेट्रो बोगदा उभारून भारताने जगाला आश्चर्यचकीत केले. यातच आता मुंबई ते दुबई अरबी समुद्राखालून धावणाऱ्या हायस्पीड ट्रेन सुरू करण्याची योजना आखण्यात आली आहे. ही योजना प्रत्यक्षात आल्यास दोन तासातच मुंबई ते दुबईचा प्रवास शक्य होईल.

मुंबई आणि दुबई दरम्यान अरबी समुद्राद्वारे दोन्ही देशांना जोडणाऱ्या पाण्याखालील हायस्पीड ट्रेन प्रकल्पावर नॅशनल ॲडव्हायझर ब्युरो लिमिटेडकडून काम सुरू आहे. ही ट्रेन ताशी १००० किमी वेगाने धावेल आणि केवळ २ तासांत मुंबई येथून दुबईला पोहोचता येईल. हा प्रकल्प अद्याप सुरुवातीच्या टप्प्यात आहे, परंतु जर तो यशस्वी झाला तर देन्ही देशांच्या व्यवसाय, पर्यटन आणि आर्थिक सहकार्याला चालना मिळेल.

प्रस्तावित अरबी समुद्रातील रेल्वे प्रकल्प भारत आणि संयुक्त अरब अमिरात यांच्यात एक क्रांतिकारी कनेक्टिव्हिटी स्थापित करेल. यासाठी १.२ अब्ज डॉलर्सचा संभाव्य खर्च येणार आहे. जर हा प्रकल्प यशस्वी झाला तर दोन्ही देशांमधील व्यापार, पर्यटन आणि आर्थिक संधींना नवी दिशा मिळू शकेल. विशेष असे की, भारताने यापूर्वीच पाण्याखालून मेट्रो प्रकल्प उभारण्यात यश मिळवले असल्याने मुंबई-दुबई समुद्र मार्गे धावणारी ट्रेन प्रत्यक्षात येणे सहज शक्य आहे. (वृत्तसंस्था)

### मॅग्लेव्ह तंत्रज्ञानाचा वापर

या रेल्वे प्रकल्पात मॅग्लेव्ह तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल, ज्यामुळे ट्रेन चुंबकीय शक्तीच्या मदतीने घर्षणाशिवाय ताशी १००० किमी वेगाने धावेल. याचा अर्थ असा की मुंबई ते दुबई हा प्रवास फक्त २ तासांत पूर्ण होईल. सध्या विमानाने हा प्रवास २-३ तासांत पूर्ण होतो. हे तंत्रज्ञान जपान आणि चीनमध्ये आधीच यशस्वीरित्या अंमलात आणले गेले आहे.

### व्यापार, गुंतवणुकीला चालना

मुंबई ते दुबई पाण्याखालून धावणारी रेल्वे केवळ प्रवासाचे साधन राहणार नाही तर दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्य आणि व्यापारालाही चालना देईल. या प्रकल्पावर काम करणारी कंपनी नॅशनल ॲडव्हायझर ब्युरो लिमिटेड क्रांतिकारी कल्पनांसाठी ओळखली जाते. जर हा प्रकल्प यशस्वी झाला, तर भारत आणि दुबईमधील प्रवास सोपा होईलच, शिवाय जगभरात हाय स्पीड प्रवासाचे एक नवीन युग सुरू होऊ शकते.

### कसा असणार पाण्याखालील रेल्वे प्रकल्प

या प्रकल्पानुसार, मुंबई आणि दुबई एका अतिजलद तरंगत्या ट्रेनने जोडले जातील, जी अरबी समुद्राखालून धावेल. या प्रकल्पाचे उद्दिष्ट दुबईतील फुजैराह ते भारतातील मुंबई यांना जोडणे आहे. यामध्ये तेल पुरवठा आणि पाणीपुरवठा यासारख्या प्रमुख व्यावसायिक उद्देशांचा देखील समावेश आहे.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करा

## आयुक्त ओम्बासे यांचे आदेश; डॉ. आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.९ एप्रिल-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने महापालिकेच्या वतीने मिरवणूक मार्गावरील रस्त्यावरील खड्डे बुजवणे, विद्युत दिवे चालू स्थितीत ठेवणे, आवश्यक त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात हॅलोजन लावणे, रस्त्यावरील अडथळा येणाऱ्या झाडांच्या फांद्या काढून टाकणे, मिरवणूक मार्गावरील रस्त्यांची साफसफाईसह विविध सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अधिकाऱ्यांना दिले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आज कॉन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात यावेळी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त किरणकुमार मोरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती उत्सव समितीचे विश्वस्त राजाभाऊ सरवदे, राजाभाऊ इंगळे, सुबोध वाघमोडे, के. डी. कांबळे, ॲड. संजीव सदाफुले, अरूण भालेराव, अजित गायकवाड, पृथ्वीजित सरवदे, सुशील सरवदे, शिवम सोनकांबळे, नागेश रणखांबे, शिवम सोनकांबळे, बापू सदाफुले, राजा कदम, प्रमीला तुपलवंडे, प्रबूध्द दोड्यानूर, बापू शिवशरण आदींसह प्रमुख मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. १४ ते २० एप्रिल दरम्यान शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचा सप्ताह साजरा केला जातो. या दरम्यान शहरातील पाणीपुरवठा सुरळीत असावा. सार्वजनिक ठिकाणी असलेले लाइट्स चालू ठेवावेत आणि २० एप्रिल रोजी निघणाऱ्या सांगता मिरवणुकीच्या मार्गात अडथळा निर्माण करणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडून घेणे, केबल वायर काढणे, निवडणूक मार्गावरील स्वच्छता ठेवणे.

याशिवाय मिरवणुकीच्या मार्गावर पालिकेची एक रुग्णवाहिका आणि अग्निक्षमन दलाचे एक पथक तैनात करावे आदी मागण्यां डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती उत्सव समितीच्या विश्वस्तानी केल्या. यावेळी महापालिकेच्या वतीने मिरवणूक मार्गावरील रस्त्यावरील खड्डे बुजवणे, विद्युत दिवे चालू स्थितीत ठेवणे, आवश्यक त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात हॅलोजन लावणे, मिरवणूक मार्गावरील रस्त्यावरील अडथळा येणाऱ्या झाडांच्या फांद्या काढून टाकणे, मिरवणूक मार्गावरील रस्त्यांची साफसफाई करून जंतुनाशक फवारणी करणे इत्यादी सोइ सुविधा महापालिकेच्या वतीने करण्यात येईल तसेच मिरवणूक मार्ग वरील कामे करण्या संदर्भात आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

## महत्त्वाचे...



### पक्ष्यांसाठी जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूरतर्फे अक्कलकोट रोडलगत पाणपोई

**सोलापूर दि. ९ एप्रिल-**
ऐन कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पक्ष्यांना पाणी मिळावे यासाठी जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूरतर्फे अक्कलकोट रोडलगत लक्ष्मी कार सर्व्हिसिंग व जीवा टेक्सटाईल्स परिसरातील अनेक झाडांवर ठिकठिकाणी प्लास्टिकची जलपात्रे लटकवून पाण्याची सोय करण्यात आली आहे. या जलपात्रांमध्ये दिवसभरात वेळोवेळी पाणी टाकण्याचे काळजी घेतली जात आहे. यावेळी परिसरातील कामगारांना व जायंट्स सदस्यांना मोफत ५० प्लास्टिक जलपात्र वाटप करण्यात आले. त्यांना तसेच नागरिकांना आपापल्या घरासमोरील झाडांवर व भिंतीवर हे पात्र ठेवून दररोज पक्ष्यांसाठी पाण्याची सोय करावी, असे आवाहन जायंट्स ग्रुपतर्फे करण्यात आले आहे. याप्रसंगी जायंट्स फेडरेशन २ बी डायरेक्टर किसन आडम, फेडरेशन ऑफिसर श्रीनिवास कोंडले, माजी प्रेसिडेंट नागनाथ कोंडा, सचिव हरिनिवास सोमा, मदनमोहन बुर्गुल, अंबादास येरवा, लक्ष्मी कार सर्व्हिसिंगचे मालक नागनाथ चौगुले व कामगारवर्ग उपस्थित होते.



### महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली एनटीपीसीला भेट

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज एनटीपीसीच्या थर्मल प्लांटला भेट दिली. यावेळी एनटीपीसीचे महाप्रबंधक बीजेसी शास्त्री कार्यकारी संचालक यांनी आयुक्त यांचे स्वागत केले. प्रथम एनटीपीसीचे महाप्रबंधक यांनी या प्रकल्पासंदर्भात माहिती दिली. यावेळी बैठकीस अतिरिक्त आयुक्त रवि पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, एनटीपीसीचे के. एम बेबी, नवीन कुमार अरोरा, मनोरंजन सारंगी सर्वजनिक आरोग्य अभियंता व्यकटेश चौबे, रामचंद्र पेंटर, राहुल शिंदे, नागपूर येथील डीआरए कन्सल्टन्सीचे प्रतिनिधी मेहुल रानडे, रितेश रंगारी आदी उपस्थित होते. देगाव स्थित मलनिस्सारण केंद्रामध्ये प्रक्रिया करण्यात आलेले पाणी एनटीपीसीला पुरविण्यात आल्यानंतर पाण्याचा पुनर्वापर योग्य प्रकारे केला जाऊ शकतो. देगाव मध्ये मलनिसारण केंद्र येथे प्रक्रिया करण्यात आलेल्या पाण्याच्या बदल्यामध्ये एनटीपीसी द्वारे त्यांची ७२ एम एल डी क्षमतेची पाईपलाईन सोलापूर महानगरपालिकेत हस्तांतरित झाल्यास सोलापूर शहराची पाण्याची भविष्यातील पाण्याची गरज भागविण्यास मदत होईल. या सदर्भात चर्चा करण्यात आली. त्यानंतर सोलापूर महानगरपालिकेचे महात्मा गांधी प्राणी संग्रहालय मोठा असून या ठिकाणी प्राणी संग्रहालय सुरु करणायच्या दृष्टीने विविध कामे करण्यात येत आहे. छत्रपती संभाजी महाराज तलाव सुशोभीकरण करण्यात येत असून त्या ठिकाणी आपण एनटीपीसी थर्मल पावरकडून आपल्या सी.एस.आर फ़ंडातून सहकार्य करावे.



### छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी स्वामी यांच्याकडून लिंगराज कुटुंबीयांचे सांत्वन

**सोलापूर दि. ९ एप्रिल-**
जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे विवेक लिंगराज यांच्या निधनामुळे दुःखी असलेल्या लिंगराज कुटुंबीयांचे सांत्वन छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन केले. याप्रसंगी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन डॉ. शत्रुघ्नसिंह माने, संचालक श्रीशैल देशमुख, त्रिमुर्ती राऊत व लिंगराज कुटुंबीय उपस्थित होते.

### प्रभू रामचंद्राचा आदर्श प्रत्येकांनी अंगीकारायला हवा : औसेकर महाराज

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
प्रभूरामांच्या प्रत्येक गुणांचा आदर्श घेऊन ते दैनंदिन जीवनात अंगीकारायला हवा असे मत पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी व्यक्त केले. ते बाळीवेस येथील नामदेव शिंपी समाजाच्या राम मंदिरात किर्तनाप्रसंगी बोलत होते. निरुपणासाठी संत तुकारामाचा 'चंदनाचे हात पायही चंदन, सर्वांगी साखर अवघे गोड' घेतला होता. सदर मंदिरात गेल्या ५० वर्षापासून महाराज अष्टमीच्या दिवशी किर्तनाची सेवा देतात त्या बद्दल मंदिर समितीकडून समितीचे अध्यक्ष धनंजय जवंजाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रभू रामचंद्रानी पित्याची आज्ञा पाळली त्यासाठी आपल्या जीवनाचा त्याग केला आजच्या युवकांनी त्याच्या विचाराचे अनुकरण करण्याची आज आवश्यकता आहे असे ही महाराज म्हणाले. नाथसष्टीच्या अयोध्येतील उत्सवात प्रभू रामचंद्राच्या दरबारी चक्रिभजनाची सेवा केली त्याना समाधान वाटले शिवाय तेथील पुजारी वर्गाकडून विठ्ठल रूक्मिणी मंदिर येथील नित्योपचार पूजेची माहिती घेतली. शिवाय गुरुबाबा व माझ्या हस्ते प्रथमच प्रभू रामचंद्राच्या चरणावर तुलसी अर्चना पूजा करण्याचे भाग्य जगद्गुरूंच्या समवेत लाभले. शेवटी उर्मिलेच्या चरित्र विषयी कथन केले. यावेळी नामदेव जवंजाळ शिवराज नगरकर, तुळशीदास जवंजाळ, गुरुनाथ पतंगे, अनिकेत जवंजाळ, प्रकाश केकडे, कृष्णा रेळेकर, विजय उपरे, आदिनाथ उपरे, प्रकाश भडंगे, भागवत मानकुसकर, नामदेव उंडाळे आदिसह समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.जवंजाळ, प्रकाश केकडे, कृष्णा रेळेकर, विजय उपरे, आदिनाथ उपरे, प्रकाश भडंगे, भागवत मानकुसकर, नामदेव उंडाळे उपस्थित होते.

## शनिवारी श्री बिरोबा महालिंगरायाची यात्रा

**सोलापूर, दि.९ एप्रिल-**
लष्कर येथील श्री बिरोबा व महालिंगराया देवाचा यात्रा महोत्सव शनिवार दि. १२ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. या यात्रा महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती उत्सव समितीचे अध्यक्ष अमोल कारंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यात्रा महोत्सवानिमित्त अभिषेक महापूजा, पालखी सोहळा व पालखी भेट, ओव्या, वीर खेळणे, महाप्रसाद वाटप कार्यक्रम होणार आहेत. शनिवार दि. १२ एप्रिल रोजी लष्कर मंदिर परिसरात सायंकाळी ५.३० वाजता ते रात्री १०.३० वाजेपर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री जयकुमार गोरे हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. प्रणिती शिंदे, आ. देवेंद्र कोठे, माजी आ. रामहरी रुपनवर, राम सातपुते, भाजपाचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, माजी सभापती सुरेश पाटील उपस्थित राहणार आहेत. यावेळी सुनिल खटके, अण्णप्पा सत्तुबर, भारत कटारे, गुरुभाई कावडे, रमेश तरंगे, सदाशिव व्हनमाने, चंद्रकांत वाघमोडे, भगवान बनसोडे आदी उपस्थित होते.

## जुनी पोलीस लाईनमध्ये हनुमान जन्मोत्सवानिमित्त नामसप्ताह

**रविवारी कलश व वीणापूजनाने झाली सुरवात**

**शनिवारी काल्याच्या कीर्तनाने होणार सांगता**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.९ एप्रिल-**
येथील जुनी पोलीस लाईन मधील विठ्ठलरूक्मिणी मंदीरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त ६ ते ११ एप्रिल दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याची सुरवात रविवारी रामनवमीदिवशी सकाळी किरण पवार व मनोज जाधव यांच्या हस्ते कलश पूजनाने झाली. अनंतअप्पा कुलकर्णी यांच्या हस्ते वीणापूजन करण्यात आले. संतोष घाडगे व मनिष वाघमारे यांच्या हस्ते ध्वजपूजन तर अमोल पवार व अजय डोंगरे यांच्या ग्रंथपूजन करण्यात आले.

वै. हभप प्रकाश महाराज व्यवहारे व वै. विठ्ठल दांडगे यांच्या प्रेरणेने रामनवमीचे गुलालाचे कीर्तन हभप हरिभाऊ महाराज जावळे यांचे झाले. या नामसप्ताहात दररोज काकडा, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायम, गाथाभजन, पुराण कथा, हरिपाठ, व कीर्तन असे कार्यक्रम होत आहेत. हभप निळोबा महाराज शिरसट, हभप अच्युत महाराज मोफरे, हभप श्याम महाराज जोशी यांची कीर्तनसेवा झाली, हभप श्याम महाराज भोसले, हभप किरण महाराज बोधले, हभप मन्मथ महाराज बहिरमल यांची कीर्तनसेवा होणार आहे. शनिवारी हनुमान जन्मोत्सवाचे गुलालाचे कीर्तन पहाटे पाच वाजता अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकार महाराज इंगळे यांचे होणार आहे. तर शनिवारी सायंकाळी पाच वाजता विश्व हिंदू परिषेदेचे जिल्हाध्यक्ष हभप अभिमन्यू महाराज डोंगरे यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष हभप किसनबापू कापसे यांनी दिली. हरिभाऊ जावळे व अनंत महाराज ढेरे यांच्याकेड गाथाभजनाची जबाबदारी आहे. तर पारायणासाठी माऊली महाराज जरग व प्रकाश महाराज सावंत व्यासपीठ चालक आहेत. या नामसप्ताहात अविनाश शिंदे, वसंत येळे गुरूजी, संतोष घाडगे, प्रदिप जाधव, बाबूराव डोंगरे व वैभव दांडगे यांच्यवतीने उटीचा प्रसाद दिला जात आहे. तर किसन बापू कापसे, अनंत ढेरे, वसंत टेळे गुरूजी, सुरेश लामकाने, प्रकाश सावंत, चेदा वाघचौरे, नितीन पांढरे याच्यातर्फे दररोजची पंगत दिली जात आहे. काल्याचा प्रसाद अजय कुलकर्णी यांच्यावतीने वाटप होणार आहे.

## मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंग दर्शन सोहळा आजपासून सोलापुरात

**सोलापूर, दि.९ एप्रिल-**
वैदिक धर्म संस्थान व दि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. १० व ११ एप्रिल २०२५ रोजी सोलापुरात मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंगाचा दर्शन सोहळा आयोजित केला आहे, अशी माहिती या दोन्ही संस्थांचे राज्य समन्वयक लक्ष्मण भंडारी यांनी पत्रकार परिषदेत दिली. गुरुवार दि. १० एप्रिल रोजी अक्कलकोट रोड एमआयडीसीतील श्री महालक्ष्मी बेंक्विट्स येथे सायंकाळी ५ ते रात्री ८.३० यावेळेत मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंग दर्शनाचा सोहळा आयोजित केला आहे. याशिवाय शुक्रवार दि. ११ एप्रिल रोजी गांधीनगर येथील दि हेरिटेज सी लॉन येथे सायंकाळी ५ ते रात्री ८.३० वेळेत या ज्योतिर्लिंगाच्या दर्शनाची सोय करण्यात आली आहे. भावी काळात त्याची पुनःस्थापना गुजरात येथे करण्यापूर्वी गुरुदेवांनी हे ज्योतिर्लिंग भारतातील सर्व लोकांना दर्शनासाठी उपलब्ध केले आहे. या अंतर्गत सोलापूर येथे गुरुवार दि.१० व शुक्रवार दि. ११ एप्रिल रोजी या ज्योतिर्लिंगाच्या दर्शनाची सोय शहरवासीयांसाठी करण्यात आली आहे. यावेळी रुद्र पूजा देखील केली जाणार आहे. या सोहळ्यासाठी गुरुदेवांचे परमभक्त व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक दर्शक हाथी येणार आहेत. या दर्शनाचा सर्वांनी लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस जिल्हा समन्वयक अंबादास कोंकत्ती, पुरणचंद्र पुलगम, श्रीनिवास सादुल, डॉ. अंबादास गाजुल, राजू झुंजा आदी उपस्थित होते.

## 'त्या' मुलींच्या कुटुंबीयांना २५ लाखांची मदत करा

**माजी आ. नरसय्या आडम यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
मोदी येथील जगजीवनराम झोपडपट्टीतील डेंग्यूने मृत पावलेल्या दोन मुलींच्या कुटुंबीयांना महापालिकेने २५ लाखांचे मदत करावी, अशी आग्रही मागणी माजी आ. नरसय्या आडम यांनी मंगळवारी महापालिका आयुक्तांकडे केली.




माजी आ. आडम यांनी मंगळवारी महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेतली. जानेवारी २०२५ मध्ये महापालिका प्रशासनाने संपूर्ण सोलापूर शहराला एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते. वास्तविक पाहता आजमितीस शहरात ५ ते ७ दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. तसेच शहरातील विविध भागात गढूळ, दुषित, मैलामिश्रित, अस्वच्छ पाणी पुरवठा होत आहे. याची सखोल चौकशी व तपासणी करण्यात यावी. सोलापूर शहरात सुरळीत व एक - दोन दिवसाआड पाणी पुरवठा होण्यासाठी किमान दोन वर्षे लागतील.त्याचे नियोजन सुरू आहे असेही आयुक्तांनी स्पष्ट केले असल्याचे माजी आ. आडम यांनी सांगितले. याप्रसंगी शिष्टमंडळात ॲड. अनिल वासम, अमित मंचले, शंकर म्हेत्रे, मारेप्पा फंदीलोलू, शिमोन पोगुल, अजय भंडारी अशोक म्हेत्रे व मृतांचे कुटुंबीय आदींची उपस्थिती होती.

### दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवावा : आडम

बाबू जगजीवनराम झोपडपट्टी येथे दूषित पाणीपुरवठ्यामुळे दोन निष्पाप शाळकरी मुलींच्या दुर्दैवी निधनास कारणीभूत असणाऱ्या संबधित दोषींवर अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवावा. दुषित पाणी पिल्याने बाधित असलेल्या रुग्णांवर उपचार मोफत करावे, त्यांना कोणत्याही प्रकारचे आर्थिक तोशिष लागू होऊ देऊ नये, अशी मागणी ही याप्रसंगी माजी आ. नरसय्या आडम यांनी केली.

## पंचमुखी हनुमान; शनिवारी शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
भावनाऋषी पेठ, जुन्या वालचंद कॉलेजसमोर असलेल्या श्री पंचमुखी हनुमान देवस्थान येथे श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त रामनवमी पासून विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली आहे. या अंतर्गत हनुमान जयंती दिनी, शनिवार दि. १२ एप्रिल रोजी पंचधातूच्या हनुमान मूर्तीची रथातून शोभायात्रा काढण्यात येणार आहे.



हनुमान जयंतीनिमित्त राम नवमीपासून दररोज श्री पंचमुखी हनुमानाला एका विशेष अवताराने सजवण्यात येत आहे. ही अवतार सजावटसेवा हनुमान जन्मोत्सवापर्यंत चालणार आहे. शनिवार दि. १२ एप्रिल रोजी हनुमान जन्मोत्सवदिनी सकाळी ६ वाजता रंगीबेरंगी फुलांनी सजविलेल्या पाळण्यात जन्मोत्सव व नामकरण सोहळा साजरा केला जाणार आहे. सकाळी ७ वाजता गेल्या वर्षभरापासून दर शनिवारी व मंगळवारी सायंकाळी सामुहिक हनुमान चालीसा पठणात सहभागी होणाऱ्या भाविकांच्या वतीने एक हजार हनुमान भक्तांच्या उपस्थितीत सहस्र हनुमान चालिसा पठणाचे आयोजन केले आहे. सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिर व हनुमान दिव्यअस्त्र गदापूजन कार्यक्रमदेखील होणार आहे. सायंकाळी निघणाऱ्या शोभायात्रेत रथातून श्री पंचमुखी हनुमान उत्सव मूर्तीसह दाक्षिणात्य मंगलवाद्यम, उंट, घोडे, लहान मुलांचा लेझिम पथक,वानर सेना व देवतांच्या अवतारांतील चिमुकले सहभागी होणार आहेत.

उत्सव काळात दररोज पहाटे सुप्रभात, सुंदरकांड पठण, अभिषेक, जलकलशाभिषेक, अलंकार सेवा, महाआरती व दररोज सायंकाळी भक्तीगीत, भजन, विष्णू सहस्त्रनाम स्तोत्र, हनुमान चालीसा, वसंत कुंभाभिषेक, गीतरामायण, संगीतमय सुंदराकांड पारायण, सामुहिक हनुमान चालिसा पठणाचा महायज्ञासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हनुमान जन्मोत्सवाच्या पूर्व संध्येस शुक्रवारी विविध नद्यांना आवाहन करून जलाभिषेक व ६४ आयुर्वेदिक वनौषधी, विविध फळांचा रस व पंचामृताने वसंत कुंभाभिषेक होणार आहे.

जन्मोत्सवदिनी सायंकाळी निघणाऱ्या शोभायात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष राजमहेंद्र कमटम, सचिव सत्यनारायण गुर्रम यांनी केले आहे.

## सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**१४ एप्रिल पर्यंत संविधानाविषयी जनजागृती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय , विशेष सहाय्य विभाग व जिल्हा परिषदेच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ ते १४ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा समाजकल्याण अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त समाजकल्याण सुलोचना सोनवणे यांनी दिली.




शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती. अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी या उददेशाने दरवर्षी समता सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या निमित्ताने जिल्हा समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विस्तार अधिकारी एम.जी. म्हेत्रे, अधिक्षक सचिन सोनकांबळे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, राजश्री कांबळे यांचे सह कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्यात जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांचे मार्गदर्शनाखाली संमती पंधरवाडा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. भारतीय संविधानाची उददेशिका / प्रस्ताविका यांचे वाचन भारतीय जनतेत संविधानाविषयी जनजागृती निर्माण करण्यात येणार आहे. समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर, सर्व पंचायत समिती तसेच सर्व ग्रामपंचायती व शासकीय कार्यालये, शाळा, अनु. वसतीगृह दिव्यांग या ठिकाणी हे कार्यक्रम होणार आहेत. दि.९ एप्रिल रोजी जिल्हयातील सर्व शाळा, महाविदयालये शासकीय वसतीगृह येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघुनाटय स्पर्धा या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करणे. यामध्ये समाजकल्याण विभागाकडील विविध योजनांचा लाभ प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना वाटप करणे. जिल्हयातील सर्व महाविदयालये, शासकीय वसतीगृह या ठिकाणी हे कार्यक्रम होणार आहेत. १० एप्रिल रोजी तालुक्यांमध्ये मोठ्या ग्रामपंचायतीच्या ठिकाणी शाळा व महाविदयालये यांचे मार्फत पथनाट्य व लघुनाटिका याव्दारे सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांबाबत जनतेचे प्रबोधन करणे. सर्व पंचायत समिती तसेच सर्व ग्रामपंचायती, शाळा, अनुसूचित वसतीगृह या ठिकाणी होणार आहेत. ११ एप्रिल रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करणे तसेच म. फुले यांच्या सामाजिक कार्याविषयी वक्ता बोलवून कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. आंतरजातीय जोडप्यांचा सत्कार तसेच सलग १८ तास अभ्यास करणे उपक्रमाचे आयोजन केले आहे. पंचायत समिती, ग्रामपंचायती व जिल्हा परिषद सोलापूर, दिव्यांग शाळा, अनुसूचित वसतीगृह. कै. लक्ष्मी पाटील वसतीगृह, रंगभवन सोलापूर येथे होणार आहेत. १२ एप्रिल रोजी संविधान जागर- भारतीय संविधाना विषयी सर्वसाधारण माहिती देणे जसे की, संविधानाची निर्मिती, संविधान निर्मिती समिती, अनुच्छेद विशेषतः मुलभुत अधिकार व मुलभूत कर्तव्ये याविषयी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे कार्यक्रम पंचायत समिती ,ग्रामपंचायती, दिव्यांग शाळा, अनुसूचित वसतीगृह येथे होणार आहेत. दिनांक १३ एप्रिल रोजी जिल्हा परिषद अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबीर, मेळावा आयोजित करणे तसेच शाळा व महाविदयालये शासकीय वसतीगृहे रक्तदान शिबीराचे आयोजन करणे. स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने तालुक्याच्या सर्व ग्रामपंचायतीमधील अनु. जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये स्वच्छता अभियान राबविणेत येणार आहेत. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त व्याख्यान, भिमगीत गायनाचा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

### एक मे पर्यंत कार्यक्रम

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहनिमित्त जिल्ह्यात एक मे पर्यंत विविध कार्यक्रम सुरू राहणार आहेत. यावेळी संविधानाविषयी जनजागृतीवर भर देण्यात येणार असल्याचे सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# देशविघातक कारवाया करणाऱ्या संघटनांविरुद्धच विशेष जनसुरक्षा कायदा : मुख्यमंत्री फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ९ एप्रिल -**

महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला विशेष जनसुरक्षा कायदा हा देशांतर्गत सुरक्षेसाठी महत्त्वाचा आहे. या कायद्यामुळे पत्रकार किंवा कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीला कोणताही त्रास होणार नाही, त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा पोहोचणार नाही. हा कायदा व्यक्तींसाठी नसून देशविघातक कृत्ये करणाऱ्या संघटनांविरुद्ध असल्याची नि:संदिग्ध ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिली. मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेनंतर पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले.

विशेष जनसुरक्षा कायद्यासंदर्भात राज्यातील विविध पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींबरोबर आज मुख्यमंत्री फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृहात आयोजित बैठकीत चर्चा करून पत्रकारांच्या शंकांचे निरसन केले. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, माहिती व जनसंपर्क प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील यांच्यासह राज्यातील विविध पत्रकार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



प्रस्तावित महाराष्ट्र जनसुरक्षा कायद्यातील तरतुदीबद्दल पत्रकार संघटनांमध्ये काही शंका होत्या. १२ संघटनांनी एकत्र येत पत्रकार अभिव्यक्ती मंच स्थापन केला होता. या शंकांचे निरसन व्हावे व हा कायदा देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी किती उपयुक्त आहे, याची माहिती पत्रकारांना व्हावी, यासाठी आजच्या बैठकीत यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच पत्रकार संघटनांच्या शंकांवर मुख्यमंत्री महोदयांनी सविस्तर उत्तरे दिली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशात यापूर्वीच तेलंगणासह इतर चार राज्यांनी तसेच केंद्र शासनाने जनसुरक्षा कायदा केला आहे. या चार राज्यांपेक्षा महाराष्ट्र शासनाने केलेला कायदा हा अधिक संरक्षित आहे. अनेक माओवादी संघटनांना देशातील अनेक भागात बंदी आहे. त्यामुळे या संघटनांनी महाराष्ट्रात त्यांचे मुख्यालय हलविले आहे. माओवादी संघटनांच्या फ्रंटल ऑर्गनाझेशन हे आता शहरी भागात राहून कार्य करत आहेत. त्यामुळे आता जर हा कायदा केला नाही तर भविष्यात अनेक अडचणींना महाराष्ट्राला सामोरे जावे लागेल. या प्रस्तावित जनसुरक्षा कायद्यासंदर्भात जनतेमध्ये स्पष्टता यावी, यासाठी विधीमंडळात कायद्याचा प्रस्ताव मांडतानाच तो संयुक्त समितीकडे पाठवून त्याबद्दल जनसुनावणी घेण्याची भूमिका म ांडली. या प्रस्तावित कायद्यामध्ये पत्रकार संघटनांच्या काही सूचना असतील तर त्यावरही योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच कायद्यातील तरतुदीत स्पष्टता येण्यासाठी योग्य ती काळजी घेण्यात येईल,

एखाद्या संघटनेने देशाच्या सुरक्षेला बाधा येईल, असे बेकायदेशीरपणे कृत्य केल्यास किंवा माओवादी संघटनेची विचारधारा पुढे नेण्याचे कृत्य केल्यास अशा संघटनेविरुद्ध तीन न्यायाधीशांच्या सल्लागार समितीपुढे सुनावणी झाल्यानंतरच कारवाईची त्यात तरतूद आहे, त्यामुळे कोणतेही सरकार त्याचा दुरुपयोग करु शकत नाही. या समितीपुढे संघटनेचे कृत्य आंतरिक सुरक्षेविरुद्ध असल्याचे पोलिसांना सिद्ध करावे लागेल. ते सिद्ध झाले तरच त्या संघटनेविरुद्ध बंदी घालण्याची कारवाई होईल. त्यानंतरच कारवाईचे अधिकार प्राप्त होतील. हा कायदा कोणत्याही व्यक्तींविरुद्ध किंवा पत्रकारांविरुद्ध नाही, असे फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



## डॉ. आंबेडकर जयंती उत्सव महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची आयुक्तांसमवेत बैठक

**▶▶ पाणीपुरवठासह विविध समस्येबाबत झाली चर्चा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

सोलापूर शहरातील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्ताने बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महामंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या समवेत सोलापूर महानगरपालिका आयुक्त यांच्या दालनामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी विस्कळीत पाणीपुरवठासह विविध समस्येबाबत झाली चर्चा

या बैठकीत महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे व रवी पवार, विद्युत विभागाचे अधिकारी परदेशी यांची उपस्थिती होती. दि. १३ ते २० एप्रिल २०२५ या उत्सव कालावधीमध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या माध्यमातून स्वच्छता ठेवणे, पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, स्ट्रीट लाईट दुरुस्ती करणे ही कामे तातडीने हाती घेण्याबाबत तसेच सांगता मिरवणुकीच्या मार्गातील रस्त्यावरील खड्डे, दिवाबत्ती, महिलांसाठी व लहान मुलांसाठी जागोजागी बसण्याची सोय, पाणपोई, तातडीची ओ.पी.डी. सेवा त्यादिवशी होणारा पाणीपुरवठा सुरळीत व व्यवस्थित ठेवण्याबाबत महामंडळाचे विश्वस्त व पदाधिकाऱ्यांनी सूचना मांडल्या.

यावेळी विश्वस्त अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, मा. नगरसेवक आनंद चंदनशिवे, मिलिंद प्रक्षाळे, उत्सव अध्यक्ष विकी शेंडगे, रॉकी बंगाळे, रविकांत कोळेकर, शांतीकुमार नागटिळक, अजित बनसोडे, अशितोष नाटकर, विनोद वाघमारे, अविनाश भडकुंबे, दत्ता शिंदे, चंद्रकांत सोनवणे, लखन भंडारे, उमेश रणदिवे, विनोद वाघमारे, पंकज ढसाळ, आझर शेख, चेतन भडकुंबे, अजय कांबळे, नितीन ओव्हाळ, रियाज दिना मेंबर, बाळासाहेब बनसोडे, दीपक गवळी, सागर उबाळे, अक्षय मस्के, अमोल कदम, भीमा मस्के, रवी बनसोडे, जयराज सांगे आणि मध्यवर्ती महामंडळातील पदाधिकारी व बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## समाजातील गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रमांनी साजरी करा भीमजयंती

**मुंबई, ७ एप्रिल-**

समाजातील आर्थिक दुर्बल व आदिवासी भागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी काम करणा-या महामानव प्रतिष्ठान व एक वही एक पेन अभियानने यंदाची भीमजयंती शैक्षणिक उपक्रम राबवून साजरी करण्याचे आवाहन केले आहे.

महापुरुषांच्या जयंती, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वाण दिन ,सार्वजनिक गणेशोत्सव, शिवजयंती तसेच मान्यवर व्यक्तींच्या वाढदिवसानिमित्त लाखो रूपयांचा खर्च केला जातो.यातील काही अनावश्यक खर्चाला फाटा देवून समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे, विद्यार्थी दत्तक घेणे, विनामूल्य, एमपीएससी ,युपीएससी क्लासेस चालवणे, शाळांमध्ये तसेच वस्त्यांम ध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक प्रवासाविषयी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेणे त्याचप्रमाणे शक्य आहे असे समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे आवाहन महामानव प्रतिष्ठान प्रणित एक वही एक पेन अभियानांतर्गत करण्यात येते.



छत्रपती शिवाजी महाराज संभाजी म हाराज,महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीमाई, राजमाता, माता जिजाऊ रमाई या महापुरुष व महामातांच्या जयंतीदिनी, गणेशोत्सवात त्यांना वह्या, पेन, पुस्तके आदी शैक्षणिक वस्तूंनी अभिवादन करावे, असेही आवाहन करण्यात येते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देश, विदेश व राज्यभारत महिनाभर साजरी केली जाते. या जयंतीदिनी वह्या पेन पुस्तके दप्तरे ,पुस्तके ,कपडे वापरात नसलेले सुस्थितीतील मोबाइल,लॅपटॉप आदी त्यांच्या पुतळ्याला वाहून अभिवादन करावे संबंधित पुतळा समिती, मंडळांनी हे शैक्षणिक साहित्य समाजातील आर्थिक दुर्बल आदिवासी व गरजू विद्यार्थ्यांना वितरित करावे किंवा ९३७२३४३१०८ या क्रमांकावर संपर्क साधून सुपूर्द करावे, असे एक वही एक पेन अभियानचे प्रणेते राजू झनके यांनी महामानव प्रतिष्ठान व एक वही, एक पेन अभियानच्या वतीने केले आहे.

## पत्रकार संरक्षण कायद्याचे नोटिफिकेशन लवकरच निघणार

**मुंबई दि.९ एप्रिल**

पत्रकार संरक्षण कायद्याचे नोटिफिकेशन लवकर काढण्यात येईल, पत्रकार सन्मान योजनेच्या अटी शिथिल करण्यात येतील असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले.

पत्रकारांच्या दहा संघटनांनी एकत्र येत स्थापन केलेल्या पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचच्या वतीने आज मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यात आली जनसुरक्षा विधेयकाच्या संदर्भातील आक्षेप आणि शंकाच्या संदर्भात सह्याद्री अतिथीगृहात ही बैठक झाली. बैठकीस गृह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. एस.एम. देशमुख यांनी पत्रकार संरक्षण कायद्याचा मुद्दा उपस्थित केला.. पत्रकार संरक्षण कायदा झाला पण कायद्याचं नोटिफिकेशन निघाले नसल्याने राज्यात कायदा अंमलात आलेला नाही ही बाब निदर्शनास आणून दिली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी लगेच नोटिफिकेशन काढण्याची सूचना गृहसचिवांना केली.

पत्रकार सन्मान योजनेचे नियम अत्यंत जाचक असल्याने बहुसंख्य ज्येष्ठ पत्रकार या योजनेपासून वंचित आहेत. तेव्हा नियम शिथिल करण्याची मागणी एस.एम.देशमुख यांनी केली त्यावर मुख्यमंत्र्यांनी त्यासंबंधीच्या सूचना संबंधीत अधिकारयांना दिल्या.



## भीमजयंती मिरवणुकी निमित्त रेल्वे पुलावरील ते बॅरिकेट्स काढावेत

**● डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीसाठी दि. १९ ते २१ एप्रिल २०२५ दरम्यान साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकानजीकच्या रेल्वे पुलावरील बॅरिकेट्स

गर्डर (लोखंडी कमान) काढण्यात यावी या मागणीचे निवेदन बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळ यांच्या वतीने वरिष्ठ वाणिज्य अधिकारी योगेश पाटील यांना देण्यात आले. शहरातील विविध भागातील मंडळ हे मि रवणूकीमध्ये मोठ-मोठे देखावे डेकोरेशनच्या गाड्या घेऊन मध्यवर्ती मंडळास सहभागी होत असतात. हत्तूर वस्ती, अम राई, देगांव, न्यू लक्ष्मी चाळ, थोबडेवस्ती साठे-पाटील वस्ती, लक्ष्मीनगर, गंगानगर, अलंकापुरी नगर, दमाणी नगर येथून अंदाजे २० ते २५ मंडळे मरिआई चौक ते लोकशाहिर अण्णाभाऊ साठे चौक (भैय्या चौक) मार्गे मिरवणूकीमध्ये सामील होत असतात. त्यामध्ये विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतचे मोठ-मोठे देखावे हे घेऊन मिरवणूकीत सहभागी होत असतात. त्यास अडथळा होऊ नये म्हणून गर्डर (लोखंडी कम ान) काढून घेण्यात यावीत. कमान काढून घेतल्यास तेथील अंदाजे २० ते २५ मंडळाची गैरसोय टळेल. मंडळांना मिरवणूकीत साम ील होता येईल, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी विश्वस्त समितीचे बाळासाहेब वाघमारे, आनंद चंदनशिवे, मिलिंद प्रक्षाळे, विकी शेंडगे, रॉकी बंगाळे, अजित बनसोडे, अशितोष नाटकर, विनोद वाघमारे, अविनाश भडकुंबे, दत्ता शिंदे, चंद्रकांत सोनवणे, लखन भंडारे, उमेश रणदिवे, विनोद वाघमारे, पंकज ढसाळ, चेतन भडकुंबे, अजय कांबळे, नितीन ओव्हाळ, रियाज दिना मेंबर, बाळासाहेब बनसोडे, दीपक गवळी, अमोल कदम, भीमा मस्के, रवी बनसोडे, जयराज सांगे उपस्थित होते.

## कोकणी माणसावर ठाकरे गटाचे बेगडी प्रेम : केसरकर

**मुंबई, दि. ९ एप्रिल-**

मुख्यमंत्री असताना कोकणच्या भल्याचा एकही निर्णय न घेणाऱ्या उद्धव ठाकरे यांचे कोकणी माणसावर बेगडी प्रेम असल्याची खरमरीत टीका शिवसेनेचे मुख्य प्रवक्ते दीपक केसरकर यांनी पत्रकारांशी बोलताना केली.



उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा कोकण पादाक्रांत करण्याचे जाहीर केले.त्याबाबत केसरकर म्हणाले की, कोकणातील शेतकऱ्यांसाठी काजू बोर्डाच्या संदर्भात म हाविकास आघाडी सरकारने समिती नेमली होती. तेव्हा अर्थराज्यमंत्री या नात्याने या समितीचे आपण अध्यक्ष होतो. काजूचे धोरण कोकणचा कायापालट करणारे धोरण होते, मात्र तत्कालिन मुख्यमंत्री ठाकरे यांनी कधीही त्या धोरणाला मंजुरी दिली नाही. यावरुन उद्धव ठाकरेंना दुर्लक्षित कोकणाबद्दल किती आत्मियता होती हे जवळून अनुभवले, चांदा ते बांदा योजना अर्थ खात्याने बंद केली होती. ती पुन्हा सुरु करण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे आदेश आवश्यक होते, मात्र तेव्हाही ठाकरे मूग गिळून गप्प बसले. कोकणाच्या विकासासाठी एक शब्द देखील टाकला नाही ही वस्तुस्थिती आहे.

कोकणी माणसावर त्यांचे केवळ बेगडी प्रेम आहे, त्याचा केवळ शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करण्यासाठी वापर केला जातो, जे चुकीचे आहे, असे सांगून केसरकर म्हणाले. शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर लगेच काजू बोर्डाला १५०० कोटींचा निधी दिला, काजू बोंडाशी संबधित उद्योगांबाबतचा प्रयोग यशस्वी झाल्यास कोकणातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना ३००० कोटींचा फायदा होईल. संपूर्ण कोकण किनारपट्टी ही बाळासाहेबांच्या विचारांबरोबर आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वासोबत असल्याचे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतून शिक्कामोर्तब झाले.


## पत्रकारांच्या मागण्यासंदर्भात शासन सकारात्मक

**● ज्येष्ठ पत्रकारांच्या सन्मान योजनेच्या अटीसंदर्भात पत्रकार संघटनांच्या सूचना घेऊन प्रस्ताव सादर करा : मुख्यमंत्री**

**मुंबई, दि.९ एप्रिल-**

राज्यातील पत्रकारांच्या मागण्या संदर्भात राज्य शासन सकारात्मक आहे. ज्येष्ठ पत्रकारांसाठी सुरू करण्यात आलेल्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेच्या अटीसंदर्भात राज्यातील पत्रकार संघटनांच्या सूचना घेऊन योजनेतील बदलाबाबत नव्याने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाच्या पत्रकारांच्या प्रलंबित प्रश्नांसदर्भात आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी पत्रकारांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




ज्येष्ठ पत्रकारांसाठी आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेत अनुभवाची अट ३० वर्षे वरुन २५ वर्षे करण्याची तसेच वयाची अट ६० वर्षे वरून ५८ वर्षे करण्याची मागणी पत्रकार संघटनेने केली आहे. या योजनेच्या अटीसंदर्भात राज्यातील विविध पत्रकार संघटनेच्या सुचना मागवून घेऊन नव्याने प्रस्ताव सादर करावे. तसेच सन्मान योजनेत देण्यात येणाऱ्या वाढीव मानधनाच्या रक्कमे संदर्भात योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले. पत्रकारांसाठी कांदिवली येथे गृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहे. या सदनिकांसाठी आकारण्यात येणारे दर कमी करण्यासंदर्भात म्हाडाने योग्य तो तोडगा काढावा. शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी कल्याण निधीमधून पत्रकारांच्या आजारपणात देण्यात येणाऱ्या एक लाखापर्यंतच्या मदतीची रक्कम वाढविण्यासंदर्भात विचार केला जाईल. तसेच पत्रकारांच्या आरोग्य योजना महात्मा फुले जनआरोग्य योजनेशी सलंग्न करून यादीतील आजारशिवाय इतर आजारांच्या प्रतिपूर्तीसंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. अधिस्विकृतीधारक पत्रकारांना एसटी महामंडळाच्या शिवनेरी व शिवाई बसमध्ये सवलत देण्यासंदर्भात एसटी महामंडळाने योग्य तो निर्णय घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. सध्या मंत्रालयात प्रवेशासाठी 'फेशियल रिकग्नेशन' यंत्रणा राबविण्यात येत आहे. या यंत्रणेअंतर्गत पत्रकारांना मंत्रालयात प्रवेशासाठी येत्या पंधरा दिवसात कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदू जोशी, संघाचे सरचिटणीस दीपक भातुसे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## संग्राम गृह लघु उद्योगाच्या वैष्णवी सुरवसे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

येथील संग्राम गृह लघु उद्योग समूहाच्या सदस्य वैष्णवी नितीन सुरवसे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना उद्योग क्षेत्रातील आदर्श महिला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्योतिर्लिंग बहुउद्देशीय समाजसेवी संस्था गादेगाव व ज्योती मर्य योग निसर्गोपचार केंद्र पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने पंढरपूर येथे आयोजित एका समारंभात सुरवसे यांचा गौरव करण्यात आला.



योग गुरु डॉ ज्योती शेटे त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजश्री देडे, अनिता नागराळे, ॲडव्होकेट सुकेशनी शिर्के बागल, उद्योजक राजेश वाघमोडे, डॉ माणिक मस्के, मिलिंद वायकर, सुषमा रामचंद्र सुरवसे, डॉ.समृद्धी शिंदे प्रा भगवती सुरवसे, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरवसे हिला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संगम ग्रह लघु उद्योगाचे संस्थापिका बबीता धनंजय सुरवसे, प्रा सुनील मगर, कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले यांनी तिचे अभिनंदन केले आहे.


## आरोग्य संस्थांच्या आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने 'मिशन' राबवा : मुख्यमंत्री

**सह्याद्री अतिथीगृह आरोग्य विभागाच्या प्रकल्पांबाबत आढावा बैठकीत**

**मुंबई, दि. ९ एप्रिल-**

राज्यातील आरोग्य उपकेंद्रात संदर्भ सेवा रुग्णालयांपर्यंत असलेल्या विविध आरोग्य संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी विस्तृत प्रकल्प तयार करण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रकल्प आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने 'मिशन' म्हणून राबविण्यात यावा, अशा सूचनाही दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रकल्पांबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर आदी उपस्थित होते. तसेच दूरसंवाद प्रणालीद्वारे आशियाई विकास बँकेचे प्रतिनिधी निशांत जैन सहभागी झाले होते.



मुख्यमंत्री म्हणाले, कर्करोग निदान उपचाराबाबत केंद्राने राष्ट्रीय कर्करोग उपचार धोरण आणले आहे. याच धर्तीवर कर्करोग निदान व उपचारासाठी संदर्भ सेवा देण्याबाबत प्रभावी कार्यपद्धती ठरविण्यात यावी. कर्करोगावर केमोथेरपी, रेडिएशन थेरपी या उपचारांचा समावेश असावा. यासंदर्भात विहित काल मर्यादा ठरवून कार्यवाही करण्यात यावी.

वैद्यकीय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी आरोग्य संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करावा. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी नाविन्यपूर्ण उपायांचा अवलंब करण्यात यावा. राज्यात शासकीय वैद्यकीय म हाविद्यालय निर्माण करण्यात येत आहे. महाविद्यालयांसाठी संबंधित जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य विभागाची रुग्णालय संलग्न करण्यात आली आहेत. याबाबत जास्त लोकसंख्या व रुग्णसंख्येचे भार असलेल्या ठिकाणी स्वतंत्र रुग्णालय निर्माण करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.ते म्हणाले, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झालेल्या जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षण विभागाचे स्वतंत्र रुग्णालय आवश्यकतेची पडताळणी करावी. वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागासाठी आवश्यक असणारी रुग्णालये, नव्याने रुग्णालय उभारणी गरजेची असलेली ठिकाणे या पद्धतीने वर्गीकरण करून विस्तृत नियोजन आराखडा तयार करावा. धाराशिव येथे वैद्यकीय शिक्षण विभागाचे रुग्णालय निर्माण करण्यात यावे. पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश देताना विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणानंतर कालावधी विहित करून शासकीय रुग्णालयांमध्ये सेवा देणे बंधनकारक करण्यासंदर्भात पडताळणी करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

### आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने राज्यातील प्रकल्प

अलिबाग आणि सिंधुदुर्ग शासकीय सामान्य रुग्णालयाचे बांधकाम सुरू आहे. अमरावती, वाशिम आणि धाराशिव येथील रुग्णालये निविदा स्तरावर आहेत. गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी उत्कृष्ट केंद्राचे जाळे निर्माण करण्यात येत आहे. त्यामध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ 'हब' आणि सात 'स्पोक' प्रस्तावित आहेत. तसेच आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली विकसित करण्यात येत आहे. सातारा, चंद्रपूर शासकीय रुग्णालय आणि सर जे.जे. सुपर स्पेशलिटी रुग्णालयामध्ये उपकरणे खरेदी करण्यात येत आहेत. तसेच अवयवदान प्रत्यारोपण संबंधित संस्था निर्माण करण्यात येणार आहेत.

## अग्रलेख...

# जनमनाचे स्वप्न साकारणारी मुद्रा

जनतेच्या कल्याणासाठी देशोदेशीची सरकारे विविध योजना आखतात आणि त्या योजनांची अंमलबजावणी करून लोकप्रियता मिळवतात. लोकशाहीत संवैधानिक पद्धतीने निवडून आलेल्या प्रत्येक सरकारला अशा जनकल्याणार्थ योजना आखण्याचा आणि त्यातून लोकप्रियता मिळवण्याचा अधिकार मिळालेला असतो. मात्र प्रत्यक्षात स्थिती काय असते, अनेक योजना केवळ कागदावरच उतरलेल्या दिसतात, अंमलबजावणीच्या दृष्टीने त्यांनी कुठलीच प्रगती साधलेली दिसत नाही. केवळ सरकारी आदेश निर्गमित झाले म्हणजे सरकारने आखलेल्या योजना यशस्वी ठरल्या असे होत नाही. योजना आखताना त्या कुणासाठी आखायच्या, ज्यांच्यासाठी आखायच्या त्यांना या योजनांची खरोखरीच गरज आहे का, या योजनांमुळे मिळणारे लाभ इतर योजनांच्या तुलनेत कितपत लाभकारी आहेत, याचा अभ्यास करून तयार झालेल्या योजना यशस्वितेच्या दिशेने पुढे सरकतात. ही झाली पहिली पायरी. योजना तयार झाल्यानंतर तिला मंजुरी मिळविण्यासाठी अधिकाऱ्यांपासून ते मंत्र्यांपर्यंत साऱ्या लोकांच्या गळी उतरवण्याचे कसब पार पाडावे लागते. योजना मंजुरीनंतर अधिसूचना निघणे आणि योग्य प्रसिद्धीनंतर त्या योजनांच्या लाभासाठी लोकांनी अर्ज करणे याची सुरुवात होते. अर्जांच्या छाननीनंतर लाभार्थींची अंतिम यादी निश्चित होऊन त्या-त्या व्यक्तींच्या खात्यात योजनेचा पैसा पोहोचण्यापर्यंतच्या प्रक्रियेत अनेक लोक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, तज्ज्ञ आणि श्रेय लाटणारी मंडळी त्यात सहभाग नोंदवतात. या प्रवासात अनेक योजना कुणाच्या तरी हलगर्जीपणामुळे म्हणा अथवा कुणीतरी मेख मारून ठेवल्याने अतिशय चांगल्या असूनही जनतेपर्यंत पोहोचत नाहीत आणि त्यांचा गर्भातच मृत्यू होतो. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लघु व्यावसायिकांना सक्षम करण्यासाठी आखलेल्या पीएम मुद्रा लोनबाबत असे कुठलेही अडथळे आले नाहीत. ही योजना विनासायास या प्रक्रियेतून बाहेर पडली आणि गेल्या दहा वर्षांत तिने यशस्वितेचे उच्चांक गाठला. आजवर या योजनेमुळे ५२ कोटी ३३ लाख लोकांच्या जीवनात बदल घडून आले, त्यांची स्वप्ने साकार झालीत. ज्यांना पूर्वी दुर्लक्षित केले गेले, ते आर्थिक मदतीमुळे सक्षम झाले. लघु उद्योजक, छोटे दुकानदार यांना पूर्वी कर्जासाठी बँकांचे आणि वित्तीय संस्थांचे उंबरठे झिजवावे लागत. परंतु मोदी सरकारने मुद्रा योजनेतून जी समृद्धी आम जनतेच्या आयुष्यात आणली तिला तोड नाही. अशा या योजनेचा सध्या भारतभर गौरव सुरू आहे, तिचे गोडवे गायिले जाऊ लागले आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने तर त्यांच्या २०२४ च्या अहवालातच भारताच्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेला तळागाळातील आर्थिक समावेशन आणि कर्जाद्वारे उद्योजकतेचा एक प्रमुख आधारस्तंभ म्हणून मान्यता दिली होती. ८ एप्रिल २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या या दूरदर्शी योजनेने लाखो लोकांना केवळ कर्जच उपलब्ध करून दिले नाही तर स्वावलंबनाची संस्कृती देखील जोपासली आहे.

दहा वर्षांनंतर पंतप्रधान मुद्रा योजनेतून अर्थक्षेत्रात एक मोठी क्रांती झाली आहे. या योजनेतर्गत ३३ लाख कोटी रुपयांहून अधिक तारणमुक्त कर्जे वितरित केली गेली. यातून लाभार्थी कुटुंबांचा उपजीविकेचा प्रश्न तर सुटलाच शिवाय, त्यांच्या आशा-आकांक्षा देखील उंचावल्या. मुद्रा अर्थात मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट ॲण्ड रिफायनान्स एजन्सी लिमिटेडची स्थापना भारताच्या आर्थिक इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. बँका, बँकेतर वित्तीय संस्था, लघु वित्तीय साहाय्य संस्था आणि शेवटच्या टप्प्यातील वित्तीय संस्थांद्वारे बिगर-कॉर्पोरेट, बिगर-शेती, लघु तसेच सूक्ष्म उद्योगांना आर्थिक मदत देण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली. यातून गरीब, महिला, छोटे व्यापारी, कारागीर यांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळाला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दशकपूर्तीनिमित्त मुद्रा कर्ज योजनेच्या लाभार्थींसोबत चर्चा केली. त्यातून निघालेली माहिती डोळे विस्फारून टाकणारी आहे. योजना कशा आखाव्या म्हणजे त्या यशस्वी होतील, हे यातून शिकण्यासारखे आहे. अयशस्वी योजनांमागे कोणती सरकारे, मंत्री आणि अधिकारी असतात, हेदेखील यातून अधोरेखित झाले. या योजनेच्या मदतीने हजारो लोकांना त्यांचा व्यवसाय सुरू करता आला, याची याचि डोळा प्रचीती आली. या योजनेच्या मदतीने अनेकांना व्यवसायाचे स्वप्न पूर्ण करता आले. लाभार्थींशी झालेल्या संवादानंतर पंतप्रधानांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर त्यांचे मनोगत व्यक्त केले आहे. त्यांनी देशभरातून त्यांच्या निवासस्थानी आमंत्रित केलेल्या लाभार्थींची मनोगतं जाणून घेतली आणि त्यांच्या आयुष्यात झालेल्या बदलांची नोंद घेतली. अनुभव कथनातून अनेक सक्सेस स्टोरीज बाहेर आल्या. अनेक लोकांनी या योजनेच्या मदतीने त्यांच्या आयुष्यात काय आणि कसा बदल झाला, याची माहिती दिली. इतकेच नाही तर या योजनेच्या आर्थिक मदतीने त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता आले असे सांगितले. यापूर्वी अनेक लाभार्थी केवळ २० हजार रुपयांची कमाई करीत होते. पण या योजनेने त्यांच्या प्राप्तीत दुपटीने वाढ झाली. पंतप्रधानांनी यावेळी अनेक तरुणांशीही संवाद साधला. त्यांनी सांगितले की, जेव्हा त्यांनी नोकरी सोडली तेव्हा त्यांचा पगार ७० हजार रुपयांच्या घरात होता. त्यांना स्वतःचे विश्व उभे करायचे असल्याने त्यांनी मुद्रा योजनेची मदत घेतली. या योजनेच्या मदतीने ते आज २ लाख रुपये महिना कमावत आहेत. शिवाय त्यांनी अनेक लोकांच्या हाताला काम दिले आहे. या योजनेतील एक लाभार्थी कमलेश यांनी त्यांची यशोगाथा सांगितली. त्यानुसार, ते टेलरिंगचे, कपडे शिवण्याचे काम करतात. त्यांनी आता तीन महिलांना रोजगार दिला असून, त्यांच्या मुलांना चांगल्या शाळेत शिक्षणासाठी प्रवेश दिला आहे.

मुद्रा योजनेतील लाभार्थींची आकडेवारीही अतिशय बोलकी आणि सरकारच्या सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिकोनावर प्रकाश टाकणारी आहे. देशभरातील महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांना चालना देण्यात या योजनेची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. कारण मुद्रा लाभार्थींपैकी ६८ टक्के महिला आहेत. मुद्रा खात्यापैकी जवळजवळ ५० टक्के खाती अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय वर्गातील उद्योजकांकडे आहेत, ज्यातून या योजनेचा लाभ कोणापर्यंत पोहोचला याची स्पष्टता येते. अल्प उत्पन्न गटातील लोक या योजनेमुळे लाभान्वित झाल्याची ही कहाणी दलित, पीडित, मागासवर्गीयांसाठी सरकारने काय केले, याची जंत्रीच उभी करते आणि विरोधकांचे तोंड बंद करते. ओबीसींच्या नावाने राजकारण करणाऱ्यांनी एकवार ही आकडेवारी डोळ्याखालून घातल्यास त्यांना मागास समाजाच्या उत्थानासाठी सरकार कोणती पावले उचलत आहे, हे कळल्याशिवाय राहणार नाही. एकूण मुद्रा कर्ज प्राप्तकर्त्यांपैकी सुमारे ११ टक्के अल्पसंख्याक समुदायापैकी आहेत, ज्यातून विविध सामाजिक-आर्थिक गटांना आधार देण्यासाठीचा योजनेचा समावेशक हेतू स्पष्ट होतो. अर्थमंत्रालयाचे सचिव एम. नागराजू यांच्या मते या योजनेंतर्गत कर्जाची परतफेड करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. बँकांची एकूण अनुत्पादक मालमत्ता २.२१ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. श्रेणीबद्ध कर्ज रचनेमुळे (शिशु, किशोर आणि तरुण आणि तरुण प्लस) मुद्रा योजनेने हे सिद्ध केले आहे की, सूक्ष्म-उद्योजकांना विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, महिला आणि अल्पसंख्यक यासारख्या उपेक्षित समुदायातील लोकांना सरकार केवळ विकासाच्या प्रवासात सामील करून घेत नाही तर त्यांना प्राधान्यसुद्धा दिले जाते. एक विणकर विणकाम तर करतच राहतो, परंतु आता त्याला आधुनिक साधने आणि चांगल्या बाजारपेठा उपलब्ध असतात. रस्त्यावरील विक्रेता त्याचा ठेला कायमस्वरूपी दुकानात अपग्रेड करतो. जनमनाचे स्वप्न साकारणारी मुद्रा योजनेची ही यशोगाथा छोट्या व्यावसायिकांसाठी जशी संजीवनी ठरली आहे तशीच ती सरकारी यंत्रणा योग्यरीत्या राबविली तर त्याचे परिणाम किती उत्तम मिळू शकतात, याचे उदाहरण देणारी ठरली आहे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# आणखी एक लक्षवेधी तंत्रशैली

संगणक क्षेत्रात अनेक लाटा येत असतात. सध्याची लाट आहे 'घिबली'ची. आपले छायाचित्र घिबली शैली वापरून ॲनिमेटेड पद्धतीने रूपांतरित करण्याचा धुमाकूळ सर्वत्र सुरू आहे. घिबली-शैलीतील प्रतिमानिर्मितीच्या नव्याने झालेल्या परिचयाने जगभरातील वापरकर्त्यांना मोहित केले आहे. त्यांना सामान्य फोटोंचे रूपांतर प्रतिष्ठित जपानी ॲनिमेशन स्टुडिओपासून प्रेरित होऊन मोहक दृश्यांमध्ये करता आले आहे. इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्स ॲपवर स्टुडिओ घिबलीने वर्चस्व निर्माण केले आहे. पंतप्रधान मोदी, सचिन तेंडुलकर, राजपाल यादवसह अनेक सेलिब्रिटींजच्या फोटोंनी इन्स्टाग्रामवर धुमाकूळ घातला आहे. तसेच इतर लोकही आपल्या जुन्या आठवणींना घिबली टच देत समाज माध्यमावर फोटो शेअर करीत आहेत. या नवीन ट्रेंडने एआयच्या मदतीने जगभरातील लोकांना आपल्या जादुई शैलीत गुंगवले आहे. चॅटजीपीटीवर यूजर त्यांचा आवडता फोटो अपलोड करून 'कनव्हर्ट दिस इमेज इन टू घिबली' अशी कमांड देतात आणि काही क्षणांमध्येच घिबली शैलीतील छायाचित्रे मिळवता येतात. 'एआय'द्वारे त्याचे रूपांतर जपानी ॲनिमेशनच्या क्लासिक घटकांमध्ये केले जाते. त्यामुळे आठवणी या कलाकृतीचे रूप घेतात. हा ट्रेंड केवळ ओपन-एआयपुरता मर्यादित नाही, तर ग्रोक आणि जेमिनी या एआय प्लॅटफॉर्मनीही ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

जपानमधील 'स्टुडिओ घिबली' हा केवळ एक स्टुडिओच नाही, तर एक संकल्पना आहे. 'स्टुडिओ घिबली'च्या चित्रपटांमध्ये प्रामुख्याने जपानी संस्कृती, समृद्ध निसर्ग, मानवी भावना आणि कल्पनारम्य कथांचे अनोखे मिश्रण पाहायला मिळते. हा बदल करण्यासाठी नेमकं काय करावं लागतं? 'एआय' तंत्रज्ञानाच्या मदतीने हे आता अगदी सोपं झालं आहे. 'ड्रीम बाय वोमबो', 'डीप आर्ट', 'टूनमी' यासारख्या ॲप्सचा वापर करून काही सेकंदांमध्ये तुमचा फोटो 'घिबली' ॲनिमेशनसारखा दिसू शकतो. यासाठी वापरकर्त्यांना आपला फोटो अपलोड करून 'स्टुडिओ घिबली' किंवा 'ॲनिमे स्टाईल' फिल्टर निवडावा लागतो. अधिक ओरिजिनल लूक हवा असल्यास, 'ॲडोब फॉटोशॉप', 'प्रो क्रियेट' किंवा 'क्रीटा' यासारख्या सॉफ्टवेअरमध्ये डिजिटल पेंटिंग करून फोटोला हळुवार 'घिबली' टच देता येतो. काही जण यासाठी 'ब्लेंडर' किंवा 'आफ्टर इफेक्ट'सारख्या ॲनिमेशन सॉफ्टवेअरचादेखील वापर करून हलत्या प्रतिमा तयार करतात.



ॲनिमेशन ही केवळ मनोरंजनाची कला नाही, तर ते एक सशक्त अभिव्यक्तीचे साधन आहे. जगभरातील अनेक देशांनी आपल्या संस्कृतीनुसार ॲनिमेशनचे तंत्र विकसित केले. अमेरिकेत 'वॉल्ट डिझ्नी', युरोपमध्ये 'ॲस्टेरिक्स' आणि 'टिनटिन' तर जपानमध्ये ॲनिमेशनच्या दुनियेत सर्वांत प्रभावशाली नाव म्हणजे 'स्टुडिओ घिबली.' हा स्टुडिओ फक्त जपानी ॲनिमेशनचे प्रतिनिधित्व करीत नाही, तर त्याने जागतिक स्तरावर एका अनोख्या कथाकथन शैलीला जन्म दिला आहे. 'घिबली' जपानमधील सुप्रसिद्ध ॲनिमेशन स्टुडिओंपैकी एक आहे. हा स्टुडिओ सुंदर हाताने रेखाटलेल्या ॲनिमेशनसाठी आणि मनाला भिडणाऱ्या कथाकथनासाठी ओळखला जातो. घिबली स्टुडिओची स्थापना १९८५ मध्ये हयाओ मियाझाकी आणि इसाओ ताकाहाता या दोन दिग्दर्शकांनी केली. या स्टुडिओने सर्वोत्कृष्ट ॲनिमेटेड चित्रपट तयार केले आहेत.

घिबली स्टुडिओची स्थापना करण्यामागील उद्देश असा होता की जपानी ॲनिमेशनच्या माध्यमातून एक नवी आणि कॅलिटेटिव्ह कथा सांगण्याची संधी मिळावी. 'घिबली' हा शब्द इटालियन विमानप्रकार 'घिबली'मधून आला आहे. त्याचा अर्थ 'उत्साही वारा'. 'घिबली'च्या पहिल्या चित्रपटाचे नाव 'कॅसल इन द स्काय' (१९८६). हा चित्रपट जपानमध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला आणि घिबलीला एक प्रमुख ॲनिमेशन स्टुडिओ म्हणून ओळख मिळाली. १९८८ मध्ये आलेला 'नाओवाशी' हा एक अत्यंत लोकप्रिय चित्रपट. त्यात एका छोट्या मुलीच्या साहसांची कहाणी चितारण्यात आली आहे. 'स्पिरिटेड अवे' (२००१) या मियाझाकी दिग्दर्शित चित्रपटाने विशेषतः पश्चिमी देशांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रशंसा मिळवली. त्याला ऑस्कर पुरस्कार मिळाला. 'प्रिन्सेस मोनोनोके' (१९९७) हा 'घिबली' स्टुडिओचा चित्रपट पर्यावरणवाद आणि मानवतेच्या संघर्षावर आधारित आहे. 'हाऊल्स मूव्हिंग कॅसल' (२००४) हा चित्रपट लांबल्या वयाच्या पुरुष आणि महिलांच्या संबंधावर आधारित आहे.

तर अशा या घिबली तंत्राचे एव्हाना सायबरविश्वामध्ये झोकात आगमन झाले असून या शैलीत आपले किंवा आपल्याला भावणारे चित्र रूपांतरित करून पाहण्याचे पेव फुटले आहे. त्यामुळे घिबली तंत्र आणि सुरक्षा या अनुषंगानेही विचार, चर्चा पाहायला मिळत आहे. इंटरनेटवर एकदा आपले फोटो सबमिट केले की वापरकर्ते त्या फोटोंच्या वापरावरील नियंत्रण गमावतात. गोपनीयता धोरण सांगते की वापरकर्ता सबमिट करत असलेले फोटो इनपुट मॉडेल प्रशिक्षणासाठी वापरले जाऊ शकतात. ही भविष्यासाठी धोक्याची घंटा आहे, असेदेखील पोस्टमध्ये सांगण्यात आले आहे. याचे कारण फोटो अपलोड केल्यानंतर त्यावर तुमचा अधिकार राहत नाही. तुमचा फोटो अन्य कामांसाठीदेखील वापरला जाऊ शकतो. म्हणजेच गोपनीयतेचे उल्लंघन होऊ शकते. दुसरी बाब म्हणजे तुम्ही अपलोड केलेल्या फोटोंचा गैरवापर करून ओळख चोरली जाऊ शकते. यामुळे तुमची खाजगी माहिती सुरक्षित राहू शकत नाही आणि तुम्ही हॅकिंगला बळी पडू शकता. ओपन एआय कंपनीने चॅटजीपीटीचे एक नेटिव्ह इमेज जनरेशन फीचर लाँच केले आहे. आपण जसे पूर्वीपासून ॲनिमेशन आणि कार्टूनमध्ये फोटो पाहतो तसेच यात आपले फोटो बनवू शकतो. साहजिकच आपल्या मनात ही शैली वापरून असे फोटो बनवायचे कसे ही उत्सुकता निर्माण होते. त्यासाठी आपण चॅटजीपीटीच्या प्रीमियम मॉडेलचा वापर करू शकतो. आपल्याला डेस्कटॉप किंवा मोबाईलवर चॅटजीपीटी उघडावे लागेल. तेथील अधिक चिन्हावर क्लिक केल्यावर फोटोज हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करून घिबली शैलीत बनवायचे फोटो निवडता येतात. फोटो अपलोड झाला की संबंधित कमांड द्यावी लागेल. त्यासाठी विविध पर्याय मिळतील. पण चॅटजीपीटीचा वापर करण्यासाठी १८०० रुपये म्हणजे जवळपास २० डॉलर्स एवढी रक्कम मोजावी लागते. पण असेही काही पर्याय आहेत, ज्याद्वारे घिबली शैलीतील आकर्षक फोटो बनवता येतात. त्यासाठी सोपे पर्याय म्हणून ग्रॉकएआय आणि मिड जर्नी ही माध्यमे वापरता येतात. तिथे चित्र बनवण्याची पद्धत चॅटजीपीटी सारखीच सोपी आहे. ग्रॉक एआय चॅटजीपीटीमध्ये घिबली शैलीमधील प्रतिकृती वैशिष्ट्य समाविष्ट केले आहे. याद्वारे एआय जनरेटेड प्रतिमांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

चॅटजीपीटीद्वारे जवळपास प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या फोटोंचे ॲनिमेशन बनवू शकते. चॅटजीपीटीव्यतिरिक्त क्रेल्योन, प्ले ग्राऊंड एआय, ग्रॉक आणि डीपएआयसारख्या मोफत प्लॅटफॉर्मवरूनही घिबली शैलीचे फोटो बनवता येतात. मात्र जीपीटी ४ प्रमाणे ही टूल्स हुबेहूब फोटो तयार करू शकत नाहीत. घिबली आर्टमुळे सर्वत्र खळबळ उडवून दिली असली तरी घिबली स्टुडिओचे सहसंस्थापक नियाघाडी हैयायो यांनी याबद्दल खंत व्यक्त केली आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# 'मुद्रा'ची दशकपूर्ती

मराठी तरुणांचे हात हे नोकरी मागणारे न होता, नोकऱ्या देणारे मराठी तरुण राज्यात घडावे अशी इच्छा अनेकदा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली आहे. उद्योग क्षेत्रात येऊन युवकांनी विकासाच्या नव्या वाटा पादाक्रांत कराव्यात हेच आजवर अनेकदा काँग्रेसच्या काळात सांगितले जात होते. मात्र युवकांना उद्योग क्षेत्रात पाऊल ठेवताना नेहमी भांडवलाची अडचण भासत होती. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्योजकांना सक्षम करण्यासाठी पीएम मुद्रा योजना आणली आणि बघता बघता या योजनेची दशकपूर्ती झाली आहे. उद्योग क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या तरुणांना या योजनेच्या माध्यमातून सरकारने मदतीचा हात दिला आणि दहा वर्षांत तब्बल ५२ कोटी ३३ लाख व्यावसायिकांना या योजनेच्या माध्यमातून कर्ज मिळाले. पीएम मुद्रा योजनेमुळे मागील दहा वर्षांत कोट्यवधी लोकांचे जीवन बदलले. त्यांची स्वप्ने साकार झालीत. ज्याना पूर्वी दुर्लक्षित केले गेले, त्यांना आर्थिक मदत देऊन सक्षम करण्यात आले. देशातील लघु उद्योजक, छोटे दुकानदार यांना पूर्वी कर्ज मिळविण्यासाठी बँकेचे उंबरठे झिजवावे लागायचे. मात्र मोदी सरकारने मुद्रा योजना लागू करून युवकांच्या उद्योजक बनण्याच्या प्रवासाला एकप्रकारे दिशा दिली आहे. मुद्रा योजनेमुळे ज्या युवकांनी उद्योग क्षेत्रात पाऊल ठेवून आपले जीवनमान बदलविले आहे, त्या सर्वांचे योजनेच्या दहा वर्षाच्या पूर्णत्वानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदनही केले आहे. या योजनेमुळे काहीही अशक्य नाही, कुठलीही महिला, कुठलाही युवक, कुठलीही युवती रोजगार करून आपले जीवन बदलवू शकते, हे सिद्ध झाले झाले आहे. या योजनेने अनेकांना रोजगार दिला आहे.

युवकांसाठी मुद्रा योजना अतिशय मोलाची आणि महत्त्वपूर्ण ठरली आहे. केंद्र सरकारने बँकांच्या माध्यमातून २२ कोटींहून अधिक लाभार्थींना ३३ लाख कोटी रुपयांपर्यंत तारणमुक्त कर्ज वितरित केले आहे. यातील ७० टक्के लाभार्थी महिला आणि अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय समुदायातील आहेत. या योजनेमुळे अनेकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मदत झाली. आणि तळागळातील लोकांना सक्षम करता आले. मुद्रा योजनेच्या माध्यमातून विकासाच्या नवीन युगाची सुरुवात झाली. युवा उद्योजकांना सक्षम करणे हा पीएम मुद्रा योजनेचा मुख्य उद्देश आहे. आणि यातील लाभार्थींची संख्या लक्षात घेता ही योजना खऱ्या अर्थाने नवीन युगाची सुरुवात करणारी महान योजना ठरली आहे. या योजनेच्या माध्यमातून कर्ज घेणाऱ्या बहुतांशी महिला असून सर्वांत जलदगतीने कर्ज फेडणाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश आहे. कुठल्याही हमीशिवाय या योजनेच्या माध्यमातून देशातील तरुणांना ३३ लाख कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले आहे. देशातील अधिकाधिक तरुणांनी व्यवसाय सुरू करावा अशी खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इच्छा आहे. आणि याच इच्छापूर्तीसाठी त्यांनी मुद्रा योजना अधिक बळकट करण्याचे ठरविले आहे. सरकार व्यावसायिकांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी तयार आहे, असा विश्वासही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेच्या माध्यमातून दिला आहे. मुद्रा योजनेतून देशातील जनतेला कुठल्याही हमीशिवाय ३३ लाख कोटी रुपये देण्यात आले. हा अतिशय स्तुत्य उपक्रम असून या योजनेमुळे देशात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली असून, या योजनेच्या लाभार्थींनी अर्थव्यवस्था वाढीसाठी मोठी मदत केली आहे. ही योजना देशात लागू होऊन दहा वर्षांचा कालावधी पूर्ण झाला असून अनेकांनी या योजनेच्या माध्यमातून आपल्या आयुष्याची आर्थिक घडी नीट बसविण्यासाठी प्रयत्न केले. ज्या तरुणांनी या योजनेच्या माध्यमातून प्रामाणिक प्रयत्न करीत आपला उद्योग वाढविण्यासाठी भर दिला आणि उद्योजक म्हणून युवा पिढी देशात नावारूपास आली, त्या तरुण उद्योजकांना खरंच सलाम करायला पाहिजे. हाताला काम नाही म्हणून अनेक तरुण वैफल्यग्रस्त झाले आहेत. अनेक तरुण रिकामे घरी बसून आहेत. अशा तरुणांनी मुद्रा योजनेचा लाभ घेऊन आपले आर्थिक जीवनमान उंचाविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुद्रा योजना अतिशय सुलभ असून, या योजनेचा लाभ घेऊन तरुणांना उद्योजक बणण्याची संधी लाभली आहे. या संधीचा महाराष्ट्रातील युवकांनी लाभ घेण्याची गरज आहे. प्रत्येकाला नोकरी देणे आता सरकारच्याही हातात राहिले नाही. स्पर्धेच्या या युगात शासकीय निमशासकीय नोकऱ्या मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे घरात बसून रिकामे न राहता मुद्रा योजनेचा लाभ घेऊन उद्योग क्षेत्रात मराठी युवकांनी येण्याची आता गरज आहे. मराठी युवकांनी खरंच नोकऱ्या देणारे हात निर्माण केले पाहिजे. नौकर म्हणून आयुष्य घालविण्यापेक्षा मालक बनून आर्थिक जीवनमान सुधारण्याची संधी देणारी एकमेव योजना म्हणजे पीएम मुद्रा योजना आहे. या योजनेचा दहा वर्षांतील कार्यकाळ बघता ही योजना अनेकांचे आयुष्य बदलवून टाकणारी ठरली आहे. या योजनेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# वक्फ कायदा मोदी सरकारची सर्वोच्च उपलब्धी

देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात बहुमताने पारित झाले. यासंदर्भातील अधिसूचनेवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वाक्षरी केल्यामुळे त्याचे कायद्यातही रूपांतर झाले आहे. मोदी सरकारची आतापर्यंतची ही सर्वांत मोठी उपलब्धी मानली जात आहे.

याआधी मोदी सरकारने जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम निष्प्रभ केले, तीन तलाक बेकायदेशीर ठरवला, त्याचप्रमाणे अयोध्येतील रामजन्मभूमीवर भव्यदिव्य राममंदिर बांधण्याचा मार्ग प्रशस्त करण्यापर्यंत अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. त्याच मालिकेतील हा निर्णय म्हटला पाहिजे. भाजपा आणि संघपरिवाराला तसेच देशातील कोट्यवधी हिंदूंना अपेक्षित असे अनेक निर्णय मोदी सरकारने चुटकीसरशी घेतले आहे. त्यामुळे यानंतर देशातील राष्ट्रभक्त नागरिकांना सुखावणारा मोदी सरकारचा पुढील निर्णय कोणता राहील याबाबत उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे.

३७० कलम निष्प्रभ करण्याचा आणि तीन तलाक बेकायदेशीर ठरवण्यापेक्षा वक्फ दुरुस्ती विधेयक पारित करण्याचा निर्णय मोदी सरकारसाठी आव्हानात्मक होता. कारण यावेळी मोदी सरकारला पूर्ण बहुमत मिळाले नाही. लोकसभेत तर भाजपा आणि मित्रपक्षांचे स्पष्ट बहुमत होते, पण राज्यसभेत भाजपाचे काठावर बहुमत होते. त्यामुळे वक्फ दुरुस्ती विधेयक राज्यसभेत पारित करून घेणे ही मोदी सरकारसाठी एकप्रकारची अग्निपरीक्षा होती. मात्र या अग्निपरीक्षेत मोदी सरकार नुसतेच नाही तर प्रावीण्याने उत्तीर्ण झाले.

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळाले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र भाजपाचा विजयरथ अनपेक्षितपणे २४० वर अडकला. स्वबळावर २७२ हा स्पष्ट बहुमताचा आकडा भाजपाला गाठता आला नाही. तेलगू देसम, जनता दल संयुक्त, राष्ट्रीय लोकदल, लोकजनशक्ती पक्ष, हिंदुस्थान अवाम मोर्चा तसेच धर्मनिरपेक्ष जनता दल या मित्रपक्षांच्या मदतीने भाजपाला सरकार स्थापन करावे लागले. त्यामुळे मोदी सरकारला यावेळी आपल्या मनासारखे राष्ट्रवादी निर्णय घ्यायला अडचणी येतील असे सुरुवातीला वाटले होते.

सरकारला पाठिंबा देणारे मित्रपक्ष आपल्या पाठिंब्यांची मनमानी किंमत वसूल करतील, असेही अनुमान होते. सरकारला पाठिंबा देणारे मित्रपक्ष मोदी सरकारला आपल्या तालावर नाचवतील, राष्ट्रवादी निर्णय घेण्यात अडथळा आणतील, असाही अंदाज होता. पण मोदी यांनी ते सर्व खोटे ठरवले. बहुमतात असताना मोदी सरकार जसे धडाडीचे निर्णय घेत होते, तसेच निर्णय आता अल्पमतात असतानाही घेत आहे. मोदींना कोणी आपल्या तालावर नाचवू शकत नाही. उलट मोदी म्हणतील तसेच मित्रपक्षांना नाचावे लागेल, हे वक्फ दुरुस्ती विधेयकावरील मतदानातून दिसून आले.

वक्फ दुरुस्ती विधेयकाला भाजपाच्या जवळपास सर्वच मित्रपक्षांचा विरोध होता. कारण या बहुतांश पक्षांचे राजकारण मुस्लिम मतांच्या आधारावर चालत होते आणि चालत आहे. त्यातच या वर्षाच्या अखेरीस बिहारमध्ये विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यामुळे काही राजकीय पक्षांसाठी वक्फ दुरुस्ती विधेयकाला पाठिंबा देणे राजकीयदृष्ट्या अडचणीचे होते. मात्र मोदी सरकारचे चाणक्य केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भाजपाच्या सर्व मित्रपक्षांना विधेयकाच्या बाजूने मतदान करायला तयार केले. त्यामुळे लोकसभेत विधेयकाच्या बाजूने २८८ मते पडली. राज्यसभेतही विधेयकाच्या बाजूने १२८ जणांनी मतदान केले. हा राजकीय चमत्कार म्हटला पाहिजे. वक्फ दुरुस्ती विधेयक विनाअडथळा पारित होईल, याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी पूर्णपणे आश्वस्त होते. त्यामुळे विधेयकावर लोकसभेत तसेच राज्यसभेत चर्चा आणि मतदान सुरू असताना मोदी श्रीलंका आणि थायलंडच्या दौऱ्यावर निघून गेले. एखाद्या मुद्यावर आपल्या सहकाऱ्यांवर विश्वास कसा टाकायचा हे मोदी यांनी यातून दाखवून दिले. त्यामुळे वक्फ दुरुस्ती विधेयक पारित होणे ही मोदी सरकारची आतापर्यंतच्या कार्यकाळातील सर्वांत मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे.

राष्ट्रवादी संघटनांचा जो एजेंडा होता, तो आतापर्यंत जवळपास ८० टक्के पूर्ण झाला आहे. आता फक्त मोदी सरकारच्या दोन-तीन निर्णयांकडे सगळ्यांचे लक्ष राहणार आहे, ते म्हणजे समान नागरी कायदा आणि गोहत्या बंदी. उत्तराखंड सरकारने त्याची सुरुवात केली आहे. समान नागरी कायदा लागू करणारे उत्तराखंड देशातील तसेच भाजपाशासित म्हणूनही पहिले राज्य ठरले आहे. गुजरातनेही समान नागरी कायद्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. अयोध्येत राममंदिर झाल्यानंतर मथुरेतेही कृष्णजन्मभूमी तसेच काशी विश्वनाथ मंदिराबाबतची जुनी घोषणा पूर्ण होणार का, याबाबत उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे. समान नागरी कायद्यानंतर सगळ्यांचे लक्ष आता नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स(एनआरसी) कडे राहणार आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी २०२० मध्ये लोकसभेत बोलताना पूर्ण देशात एनआरसी लागू करण्याची घोषणा केली होती. विशेष म्हणजे २०१३ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेच एनआरसीची आवश्यकता प्रतिपादित केली होती.

जवळपास आपल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात मोदी सरकारने जेवढे राष्ट्रवादी निर्णय घेतले, तेवढे याआधी कोणत्याच सरकारला घेता आले नाहीत. त्या सरकारांनी मतांच्या राजकारणासाठी तशी हिंमत केली नाही आणि दाखवलीही नाही. बिहारमध्ये यावर्षीच्या अखेरीस विधानसभा निवडणूक असल्यामुळे मोदी सरकार वक्फ दुरुस्ती विधेयक लांबणीवर टाकेल, अशीही चर्चा होती. पण व्यापक समाजहित आणि राष्ट्रहितासमोर आम्ही राजकीय हित पाहात नाही, हे मोदी सरकारने दाखवून दिले. आधी देश, मग पक्ष आणि सर्वांत शेवटी व्यक्ती ही भाजपाची विचारधारा आहे. देशाच्या हिताचा निर्णय घेताना पक्षाच्या हिताचा विचार करायचा नाही, हे वक्फ दुरुस्ती विधेयकातून मोदी सरकारने दाखवून दिले. विशेष म्हणजे हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत सरकारने व्यापक चर्चेनंतर पारित होऊ दिले. दोन्ही सभागृहांत चर्चेसाठी प्रत्येकी आठ तासांचा वेळ ठरला असताना तेरा, चौदा तास चर्चा झाली. ज्यांना ज्यांना या विधेयकावर बोलायचे होते, अगदी विरोधात बोलायचे होते, त्यांनाही बोलण्याची संधी मिळाली. तरीही संसदेने हे विधेयक घाईगर्दीने आणि जबरदस्तीने पारित केले, असा हास्यास्पद आरोप काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांनी संसदभवन परिसरात केला. सोनिया गांधींनी यासाठी बुलडोझ असा शब्द वापरला. विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी तर गांधी घराण्याच्या प्रतिनिधी म्हणून प्रियांका वढेरा यांनी लोकसभेत तर सोनिया गांधी यांनी राज्यसभेत या विधेयकावर बोलायला पाहिजे होते, विधेयकाला विरोध करायला पाहिजे होता. पण या विधेयकावर बोलायची हिंमत या तिघांची झाली नाही. त्यामुळे हे विधेयक घाईगर्दीत आणि जबरदस्तीने पारित झाले, असा आरोप करायला सोनिया गांधींना तोंडच नाही, कारण त्यांनी राज्यसभेत आपले तोंड उघडलेच नाही. या विधेयकावरील मतदानाने देशात राष्ट्रवादी पक्ष आणि राष्ट्रविरोधी पक्ष सरळसरळ उभी फूट पडली आहे. याची किंमत राष्ट्रविरोधी पक्षांना दीर्घकाळ चुकवावी लागणार आहे.

९८८१७१७८१७

### महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना श्रेणी सुधारची संधी मिळावी

गोंडवाना विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना श्रेणी सुधार करण्यासाठी संधी मिळावी असा विद्यार्थिहिताचा प्रस्ताव विद्यापीठाच्या सिनेट सदस्यांनी अधिसभेत (सिनेट) नुकताच मांडला व तो सर्वानुमते मंजूर सुद्धा करण्यात आला. श्रेणी सुधाराची संधी लागू झाल्यास अनेक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोठा फायदा होईल, प्रस्तावाबद्दल व एकमताच्या मंजुरीबद्दल सर्व सदस्यांचे अभिनंदन. यानिमित्ताने श्रेणी सुधार हा विषय चर्चेला आला. मुळात दहावी, बारावीमधील विद्यार्थ्यांना श्रेणी सुधाराची (पुन्हा परीक्षा देऊन गुण/टक्के सुधारण्याची-वाढवण्याची संधी) संधी मिळते. परंतु विद्यापीठातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सुद्धा अशी सुविधा आहे? अशी अनेकांना खबर सुद्धा नाही. असेल तर त्याची माहिती, त्याच्या नियमावलीचा थांगपत्ता नाही. अनेक स्पर्धा परीक्षा, खाजगी संस्था, कंपनी किंवा अनेक ठिकाणी पुढील शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी शैक्षणिक गुण/टक्केची अट मागितली असते. एखाद्याला काही कारणाने अपेक्षित गुण/टक्के मिळवता आले नाही, आरोग्याच्या कारणाने किंवा आपत्कालीन परिस्थितीमुळे परीक्षेत उत्तीर्ण होऊन सुद्धा कमी गुण/टक्के मिळाले तर त्याला पुन्हा एकदा त्याच परीक्षेला पाहिजे असलेल्या विषयाच्या परीक्षेला बसण्याची संधी मिळावी त्यातून आपल्या गुणांत/टक्केवारीत सुधार, वाढ करण्याची संधी मिळावी असा हा या श्रेणी सुधार सुविधेचा फायदा. परंतु या सुविधेची अनेक विद्यार्थ्यांना सोडा परंतु अनेक प्राध्यापकांना, विद्यापीठात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुद्धा माहिती नसते,आणि ज्यांना माहिती आहे त्यांना त्याची पद्धत आणि नियमावली माहिती नसते. खरंतर अशा सुविधेची माहिती प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अध्यादेश, मार्गदर्शिकित द्यायला हवी. महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना श्रेणी सुधार सुविधेची संधी मिळावी यासाठी योग्य ती नियमावली व स्पष्टता येणे आवश्यक आहे.

**वैभव बावनकर**/ ९५४५७४५५८०

### खंत नको, नको पश्चात्ताप

परमेश्वराने माणसाला माणूस म्हणून जन्माला घातले, हेच खरे माणसाचे भाग्यवान असल्याचे प्रमुख लक्षण आहे. आपण भाग्यवान आहोत या गोष्टीची जाणीव सदैव असायला हवी आणि अंतिम श्वासापर्यंत देवघरातील पणतीप्रमाणे ती तेवत ठेवायला हवी. तेव्हाच आपल्या हातून देशकार्य, धर्मकार्य, सत्कार्य घडेल आणि आपण आजन्म भाग्यवान असल्याची अनुभूती येईल. आजच्या काळात प्रत्येक माणसाच्या मनात दुसऱ्याला न सांगता येणारी एक खंत आहे आणि कुण्या तरी एका गोष्टीचा पश्चात्ताप मनात ठाण मांडून बसला आहे. त्यामुळे आपल्याला वाटतं, आपण घेतलेले निर्णय चुकले काय?

भूतकाळात जर आपण तसे केले असते, तर आज असे झाले असते. माझ्या आयुष्यात मला हवं तसं घडलं असतं तर माझ्यासारखा भाग्यवान मीच, पण प्रत्यक्ष जीवनात, जर तरच्या भावनांना अर्थ नसतो. कारण मानवी आयुष्यात जे परमेश्वराला घडवायचं असतं तेच नेमकं घडतं. हे समाजात घडत असलेल्या अकल्पनीय, अविश्वसनीय घटनांवरून लक्षात येते.

स्वत:च्या रंग, रूप, शारीरिक ठेवण, बुद्धिमत्ता याविषयी मनात एक खंत ही दडलेली असेल, पण तीव्र इच्छा असून देखील तुम्ही यापैकी काहीही एक बदलवू शकले नाहीत. जे काही प्राप्त झाले ते त्या स्वरूपातच निमूटपणे स्वीकारावे लागले, यालाच म्हणतात प्रारब्ध. जे कुणीही बदलवू शकत नाही. माझ्या मतानुसार प्रत्येक माणसाचा जन्म एका विशिष्ट कार्यासाठी झाला असावा असे वाटते. कारण त्रेतायुगात धर्मरक्षक श्रीप्रभू रामचंद्राचा जन्म राक्षसांचा संहार करण्यासाठी व धर्मरक्षणासाठी झाला होता व त्या युगातील माणसांचा जन्म रामकार्य पूर्णत्वास नेण्यासाठी झाला होता असा अर्थपूर्ण विचार केला तर आपला जन्म सुद्धा प्रभू कृपेने एका विशिष्ट कार्यासाठी झाला आहे. हा दृढ विश्वास ठेवायला हरकत नाही.

**विजय शंकरराव इंगोले**/ जुनी वस्ती, बडनेरा

## वाचक पत्रे

### घरच शासकीय देखरेखीत बांधून द्यावे!

घरकूल लाभार्थींसाठी पाच ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून देण्यात निर्णय शासनाने घेतलाय खरा, निर्णय स्तुत्य आहे याबद्दल वाद नाही परंतु एवढ्या तुटपुंज्या वाळूत घर तयार होईल का हा खरा प्रश्न आहे. शिवाय चढत्या महागाईत, घर साहित्याचे वाढते दर, बांधकाम कारागीर, मजुरांची मजुरी हे सारे पाहता आवास योजनेतून मिळणारे मंजूर अनुदान इतके अल्प ठरते की कितीही ओढून ताणून घर बसविण्याचा प्रयत्न केला तरी अपुऱ्या अनुदानामुळे घराचे काम काहीतरी अपूर्ण राहते, साहजिकच त्या गरिबाला घर पूर्ण न झाल्याचा मनस्ताप तर होतोच, त्याची केविलवाणी परिस्थिती होते आणि आनंदाऐवजी विवंचना मात्र सतावत राहते. म्हणूनच एक तर लाभार्थींना योजनेअंतर्गत शासनस्तरावर परिपूर्ण घरच तयार करून त्यांच्या स्वाधीन केल्यास लाभधारकास विवंचना, चिंता, काळजी राहणार नाही अथवा आजच्या महागाईनुसार, घरसाहित्याचा बाजारभाव विचारात घेऊन निदान अनुदानात वाढ करण्यात आल्यास ते त्याला सुसह्य होईल. परिपूर्ण झालेल्या घराचे समाधान, आनंद मिळेल अशी अपेक्षा.

**विश्वनाथ पंडित**/ ९५८८४५०४४२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जिया व ममता म्हेत्रे यांच्या मृत्यूची सखोल चौकशी व्हावी

## अन्यथा गरिबांचा हा आक्रोश मंत्रालयापर्यंत नेणार

## शिवसेना शिंदे गटाच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांचा इशारा



**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

मोदी भागातील बाबू जगजीवन राम झोपडपट्टी येथील जिजा व ममता मेहत्रे यांच्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करावी या परिसरात आवश्यक उपाययोजनेसह घरकुल व इतर सोयी सुविधा तत्काळ उपलब्ध करून द्याव्यात. प्रशासनाने कोणालाही पाठीशी घालू नये. प्रशासनाने हात वर केल्यास गरिबांचा हा आक्रोश मंत्रालयापर्यंत नेणार असल्याचा इशारा शिवसेना शिंदे गटाच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी दिला आहे.

मोदी भागातील जगजीवनराम झोपडपट्टी मधील मयत झालेल्या त्या दोन्ही मुलींच्या मृत्यू घटनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे व पदाधिकारी यांनी आज महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेतली. यावेळी झोपडपट्टीतील लहान मुलांसह महिला व नागरिक दूषित पाण्याने भरलेल्या बाटल्या घेऊन उपस्थित होते. दरम्यान, त्यानंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या.

प्रा. डॉ. ज्योती वाघमारे म्हणाल्या, बाबू जगजीवनराम झोपडपट्टीमध्ये माझा जन्म झाला. तेथील उघड्या गटारीवर बसून अभ्यास केला होता. चाळीस वर्षात जग चंद्रावर गेले मात्र येथील झोपडपट्टीची परिस्थिती बदललेली नाही अशी खंत व्यक्त केली. येथील दोन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही गंभीर बाब आहे. या ठिकाणी उघड्या गटारी वरती ड्रेनेज लाईन टाकली. ही लाईन वर टाकण्यात आली. कमी इंचांची लाईन टाकली. पाऊस तर सोडाच नळाला पाणी आले तरी ही ड्रेनेज लाईन तुंबते. गटारातील घाण पाणी हा घरात शिरते अशा परिस्थितीत येथील लोक जगतात. एका खोलीच्या घरात राहणारी ही माणसे आहेत. या ठिकाणी येणाऱ्या पिण्याच्या पाण्यात आळ्या झाल्या आहेत. ड्रेनेज पाईप लाईन टाकताना व्यवस्थित टाकली गेली नाही. त्या मक्तेदारावर कारवाई करून काळ्या यादी टाकावे, अशी मागणी प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी केली. दरम्यान, महापालिकेत कार्यालया बाहेर बाबू जगजीवनराम झोपडपट्टीतील लहान मुलांनी विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडला. जिया व ममता ताईंना न्याय मिळालाच पाहिजे. शुद्ध पाणी द्या, असा आक्रोश लहान मुलांनी यावेळी केला. यावेळी युवासेनेचे जिल्हा प्रमुख प्रियदर्शन साठे, दिपक पाटील, गणेश तूपदोळे, जगन वाघमारे, मंगेश जांगडेकर आणि पक्षाचे पदाधिकारी , महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मयत मुलींच्या कुटुंबियांचे केले सांत्वन

मोदी भागातील जगजीवनराम झोपडपट्टी मधील मयत झालेल्या त्या दोन्ही मुलींच्या कुटुंबीयांची शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा.डॉ. ज्योती वाघमारे व पदाधिकारी यांनी सायंकाळी भेट घेतली व त्यांचे सांत्वन केले. त्या भागातील नागरिकांच्या अडचणी व मागण्या ऐकून घेतल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्याचा शब्द दिला. दोन्ही परिवारास आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. त्या कुटुंबातील इतर मुलीचे शिक्षण आणि कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासनही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले असल्याचे ज्योती वाघमारे यांनी सांगितले.

### न्याय मिळेपर्यंत हा एल्गार

बाबू जगजीवनराम झोपडपट्टी परिसरातील ड्रेनेज लाईन आणि नाले सफाई करावी. रमाई आवास योजनेतून घरे मिळावीत प्रत्येकाची आरोग्य तपासणी करण्यात यावी. आणखी बळी जाऊ नये याची महापालिका प्रशासनाने दक्षता घ्यावी. पाण्यासाठी जीव जात आहे. माणूस म्हणून जगण्यासाठी लढा द्यावा लागत आहे. तेव्हा न्याय मिळेपर्यंत हा एल्गार सुरू राहील, असा इशारा प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी दिला.

### कुणाला क्लीन चीट देण्याचा प्रयत्न होत आहे?

जिया व ममता म्हेत्रे यांच्या मृत्यूची सखोल चौकशी करावी. प्रशासनाने कोणालाही पाठीशी घालू नये. अचानक डेंगूसदृश्य कारणाने मृत्यू झाला असल्याचा रिपोर्ट येणे, यात कुणाला क्लीन चीट देण्याचा प्रयत्न होत आहे ? खोटं बोलले जात आहेत असा आरोप यावेळी प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी केला. येथे आरोग्य सुविधा असती तर त्या दोघींचे प्राण वाचले असते, असेही त्या म्हणाल्या.

### कोरडा दिवस कसा पाळायचा?

महापालिका प्रशासनाकडून कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन करण्यात येत आहे मात्र या झोपडपट्टीमध्ये आठ दिवसांनी पाणी येते. साठवण क्षमता कमी आहे अशा परिस्थितीत कोरडा दिवस कसा पाळायचा असा सवाल यावेळी प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी उपस्थित केला.

## महत्वाचे...



### जिजामाता शाळेत सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

जिजामाता प्राथमिक शाळा व जिजामाता बालक मंदिर तुळशीदासनगर कोंडी येथील इयत्ता सातवी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ व प्रमुख अतिथी म्हणून सचिवा शिल्पा ठोकळ, ग्राम पंचायत सदस्या सुप्रिया भोसले उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांचे मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलु यांच्या हस्ते स्वागत व सत्कार करण्यात आले इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्याकडून शाळेस अग्निशामक उपकरण व पाण्याचे जार भेट देण्यात आले. यावेळी सचिन ठोकळ, शिल्पा ठोकळ व चंद्रकांत कुंटेलु यांनी मार्गदर्शन झाले. सूत्रसंचालन इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी केले.

### रामनवमी निमित्त स्वरध्यास संगीत विद्यालयातर्फे आज गीतरामायण

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

स्वरध्यास संगीत विद्यालयातर्फे रामनवमी निमित्ताने गुरुवार १० एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता अँम्फी थिएटर (लोकमान्य टिळक सभागृह),हिराचंद नेमचंद वाचनालय येथे ''गीत रामायण'' कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला व मोफत आहे. तरी सर्व सोलापूरकरांनी याचा आवर्जुन लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.



### माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचा वाढदिवस साजरा

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्याचे माजी गृहराज्यमंत्री तथा अक्कलकोट स्वामी समर्थ नगरीचे माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांचा वाढदिवस जोडभावी पेठे येथील कार्यालयात साजरा करण्यात आला आला. याप्रसंगी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने प्रसिद्धी प्रमुख सातलिंग शटगार यांनी म्हेत्रे यांचा सत्कार केला. यावेळी बोलताना सातलिंग शटगार म्हणाले, सिद्धाराम म्हेत्रे हे अक्कलकोट तालुक्याचे भाग्यविधाते असून ते चार वेळा आमदार राहिलेले आहेत. त्यांच्या कारकीर्दीमध्ये त्यांनी अनेक विकासाची कामे केलेली आहेत. अक्कलकोट तालुक्याचा कायापालट त्यांनी त्यावेळी केले. कुरनूर धरण बांधून शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांनी मिटवले असे अनेक प्रश्न त्यांच्या मार्गी लावले आहेत. ते आज जरी आमदार नसले तरी ते जनतेच्या मनातील आमदार म्हणून त्यांची ख्याती आहे. याप्रसंगी अशपाक बळोरगी, मल्लिकार्जुन पाटील, रमेश हसापुरे, डॉ. मंगेश शहा, जहांगीर शेख, माजी नगरसेवक दत्तू बंदपट्टे, धनेश अचलारे, मोहन मानशेट्टी, अभिलाष अच्युतघटला, शंकर गायकवाड, कुंडलिक जाधव, उत्तमकुमार वाघमारे उपस्थित होते.



### कोठारी प्रशालेत विश्व नवकार महामंत्र दिवस साजरा

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

न. फू. शहा कोठारी प्रशालेत विश्व नवकार महामंत्र दिवस साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत शहा, सचिव अजितनाथ उपाध्ये, विश्वस्त बाहुबली उपाध्ये, मुख्याध्यापक रमेश यादवाड उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून भगवान महावीरांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. यावेळी ५४ वेळा णमोकार मंत्र पठण करून विश्व नवकार महामंत्र दिवस साजरा करण्यात आला. सूत्रसंचालन उपाध्ये यांनी करून आभार मानले.

Classifieds

**पाहिजेत**

नॅशनल मेडिकल, लष्कर येथे होलसेल व रिटेलमध्ये कामासाठी सेल्समन व डिलीव्हरी बॉय पाहिजेत.
संपर्कः
7219068881

**घर भाड्याने देणे आहे**

सुसज्ज आणि प्रशस्त 2 BHK 2 फ्लॅट शाकाहारी कुटुंबास भाड्याने देणे आहे. आयएमएस पासून जवळ श्री राम चौक, कासार सोसायटी, जुळे सोलापूर. २४ तास पाणी, शांत आणि सुसज्ज परिसर, सीसीटीव्ही आणि पार्किंगची सोय.
- संपर्क नंबर -
9860139889 / 9822162454

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# कामकाज सुसूत्रतेसाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांची कार्यशाळा

## अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी केले मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

सोलापूर महानगरपलिकेच्या वतीने दि. ३ ते १७ एप्रिल या कालावधीमध्ये आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील झाडूवाला,बिगारी, सफाई कामगार (रोजंदारी व बदली कामगारासह) या सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी कार्यशाळा दुपारी १२.३० ते १.३० या वेळेत घेण्यात येत आहे.

या कार्यशाळेस अतिरिक्त आयुक्त रवि पवार, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधिक्षक अनिल चराटे , संबंधित झोनचे मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक होते. घनकचरा व्यवस्थापन विभाग क्र.१ ते ८ कडील सर्व चतुर्थ श्रेणी सेवकांना दैनंदिन वेळेवर उपस्थित राहणे, स्वच्छता, झाडलोट, डिव्हाडरलगत व फुटपाथलगत साचलेली माती काढणे, डिव्हाडरमधील कचरा काढणे, डिव्हाडरमधील वाढलेली झाडे छाटणी करणे, सेवापुस्तक वेळेवर अद्यावत करून घेणे, रजेचे अर्ज वेळेवर जमा करणे इत्यादी कामकाजामध्ये सुसूत्रता येण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेमध्ये सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांचे मनोबल वाढविणे तसेच ते करीत असलेल्या चांगले स्वच्छता कामाची त्यांना शाबासकी थाप देण्यासाठी तसेच त्यांना सर्व सुरक्षा साहित्य वापरणे, नागरिकांशी व्यवस्थितपणे संवाद करणे आदी विषयांबाबत श्री. पवार यांनी कर्मचा-यांना मार्गदर्शन केले. आजतागायत झोन क्र.१ ते ३ ची क्षमता बांधणी कार्यशाळा घेण्यात आली आहे. झोन क्र.४ ते ८ चे नियोजन आहे.



# व्ही. जी. शिवदारे महाविद्यालयात जात पडताळणी शिबिर मार्गदर्शन

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून समता सेवा पंधरवडा आणि सामाजिक समता सप्ताहनिमित्त महाविद्यालयाच्या शैक्षणिक संकुलामध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी शिबिर उद्घाटन समारंभ झाला.

अध्यक्ष तथा अप्पर जिल्हा अधिकारी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अध्यक्षा मंजुषा मिसकर आल्या होत्या. विद्यार्थ्यांना प्रबोधित करताना त्या पुढे म्हणाल्या की, शिक्षण ,नोकरी आणि राजकारणासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी सर्व कागदपत्राची पूर्तता करून आपला अर्ज दाखल केला पाहिजे. याप्रसंगी संशोधन तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सचिन कवले यांनी जातीचा दाखला व जात पडताळणी साठी अर्ज कसा करायचा?आणि कुठे करावा?कागदपत्रे कोणती? त्याची पूर्तता कशी करायची? याची येथे इत्यंभूत माहिती दिली. शिबिराच्या दुसऱ्या पर्वामध्ये उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे रविंद्र कदम पाटील यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सुरुवातीस बार्टी प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे यांनी संविधानाच्या प्रास्ताविकचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. याप्रसंगी पार्टीच्या समता दुत अश्विनी सुपाते व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या गायकवाड उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मनोगत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर डी. एस. सुत्रावे यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापक सी.पी. उमरजकर यांनी केले तर आभार डॉक्टर डी. डी. बनसोडे यांनी मानले.

## श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात

# तृतीयपंथीयांचे वैद्यकीय तपासणी शिबिर



**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने समाजातील उपेक्षित व दुर्लक्षित समाज घटक असलेल्या वारांगणा व तृतीयपंथी यांच्यासाठी श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे दिनांक ०७.०४.२०२५ रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत अशा प्रकारच्या उपेक्षित व दुर्लक्षित समाज घटकांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिर राबवणारे डॉ.वै. स्मृ. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर हे महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय ठरले आहे.

मोफत वैद्यकीय शिबिरात ११२ महिला व २८ तृतीयपंथी यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय शिबिरामध्ये स्तन कर्करोग, लठ्ठपणा, थायरॉईड मोतीबिंदू, मुख आरोग्य, गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर तसेच शुगर, एच. आय. व्ही. इत्यादी तपासण्या करण्यात आल्या व रुग्णांना आभाकार्ड देण्यात आले. डॉ. विद्या तिरणकर, डॉ. अग्रजा चिटणीस, डॉ. औदुंबर मस्के, डॉ. पायल सैयम, डॉ. वैभव गोटे, डॉ. वैष्णवी, डॉ. श्रमा कोरेमोरे, डॉ. रायखेलकर, डॉ. शशिकला जगताप, श्री. जवंजाळ, श्री. राजू माने, श्री. स्वरूप इंदापुरे, ॲड. देवयानी किणगी, श्रीमती. रेणुका जाधव यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

**प्रसिध्दीकरण** — दि. कि. अर्ज नं. १०/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**

**१) श्रीमती रोहीणी केरबा क्षिरसागर,**
वय- ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. समर्थ कॉलनी,
बागवान प्लॉट आत्रीक ऋषी रोड,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर -- **अर्जदार**
**२) जीवन केरबा क्षिरसागर,**
वय १६ वर्षे, धंदा शिक्षण,
रा. सदर, अ.पा.क. अर्जदार नं. १
**विरूध्द**
**कोणी नाही** -- **सा.वाला**

**अर्ज भारतीय वारसा कायदा क. ३७२ प्रमाणे-**

ज्या अर्थी, यातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ चे वडिल मयत केरबा यशवंत क्षिरसागर हे दि. ता. २६/११/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. मयत केरबा यशवंत क्षिरसागर यांना सदर अर्जदार नं. १, २ हेच कायदेशीर व जवळचे वारस असल्याने, अर्जदार नं. १, २ यांनी मयत केरबा यशवंत क्षिरसागर यांचे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर अर्जदार नं. १, २ यांचे व्यतिरीक्त मयत केरबा यशवंत क्षिरसागर यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता.७/५/२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस प्रमाणपत्र देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्कयानिशी दिले असे. ता.३/४/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर बार्शी**
**ता. बार्शी**

# सोनी महाविद्यालयात विविध स्पर्धा उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ, पुणे संचलित देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालय येथे सोनी इंटरकॉलेज स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या मध्ये ॲप्टीट्युड टेस्ट, सी प्रोग्रॅमिंग, वेबसाईट डिझाईन, जनरल नॉलेज या चार स्पर्धा घेण्यात आल्या.

या स्पर्धेसाठी सोलापूर शहरातून १२ महाविद्यालयातून २५२ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष लक्ष्मीकांतजी सोमाणी, सदस्य जवाहरजी जाकेटिया, सदस्या उमाजी बलदवा, काननजी मिणीयार व महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. वासंती अय्यर, प्राचार्या प्रा. डॉ. आशा रोकडे, कॉम्प्युटर विभाग प्रमुख नवनाथ भंडारे हे सर्व मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या सर्वांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली.या कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. अरविंद बगले यांनी केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शरयु महाजन व आभार प्रदर्शन सुष्मिता इंगळे यांनी केले.

चारही स्पर्धा प्रत्येकी १०० मार्क व ७५ मिनिटे कालावधीत घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. वासंती अय्यर, प्राचार्या प्रा. डॉ. आशा रोकडे, विभाग प्रमुख प्रा. नवनाथ भंडारे व प्रा. अरविंद बगले यांच्या हस्ते ट्रॉफी, सर्टीफिकेट, रोख रक्कम प्रथम क्रमांकासाठी रु. १५००/- व व्दितीय क्रमांकासाठी रु. १२००/- देऊन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

### या विविध स्पर्धेचा निकाल(प्रथम दोन)

- **ॲप्टीट्युड टेस्ट स्पर्धा** - सादिया नदाफ (डी.एच.बी. सोनी कॉलेज), झायबुनीसा नदाफ (संगमेश्वर कॉलेज).
- **सी प्रोग्रॅमिंग स्पर्धा** - अंबादास गणपा- (के.पी. मंगळवेढेकर कॉलेज), योगेश कुरडुले (डी.एच.बी. सोनी कॉलेज)
- **वेबसाईट डिझाइन स्पर्धा** - सागर माशाळे (संगमेश्वर कॉलेज), झवेरिया मुजावर (ए.आर. बुर्ला कॉलेज) व अमन मर्चंट ( डी. एच.बी. सोनी कॉलेज).
- **जनरल नॉलेज स्पर्धा** : सुप्रित फुलारी ( व्ही. जी. शिवदारे कॉलेज), प्रथमेश झिंगाडे (डी.एच.बी. सोनी कॉलेज).

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सोलापूर येथील मध्यवर्ती रेल्वे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य) खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत.

| निविदा सूचना क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे किंमत | बयाणा पैसा | काम पूर्ण होण्याचा कालावधी | देखभाल कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 06-2025-SrDENC | 1-ADEN/KLBG अंतर्गत वाडी स्टेशनवरील C&W जुन्या आणि नवीन शेडमध्ये सुधारणा, 2-ADEN/KLBG अंतर्गत वाडी स्टेशनवरील TTE विश्राम गृहात सुधारणा, 3-पीएफ नंबर-1 वर COP चे PPGI शीट आणि व्हॅली गटर बदलणे आणि SUR स्टेशनवरील बुकिंग ऑफिस टॉयलेट ब्लॉकची दुरुस्ती. | रु. २,८०,७७,३२५.२६ | रु. २,९०,४००.०० | ०९ महिने | १२ महिने |
| www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. | | ३०.०४.२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत | | | |
| www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | | ३०.०४.२०२५ रोजी दुपारी ३:३० वाजता | | | |

या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट : www.ireps.gov.In.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य),
मध्य रेल्वे, सोलापूर

SUN 62 असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### इंडियन ॲरोज ज्युनियर्सचा कासा बरवानीवर विजय



**बंगळुरू :** इंडियन वुमेन्स लीग २०२४-२५ फुटबॉल स्पर्धेत बुधवारी आपल्या ब गटातील शेवटच्या साखळी सामन्यात इंडियन ॲरोज महिला ज्युनियर्सने कासा बरवानी एससीचा ८-० असा पराभव केला. पदुकोण-द्रविड सीएसई फेज २ मैदानावर खेळल्लया गेलेल्या या सामन्यात इंडियन ॲरोज मध्यंतरापर्यंत ५-० असा आघाडीवर होता. या सामन्यात अनुष्का कुमारीने (२८ २९, ४९) हॅटट्रिक केली, तर ॲरोजसाठी दिव्यानी लिंडा (१३), श्वेता राणी (१७), अभिस्ता बसनेट (२३), गुरलीन कौर (६८) आणि गुरनाझ कौरने (८८) प्रत्येकी एक गोल केला. इंडियन ॲरोजने आता चार सामन्यांतून नऊ गुण मिळवले आहेत आणि ते ब गटामध्ये तात्पुरते अव्वल स्थानावर आहेत. त्यांना आता बुधवारी दुपारी इंटर काशी आणि रूट्स एफसी यांच्यातील सामन्याच्या निकालाची वाट पाहावी लागेल. जर इंटर काशीने रूट्सविरुद्ध विजय मिळवला नाही, तर ॲरोजचे अंतिम फेरीतील स्थान निश्चित होईल. ॲरोजच्या आक्रमकांनी कासा बरवानी बचावफळीला मागे टाकत दिव्यानीने पहिला गोल केला. कर्णधार श्वेताने अनुष्काच्या पासवर संघाची आघाडी दुप्पट केली आणि अभिस्ताने तिसरा गोल गोल केला.

### अमेलिया केर, मॅट हेनरीला मिळाला सर्वोच्च सन्मान

**वेलिंग्टन :** बुधवारी झालेल्या २०२५ च्या न्यूझीलंड क्रिकेट पुरस्कारांमध्ये लेग-स्पिन अष्टपैलू अमेलिया केर आणि वेगवान गालंदाज मॅट हेनरीला अनुक्रमे महिला आणि पुरुष गटात सर्वोच्च सन्मान मिळाला. अमेलियाने सलग तिसऱ्या वर्षी अभूतपूर्व डेबी हॉकली पदक जिंकले, तर हेनरीने सर रिचर्ड हॅडली पदक जिंकले. २०२४ मध्ये संस्मरणीय कामगिरी केल्यामुळे अमेलियाने हा सर्वोच्च सन्मान जिंकला. तिला न्यूझीलंडमध्ये महिला टी-२० विश्वचषक जिंकून अंतिम फेरीतील खेळाडू व स्पर्धेतील खेळाडू म्हणून निवडण्यात आले. नंतर तिला आयसीसी महिला क्रिकेटपटू ऑफ द इयर सन्मानासाठी राहेल हेहो फ्लिंट ट्रॉफी देण्यात आली, तसेच तिला आयसीसी महिला टी-२० वर्षातील सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवडण्यात आले. न्यूझीलंड क्रिकेट पुरस्कारांमध्ये अमेलियाने महिला एकदिवसीय खेळाडू आणि महिला टी-२० आंतरराष्ट्रीय खेळाडू पुरस्कारही जिंकले. अष्टपैलू कामगिरीमुळे तिला सुपर स्मॅश महिला खेळाडू ऑफ द इयरचा किताबही मिळाला. दुसरीकडे, सर्व फॉरमॅटमध्ये दमदार कामगिरी केल्यानंतर हेन्रीने सर रिचर्ड हॅडली पदक मिळवले. भारताविरुद्धच्या ३-० च्या ऐतिहासिक मालिका विजयादरम्यान पाच कसोटी सामन्यांमध्ये २५ बळी टिपल्याबद्दल मॅट हेनरीने कसोटी खेळाडू ऑफ द इयरचा सन्मानही मिळवला.

### मॉण्टे कार्लो मास्टर्स टेनिस, ॲलेक्झांडर झ्वेरेव्हचा पराभव

**मॉण्टे कार्लो :** येथे सुरु असलेल्या मॉण्टे कॉर्लो मास्टर्स टेनिस स्पर्धेत दुसऱ्या फेरीत दुसऱ्या मानांकित अलेक्झांडर झ्वेरेव्हला सहकारी बिग-हिटर मॅतिओ बेरेतिनीकडून २-६, ६-३, ७-५ असा पराभव पत्करावा लागला. मॅतिओने अव्वल मानांकित जर्मनच्या खेळाडूविरुद्धच्या आपल्या पहिल्या मॅच पॉइंटवर विजय मिळवला. मी मागील दिवसांपासून फोरहॅण्ड व सर्व्हिस मारत नव्हतो. मात्र या सामन्यात मी अधिक आक्रमक खेळलो, असे मॅतिओ म्हणाला. मॅतकिओने मातीच्या कोर्टवर आपल्या गत १८ पैकी १७ सामने जिंकले आहेत. गत वर्षी फ्रेंच ओपन उपविजेता झ्वेरेव्हने वर्षाच्या पहिल्या मोठ्या क्ले-कोर्ट स्पर्धेत पाचव्या गेममध्ये नेटवर स्लाईस केलेल्या बॅकहॅण्ड व्हॉलीने पॉइंट जिंकून प्रेक्षकांना आकर्षित केले. बेरेतिनीने निर्णायक सेटच्या सातव्या गेममध्ये ब्रेक मारला आणि नंतर सामन्यासाठी ५-४ असा सर्व्हिस केला, परंतु झ्वेरेव्हला परत ब्रेक मिळाला.

### बीएफआयचा कारभारावर देखरेख करण्यासाठी अंतरिम समिती स्थापन

**लॉसाने :** भारतीय मुष्टियुद्ध भागधारकांनी राष्ट्रीय संस्थेच्या कारभाराबाबत चिंता व्यक्त केल्या आहेत, अशा विनंत्यांनंतर जागतिक मुष्टियुद्ध संघटनेने भारतीय मुष्टियुद्ध महासंघाच्या (बीएफआय) च्या कारभारावर देखरेख करण्यासाठी एक अंतरिम समिती स्थापन केली आहे. जागतिक मुष्टियुद्ध संघटनेला भारतीय मुष्टियुद्ध भागधारकांकडून भारतात मुष्टियुद्धामध्ये स्थिरता आणण्यासाठी व जागतिक मुष्टियुद्धाच्या कायद्यांशी व दृष्टिकोनाशी सुसंगत अंतरिम चौकटीची आवश्यकता असल्याची विनंती प्राप्त झाली आहे, असे जागतिक मुष्टियुद्ध संघटनेने ७ एप्रिल रोजी अध्यक्ष अजय सिंग यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

# बंगळुरू, दिल्ली सामना चुरशीचा होणार

**बंगळुरू, ९ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात गुरुवारी येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू व दिल्ली कॅपिटल्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. दोन्ही संघांची सहा अशी समान गुणस्थिती पाहता हा सामना चुरशीचा होण्याची शक्यता आहे.

दिल्ली कॅपिटल्सने तीन सामन्यांमधून तीन विजय मिळवले, तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने चार सामन्यांमधून तीन विजय मिळवले आहेत. दिल्ली व बंगळुरुचे प्रत्येकी ६ गुण असून ते अनुक्रमे अव्वल व तिसऱ्या स्थानावर आहेत.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने कोलकाता, चेन्नई आणि मुंबईसारख्या वेगळ्या परिस्थितीत प्रभुत्व मिळवले आहे व त्यांचा एकमेव पराभव गुजरात टायटन्सविरुद्ध घरच्या मैदानावर झाला. दिल्ली संघाविरुद्ध खेळताना त्यांना अधिक सजग असावे लागणार आहे. कारण दिल्लीने विशाखापट्टणम् व चेन्नईच्या खेळपट्टीवर विजय मिळवला आहे. पण



आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदार



दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेल

यजमान आरसीबी संघ आत्मविश्वासाने भरलेला असेल, कारण स्टार फलंदाज विराट कोहली जबरदस्त फॉर्मात आहे. आरसीबीने गुजरातविरुद्ध खेळलेलासंघ कायम राखला, तर कोहलीचा फॉर्म आरसीबीसाठी महत्त्वाचा ठरेल.

**कोहली विरुद्ध स्टार्क, कुलदीप**

३६ वर्षीय कोहलीला या सामन्यात दोन घातक गोलंदाज- वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क व डावखुरा फिरकी गोलंदाज कुलदीप यादवचा सामना करावा लागणार आहे. कोहलीने ३१ चेंडूत ७२ धावा केल्या आहेत, परंतु ऑस्ट्रेलियन खेळाडू या हंगामात तीन सामन्यांत ११ च्या सरासरीने नऊ बळी घेत चांगल्या स्थितीत आहे.

पॉवर प्लेमध्ये स्टार्कविरुद्ध कोहलीची लढाई आरसीबीच्या सुरुवातीच्या गोलंदाजीवर मोठा प्रभाव पाडेल. कोहली व कुलदीप यादव यांच्यादरम्यान जुगलबंदी बघावयास मिळणार आहे.

यामुळे त्याला स्लो बॉलरविरुद्ध अधिक मोकळेपणाने फलंदाजी करण्याची संधी मिळाली आहे आणि कुलदीपच्या असंख्य युक्त्या वरिष्ठ खेळाडूंना आव्हान देतील, विशेषतः उजव्या हाताच्या गोलंदाजाला.

फॉर्ममध्ये असलेला आरसीबी कर्णधार रजत पाटीदारचीही मोठी भूमिका असेल, कारण तो फिरकीचा एक उत्कृष्ट खेळाडू आहे आणि त्या संदर्भात, दिल्लीला डावखुरा फिरकी गोलंदाज अक्षर पटेलकडून मोठ्या योगदानाची अपेक्षा असेल.

दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेलने तीन सामन्यांमध्ये केवळ आठ षटके गोलंदाजी केली आहे व अद्याप एकही बळी टिपला नाही.

**आरसीबीच्या नवीन चेंडू गोलंदाजांचा प्रभाव**

जोश हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमारने पॉवर प्लेमध्ये आरसीबीला त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांवर नियंत्रण मिळवून दिले आहे. येथील परिस्थिती पूर्णपणे जाणणाऱ्या के. एल. राहुलला शांत ठेवून त्यांना दिल्लीविरुद्ध पुन्हा एकदा चांगली कामगिरी करावी लागेल. दिल्ली संघ चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या गत सामन्यात न खेळणाऱ्या फाफ डू प्लेसिसच्या तंदुरुस्तीवरही बारकाईने लक्ष ठेवेल. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. दिल्ली कॅपिटल्स**
**स्थळ :** एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू
**वेळ :** सायं. ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल मॅक्सवेलला दंड

**चेन्नई, ९ एप्रिल**

मंगळवार रात्री चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या (सीएसके) सामन्यात आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल पंजाब किंग्जचा (पीबीकेएस) अष्टपैलू खेळाडू ग्लेन मॅक्सवेलला त्याच्या सामन्याच्या मानधनाच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे आणि त्याच्या रेकॉर्डमध्ये एक डिमेरिट पॉइंटही टाकण्यात आला आहे.



आयपीएलने त्याच्या गुन्ह्याचे नेमके स्वरूप जाहीर केलेले नसले तरी, एका निवेदनात म्हटले आहे की मॅक्सवेलने कलम २.२ अंतर्गत लेव्हल १ चा (सामनादरम्यान फिक्स्चर व फिटिंग्जचा गैरवापर) गुन्हा मान्य केला आहे आणि सामनाधिकाऱ्यांनी सुनावलेली शिक्षा स्वीकारली आहे.

पंजाब किंग्जचा पुढील सामना शनिवारी हैदराबाद येथे सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) विरुद्ध आहे. (वृत्तसंस्था)

# विजयवीर, सुरुचीचा सुवर्णभेद

### विश्वचषक नेमबाजी

### भारताला ४ सुवर्णांसह सहा पदके

**ब्यूनस आयर्स, ९ एप्रिल**

पॅरिस ऑलिम्पिकपटू विजयवीर सिद्धूने येथे पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड-फायर पिस्तूल अंतिम फेरीत विजय नोंदवित आयएसएसएफ विश्वचषकात भारताला चौथे सुवर्णपदक मिळवून दिले. तत्पूर्वी, सुरुची इंदर सिंगने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. भारताने आता चार सुवर्णपदके, एक रौप्य व एक कांस्यपदकासह एकूण सहा पदके जिंकली आहेत




सुवर्णपदक दाखवताना विजयवीर सिद्धू व सुरुची सिंग

विजयवीरने रोमांचक अंतिम फेरीत २९ गुणांसह अनुभवी इटालियन रिकार्डो मझाट्टीला हरवले. विजयवीरने आठ मालिकांमध्ये पाच रॅपिड-फायर शॉट्समध्ये एका शॉटने रिकार्डोला मागे टाकले. चनच्या यांग युहाओने कांस्यपदक जिंकले.

मी गुरप्रीत सर, अनिश व इतरांसोबत यापूर्वी राष्ट्रीय स्पर्धांमध्ये, चाचण्यांमध्ये अनेक अंतिम फेरी खेळलो आहे. त्याचा मला या स्पर्धेत फायदा झाला. निश्चय केल्यानुसार मी या स्पर्धेत चांगली कामगिरी केली आहे, असे विजयवीर अंतिम फेरीनंतर म्हणाला.

भारतीय खेळाडूची पहिली मालिका कठीण होती, त्याने केवळ एक हिट मारली, पाचव्या मालिकेत तो अव्वल स्थानावर पोहोचला आणि मॅझेट्टीला दोन गुणांनी मागे टाकले. नंतर इटालियन खेळाडूने मुसंडी मारली व त्याने सहाव्या मालिकेनंतर भारतीय खेळाडूशी बरोबरी साधली, त्यामुळे दोघांनीही आपले पदक निश्चित केले. दरम्यान, कांस्यपदकाची लढाई यांग आणि चिर्युकिन यांच्यात होती, यात यांगने शूट-ऑफद्वारे बाजी मारली. (वृत्तसंस्था)

# मला परिस्थितीनुसार खेळायचे असते : कोहली

**नवी दिल्ली, ९ एप्रिल**

फलंदाजी करणे ही काही अहंकाराची बाब नाही. सामन्याच्या परिस्थितीनुसार खेळणे आणि अहंकाराला आवर घालणे हे माझ्या फलंदाजीचे मुख्य तत्व आहे, असे स्टार क्रिकेटपटू विराट कोहली म्हणाला.

आधुनिक युगातील सर्वात यशस्वी फलंदाजांपैकी एक असलेला कोहलीने अलीकडेच आणखी एक टप्पा ओलांडला व टी-२० मध्ये १३ हजार धावा करणारा पहिला भारतीय खेळाडू झाला.

फलंदाजी कधीच अहंकाराची नसते. ती कधीही कोणावरही छाप टाकण्याचा प्रयत्न करण्याबद्दल नसते. ती नेहमीच खेळाची परिस्थिती समजून घेण्याबद्दल असते. मला सामन्याच्या परिस्थितीनुसार खेळायला आवडते, असे कोहली म्हणाला. जर मी लयीत असेल व सामन्याच्या प्रवाहात असेल, तर मी स्वाभाविकपणे पुढाकार घेईल, पण जर दुसरे कोणी नेतृत्व करण्यास योग्य स्थितीत असेल तर ते ते करतील, असेही तो म्हणाला.



३६ वर्षीय कोहली आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याने २५६ सामन्यांत ८ शतकांसह ८१६८ धावा केल्या आहेत. कोणत्याही फलंदाजाकडून केलेली ही सर्वोत्तम कामगिरी आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसोबतच्या माझ्या पहिल्या तीन वर्षांत, मला वरच्या क्रमात फलंदाजी करण्याची फारशी संधी मिळाली नाही. मला सहसा तळाच्या क्रमांकावर पाठवले जात असे. त्यामुळे, मी आयपीएलमध्ये मोठ्या प्रमाणात कामगिरी करू शकलो नाही, असेही तो म्हणाला.

२०१० पासून मी आयपीएलमध्ये अधिक सातत्यपूर्ण कामगिरी करू लागलो आणि २०११ पर्यंत मी नियमितपणे तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करू लागलो. तेव्हापासून आयपीएलमध्ये धावसंख्येला आकार मिळाला. आयपीएलमध्ये १८ वर्षे घालवल्यामुळे मला क्रिकेटच्या सर्वात लहान आवृत्तीत आपले कौशल्य वाढण्यास मदत झाली, असेही तो म्हणाला.

आयपीएल तुम्हाला एका अनोख्या पद्धतीने आव्हान देते कारण स्पर्धा कशी रचलेली असते. ती लहान द्विपक्षीय मालिकेसारखी नसते, ती अनेक आठवड्यांपर्यंत असते आणि गुणतालिकेवरील तुमचे स्थान सतत बदलत राहते. सतत बदलणाऱ्या परिस्थितीमुळे वेगवेगळ्या प्रकारचे दबाव येतात, असे तो म्हणाला.

स्पर्धेचे हे गतिमान स्वरूप खेळाडूला मानसिक व स्पर्धात्मक करते, त्यामुळे मला माझे टी-२० कौशल्य सतत सुधारण्यास व विकसित करण्यास प्रेरित करते, असे त्याने नमूद केले. (वृत्तसंस्था)

# श्रीवल्लीचा पदार्पणात विजय

**पुणे, दि. ९ एप्रिल-**

देशासाठी माझा पहिला सामना खेळणे खरोखरच भावनिक होते. मी कोर्टवर थोडी भावनिक होती, पण नंतर मला वाटते की मी स्वतःला चांगले हाताळले. संघ व कर्णधाराने मला प्रोत्साहन देऊन खूप मदत केली. प्रेक्षकांनीही प्रत्येक गुणासाठी आमचे समर्थन केले. त्यामुळेच सामना जिंकण्यास मदत झाली, असे श्रीवल्ली भामिदीपती म्हणाली. येथे सुरु असलेल्या बिली जीन किंग चषक टेनिस स्पर्धेत भारतासाठी पदार्पणाच्या विजय नोंदविल्यानंतर ती माध्यमाशी बोलत होती.

मी कोर्टवर फारशी भावनिक नव्हती, परंतु विजयानंतरची भावना अवास्तव होती, असे हैदराबादची २३ वर्षीय श्रीवल्ली म्हणाली. मी केवळ खेळत असलेल्या प्रत्येक गुणावर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करत होती व प्रत्येक गुणात माझे सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करत होती, तसेच केवळ देशाचा विचार करत होती, असेही ती म्हणाली. विजयानंतर मी माझ्या सहकाऱ्यांना मिठी मारली तेव्हाची भावना अवास्तव होती. आम्ही सर्वजण वैयक्तिक खेळाडू असल्यमुळे आम्ही एक संघ म्हणून खेळण्यासाठी आलो आहोत आणि गत आठवड्यात आम्ही जितके एकत्र आलो आहोत ते खरोखरच सर्वांसाठी खूप चांगले व खरोखरच रोमांचक आहे आणि मला येथील वातावरण खरोखरच आवडले आहे, असे ती म्हणाली.

**न्यूझीलंडकडून भारताचा पराभव**

झालेल्या आशिया-ओशनिया बिली जीन किंग चषक महिला टेनिस स्पर्धेत भारतीय महिला संघाला न्यूझीलंडकडून १-२ ने पराभव पत्करावा लागला. एकेरी व दुहेरी दोन्हीमध्ये भारतीय टेनिसपटू आपल्या कामगिरीची छाप टाकू शकले नाही. जागतिक क्रमवारीत ४१ व्या स्थानावर असलेल्या लुलू सनने जबरदस्त कामगिरी करत न्यूझीलंडला आघाडी मिळवून दिली. अंकिता रैना आणि प्रार्थना ठोंबरेने लुलूच्या सर्व्हिसवर तीन मॅच पॉइंट वाचवले आणि निर्णायक दुहेरीत ३-६, ४-६ असा पराभव पत्करावा लागला. श्रीवल्ली भामिदीपतीने यापूर्वी आयशी दासविरुद्ध पहिला एकेरीचा सामना ६-१, ६-१ असा जिंकून यजमान संघाला दमदार सुरुवात करून दिली होती. दुसऱ्या एकेरीत सहजा यमलापल्लीने जोरदार झुंज दिली, परंतु सरतेशेवटी लुलूने ६-३, ६-३ असा विजय मिळवत आपल्या संघाला पुन्हा सामन्यात आणले.



# क्रिकेटपटू केदार जाधव यांचा भारतीय जनता पार्टीत प्रवेश

### आ.समाधान आवताडे यांच्या पुढाकाराने केदार झाले भाजपवासी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ एप्रिल -**

जिल्ह्याचे सुपुत्र व भारतीय क्रिकेट संघातील क्रिकेटपटू केदार जाधव यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी या प्रवेशासाठी पुढाकार घेतला होता आणि पक्ष प्रवेशवेळी ते उपस्थित ही होते.

माढा तालुक्यातील जाधववाडी येथील भूमिपुत्र आणि भारतीय क्रिकेट संघातून क्रिकेटचे मैदान गाजवलेला क्रिकेटपटू केदार यांनी मंगळवारी मुंबईत हा प्रवेश केला. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, पंढरपूर मंगळवेढ्याचे आ. समाधान आवताडे, आ. डॉ. अतुल भोसले, उद्योजक सरोजभाई काझी आदी उपस्थित होते. यानंतर केदार जाधव यांच्यासमवेत आ. आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. मुख्यमंत्री फडणवीस यांनीही केदार यांच्या पक्ष प्रवेशाचे स्वागत केले आणि पक्षात जाधव यांना योग्य प्रकारे मान, सन्मान मिळेल, काम करण्याची संधी मिळेल अशी ग्वाही दिली.

या प्रसंगी सह्याद्री अतिथीगृहावरती विधानपरिषद सदस्य श्री. लाड यांनी ही केदार यांना पक्षकार्याकरिता सदीच्छा व्यक्त करत शुभेच्छा दिल्या केदार यांच्या पक्ष प्रवेशामुळे भाजपकडे युवक आणि क्रीडा प्रेमी नागरिक आकर्षित होतील, त्यांच्या स्वच्छ प्रतिमेचा पक्षाला फायदा होईल, जिल्ह्यातील एक नामवंत क्रिकेटपटू भारतीय जनता पक्षा सारख्या मोठ्या पक्षात सामील झाल्यामुळे क्रीडा क्षेत्राच्या विकासाला मदत होईल, असा विश्वास आ. आवताडे यांनी व्यक्त केला.

# मारिया क्रिकेट क्लबची घोडदौड

## रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : सिटी पोलिस संघाचीही बाजी

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत मारिया क्रिकेट क्लबने सिटी टायटन्स क्लबवर ७ गडी राखून मात करीत या स्पर्धेतील घोडदौड कायम ठेवली आहे. नाबाद अर्धशतक झळकाविणारा जे.जयेंद्र सामन्याचा मानकरी ठरला. हा पुरस्कार त्यास दत्तात्रय काळे यांच्या हस्ते देण्यात आला.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात हनुमंत पुजारीच्या शानदार शतकाच्या जोरावर सिटी पोलिस संघाने बागलकोट क्रिकेट क्लबवर १४२ धावांनी दणदणीत विजय मिळिवला. हनुमंत सामनावीर ठरला. त्यास सामनावीर पुरस्कार अतुल बांडीवाडीकर यांच्या हस्ते देण्यात आला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. चंदू मंजेली, किरण डिग्गे आणि व महेश सोनवणे यांनी पंच तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले.







**✻ संक्षिप्त धावफलक ✻**

**सिटी टायटन्स :** १७ षटकांत ५ बाद १२२ (विनायक काळे ३०, सर्फराज शेख १९, सचिन टेळे १५, युवान शर्मा, युवराज मनानी, सुमित व सोहम तिवारी प्रत्येकी एक बळी) पराभूत विरुद्ध **मारिया क्रिकेट क्लब:** १५.३ षटकांत ३ बाद १२४ (जे. जयेंद्र नाबाद ५७, ओम पवार २६, ब्रिजेश कुमार १८, इस्माईल पिरजादे ३ बळी).

**सिटी पोलीस :** २० षटकांत ८ बाद १९३ (हनुमंत पुजारी ११६, महेश अरकाल २०, श्रीकांत लिंबोळे १३, एल नागराज ३ बळी, प्रसन्न देसाई २ बळी, अभजित कोरे व प्रसन्न कोडक प्रत्येकी एक बळी) वि.वि. **बागलकोट क्रिकेट क्लब :** १३.२ षटकांत सर्व बाद ५१ (सी. कार्तिक १०, सदाशिव जगताप ४ बळी, श्रीकांत लिंबोळे २ बळी, दत्ता काळे व अनिल जाधव प्रत्येकी एक बळी.).

**✻ आजचे सामने ✻**

१) ग्लोबल सी सी विरुद्ध एम आई पी वर्कशॉप. २) विर सावरकर पंढरपूर विरुद्ध बॉस फाइटर जालना.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### श्री स्वामी समर्थांच्या प्रकट दिन उत्सव काळात अडीच लाखांहून अधिक भाविकांचे दर्शन

**अक्कलकोट, दि. ९ एप्रिल-**

अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनाचे औचित्य साधून उत्सव काळात अडीच लाखाहून अधिक भाविकांनी



दर्शन घेतल्याची नोंद मंदिर परिसरात बसविण्यात आलेल्या भक्तांच्या जनगणना यंत्रात झाली आहे. अक्कलकोट नगर परिषद प्रशासनाकडून अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त दक्षिण महाद्वारात भाविक मोजण्यासाठी यंत्र बसविण्यात आले होते. या यंत्रामध्ये प्रकट दिना अगोदर आणि प्रकट दिना दिवशी किती भाविक भक्त आले याची नोंद झाली आहे. दिनांक २९ मार्च रोजी २३ हजार ६४२ भाविक भक्तांची नोंद झाली आहे. दिनांक ३० मार्च रोजी ४७ हजार २३३ भाविकांची नोंद झाली आहे. दिनांक ३१ मार्च रोजी श्री स्वामी समर्थ प्रकट दिना दिवशी एक लाख ८० हजार भाविक भक्त दर्शनासाठी आल्याची नोंद यंत्रामध्ये झाले आहे. श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन उत्सव काळात अडीच लाखाहून अधिक भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतल्याची नोंद भक्तांच्या मोजणीसाठी बसविलेल्या यंत्रात झाली आहे. याबाबतची माहिती अक्कलकोट नगर परिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी दिली. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांचे सहकार्य यासाठी लाभले असून अक्कलकोट नगर परिषदेकडून भक्तांच्या जनगणनेसाठी यंत्र बसविण्यात आल्याचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी सांगितले.



### कासारवाडी येथे सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**बार्शी, दि ९ एप्रिल-**

कासारवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात झाला. परिपाठाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सर्व विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिली ते सहावी विद्यार्थ्यांना अध्यापन करुन आणि शाळेचे कामकाज यशस्वीरीत्या पार पाडले. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना शाळेतील अनुभव, शाळेने केलेले संस्कार कथन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षण विस्तार अधिकारी धनाजी जाधवर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व आणि संस्कारबाबत विस्तृत विवेचन केले. वर्ग शिक्षिका बिनादेवी दरेकर आणि सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शाळेस फॅन भेट म्हणून दिला. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सरपंच अश्विनी मंडलिक, उपसरपंच सुधीर गायकवाड, अध्यक्षा प्रीती कांबळे, उपाध्यक्षा अंबिका खाडे, विठ्ठल लहाने, भूषण मंडलिक उपस्थित होत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुधाकर बडे यांच्यासह शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### माळशिरस येथे हनुमान जयंतीला कैवल्य महाराज चातुर्मासे यांचे कीर्तन

**सदाशिव नगर, दि. ९ एप्रिल-**

येथील जागृत ग्रामदैवत श्री मारुती व श्री रामदेव मंदिरात शनिवार



दिनांक १२ एप्रिल रोजी होणाऱ्या हनुमान जयंतीला पहाटे पाच वाजता कैवल्य महाराज चातुर्मासे पंढरपूर यांचे कीर्तन होणार आहे तसेच हनुमान जयंती निमित्त दि ११ रोजी रात्री जागर व हनुमान जयंती दिवशी रात्री पादुकांची पालखीची नगर प्रदिक्षना होणार आहे असल्याची माहिती देवस्थान समितीच्या वतीने देण्यात आली तसेच रात्री वडार समाज माळशिरस यांच्या वतीने हनुमानाच्या मुर्तीची सवाद्य मिळवणुक काढण्यात येणार असल्याची माहिती माजी नगरसेवक धनंजय देवकर यांनी दिली.

## निधन वार्ता

### विजयकुमार दिवाणजी



**बार्शी, दि. ९ एप्रिल-**

येथील इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या बधीर-मूक विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षक सुभाषनगरमधील रहिवासी विजयकुमार किसन दिवाणजी (वय ६०) यांचे सोमवारी (ता. ७) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. ३० वर्षांपासून रक्तदान चळवळीत त्यांचा सहभाग होता. जीवनज्योत संघटनेचे संस्थापक सदस्य होत. तसेच ओन्ली समाज सेवा बहुउद्देशीय संस्थेचे ते सचिव म्हणून काम पाहत होते.

### जगन्नाथ म्हेत्रे



**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

भूविकास बँकेचे सेवानिवृत्त जनरल मॅनेजर जगन्नाथ म्हेत्रे (वय ८६, रा.सिंधू विहार जुळे सोलापूर) यांचे दि ६ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते सोलापूर जनता बँकेचे शाखाव्यवस्थापक राजेश म्हेत्रे यांचे वडील होते.

### लता शिवशंकर



**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

लता शिवशंकर (वय ५८) यांचे बुधवार दि.९ एप्रिल रोजी सकाळी ६.३० च्या सुमारास अल्पशा आजाराने दुखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती अस्थिरोग तज्ञ डॉ. बी. शिवशंकर, दोन मुले, सून, आई, वडील असा परिवार आहे. इनरव्हील संस्थेत त्या कार्य करीत त्यांनी अनेक पदे भूषविली. डिस्ट्रिक्ट ३१३ ची त्या वर्ष २०२५-२६ करिता चेअरमन म्हणून निवड झाली होती. सेंट जोसेफ शाळेच्या माजी विद्यार्थी संघटना जेसामध्ये ही त्यांनी अनेक वर्षे कार्य केले.

# बार्शीचे १० जलतरणपटू आज करणार जागतिक विक्रम

## श्रीलंका ते भारत ३० किलोमीटर खुल्या समुद्रात पोहण्याचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ९ एप्रिल-**

बार्शीच्या फ्लिपर्स स्विमक्लबमधील १० जलतरणपटूंनी श्रीलंकेपासून भारतापर्यंत (पाल्क सामुद्रधुनी ३० किमी) खुल्या समुद्रात पोहण्याचा ऐतिहासिक निर्धार केला आहे. ९ एप्रिल रोजी या सर्व जलतरणपटूंनी एकत्र येऊन जागतिक विक्रमासाठी हा अद्वितीय सोहळा घडवून आणण्याचा संकल्प केला आहे.

या मोहिमेत सहभागी जलतरणपटू व त्यांचे वय असे : १)स्वराज उमेश डोईफोडे (१४),



२) रणवीर सातपुते (१५), ३) जयसिंह शिंदे (१४), ४) माधव शिंदे (१४), ५) भार्गवी मुळे (१३), ६) शौर्य नवले (११), ७) तन्वी नवले (१०), ८) रुद्र नवले (१४), ९) स्निग्धा जगताप (१०), १०) शुभ्रा कडगंची या सर्वांनी याआधी विजयदुर्ग, मालवण, पोरबंदर आणि कोची येथे सागरी जलतरणात उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे. या स्पर्धेसाठी आवश्यक ती सर्व परवानगी भारत व श्रीलंका सरकारकडून घेण्यात आलेली आहे. कोच बाळराजे पिंगळे (नॅशनल श्विमर, आयर्नमॅन) यांचे मार्गदर्शन व प्रेरणा यामागे मोलाची आहे. या धाडसी उपक्रमासाठी बार्शी रनर्स क्लब, बार्शी सायकलिंग क्लब, वृक्ष संवर्धन समिती आणि श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच जिल्ह्यातील व बार्शीतील अनेक राजकीय, सामाजिक व औद्योगिक क्षेत्रात काम करणारे मान्यवर यांनी या स्पर्धेसाठी प्रायोजकत्व स्वीकारलेले आहे. तसेच संपूर्ण बार्शीकरांचं लक्ष या स्पर्धेकडे लक्ष लागलेले आहे. या जलतरणपटू व प्रशिक्षकांना नागरिकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शहरात अल्पवयीन मुलीचे अपहरण, दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.८ एप्रिल-**

शहरातील डफरिन चौक परिसरातील एका शाळेच्या पाठीमागील रस्त्यावरून अल्पवयीन मुलीचे कारमधून अपहरण करण्यात आले. याप्रकरणी दोघांवर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार ८ एप्रिल रोजी सायंकाळी ७.३० ते ९ च्या च्या दरम्यान घडला.





याबाबत पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून समर्थ दिपक चवंडके (वय २१,रा. श्रीशैल नगर, प्रियंका चौक, भवानी पेठ, सोलापूर) व त्याचा साथीदार अक्षय महादेव काडगावकर (वय २१, रा. जोडभावी पेठ, सोलापूर) विरूध्द पोलिसात गुन्हा दाखल झालेल्याची नावे आहेत. यातील आरोपी हे अल्पवयीन मुलीचा डिसेंबर २०२४ पासून पाठलाग करत होते. आरोपींनी हा प्रकार ८ एप्रिल रोजी सायंकाळी ७.३० ते ९ च्या च्या दरम्यान अल्पवयीन मुलीचे शाळेच्या पाठीमागील रस्त्यावरून कारमध्ये बसवून अपहरण केले. यास आरोपी अक्षय याने मदत केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

या गुन्ह्याचा तपास महिला पोलीस अधिकारी करत आहेत.

# तावशीत खडीकरण कामाचे खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन

### गावभेट दौरा

### ग्रामस्थांशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

तावशी (ता. पंढरपूर) येथे जिल्हा वार्षिक योजना सन २०२४ - २०२५ अंतर्गत खासदार प्रणिती शिंदे यांच्या खासदार निधीतून रानमळा रस्ता ते दौलत आसबे रस्ता खडीकरण कामासाठी पाच लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यातून जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग सोलापूर यांच्या वतीने होणाऱ्या कामाचे भूमिपूजन खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.



यावेळी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप पाटील, नितीन शिंदे, संजय यादव, बाळासाहेब यादव, हनुमंत आसबे, सरपंच अमोल कुंभार, उपसरपंच दिपक पाटील, औदुंबर घाडगे, दत्तात्रय घाडगे, सरपंच धनाजी माने, मेजर दत्तात्रय घाडगे, दिलीप वाडेकर, शिवाजी घाडगे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. २०१५/१४१६ अंतर्गत मूलभूत सोयी सुविधा पुरविणे अंतर्गत खासदार निधीतून रानमळा रस्ता ते दौलत आसबे रस्ता खडीकरण काम होणार आहे.

दरम्यान खासदार प्रणिती शिंदे यांनी तालुक्यातील नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन सोडविण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांना सोबत घेत गावभेट दौरा केला. तालुक्यातील शिरगाव, तावशी या गावाला भेट देऊन गावातील जनतेचे आभार मानले व ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेत निवेदन स्वीकारले. यावेळी नागरिक, शेतकरी बांधवांनी मांडलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित विभागाचे शासकीय अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या. आपल्या अनेक समस्या तत्काळ मार्गी लागल्याने व प्रश्नांचे निराकरण होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत आहेत.

# स्त्रीच्या आरोग्यसाठी सतत प्रयत्नशील रहाणार - डॉ. राणे

**अकलूज, दि.४ एप्रिल-**

महिला स्वास्थ्यम् सर्वसुखानाम हे धोरण असलेली असलेल्या अकलूज स्त्रीरोग तज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. रेवती राणे (इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य महिला शाखा माजी अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य स्त्रीरोग तज्ञ जनजागृती समितीच्या अध्यक्षा) यांची तर उपाध्यक्ष डॉ. विनोदकुमार शेटे (अकलूज), सचिव डॉ.कविता कांबळे (करमाळा),सहसचिव डॉ.अमित चोपडे (टेंभुर्णी), कोषाध्यक्ष डॉ. विशाल शेटे (करमाळा) यांची निवड करण्यात आली आहे.तर कार्यकारी सदस्यांमध्ये डॉ.सचिन गवळी (अकलूज),डॉ.मदन कांबळे (टेंभुर्णी), डॉ. दिग्विजय राऊत (अकलूज),डॉ.अमोल फडे (अकलूज), डॉ. उत्कर्ष गांधी (नातेपुते), डॉ. जागृती मगर (अकलूज) डॉ.गायत्री एकतपुरे (माळीनगर) यांचा समावेश आहे.

अकलूज स्त्रीरोग तज्ज्ञ संघटनेची कार्यकारिणीची धुरा दि. १ एप्रिल पासून नवीन समितीने पदभार स्वीकारला आहे.अकलूज येथे स्त्रीरोग तज्ज्ञ संघटनेची स्थापना ५ डिसेंबर २०१३ रोजी करण्यात आली. डॉ. वंदना गांधी या संघटनेच्या त्या संस्थापिका आहेत तर सिनियर स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सतीश दोशी, डॉ. सविता गुजर, डॉ. भारत पवार, डॉ. विनोद शेटे, डॉ. मदन कांबळे, डॉ. प्रिया कदम यांनी यापूर्वी याचे अध्यक्षपद भूषवले आहे.हि संघटना १२ वर्षापासून सक्रियपणे कार्यरत असून माळशिरस, माढा, इंदापूर, करमाळा या



तालुक्यामधील ४० स्त्रीरोग तज्ज्ञ सदस्य आहेत.

या संघटनेच्या औपचारिक पदग्रहण सोहळा २७ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्य स्त्रीरोग तज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. किरण कुर्तकोटी यांच्या उपस्थितीत आयोजित केला आहे. यामध्ये पुरुष वंध्यत्वावर परिषद व कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

पुढील वर्षभर कार्यक्रमामध्ये स्त्रीरोग तज्ज्ञांसाठी अत्याधुनिक व मार्गदर्शनपर परिषदांचे नित्यनियमाने आयोजन करण्यात येईल पण त्याच बरोबर जनजागृती कार्यक्रमांवर भर दिला जाणार आहे.त्यामध्ये सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत उपजिल्हा रुग्णालय अकलूज येथे गर्भवती मातांसाठी १५ एप्रिल रोजी खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच बरोबर स्तनांच्या कर्करोगांसाठी मिशन पिंक पामस,पिशवीच्या कर्क रोगासाठी सुरक्षा कवच कॅम्पेन,आरोग्य दिंडी, स्तनपानाचे महत्व सांगणारे रिश्ता रेशीमगाठी इत्यादी उपक्रम राबवण्यात येणार आहेत. या कार्यक्रमा अंतर्गत सर्व स्त्रीवर्ग,नर्सिंग स्टाफ, आशा सेविका अशा सर्वांना मार्गदर्शन केले जाणार आहे व स्त्रीहित व स्त्री आरोग्यासाठी कायम प्रयत्नशील राहीन, असे नूतन अध्यक्षा डॉ. रेवती राणे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# सीसीटीव्ही चित्रिकरणातून फोटो काढून महिलेच्या बदनामीचा प्रयत्न

**सोलापूर :** घराच्या ठिकाणी लावलेल्या सीसीटीव्ही कॅमे-यातील चित्रिकरणातून फोटो काढून महिलेच्या बदनामीचा प्रयत्न करणा-याविरूध्द पोलिसात तक्रार दाखल झाली आहे. हा प्रकार एक एप्रिल रोजी रात्री १२.४४ वाजता घडला.

याबाबत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून जवेरिया शेख (रा. सोलापूर) विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी या नोकरी करतात. त्या ठिकाणी आरोपी हा खोटे नाटे बदनामीकारक आरोप पाठवतो. तसेच त्याच्या घराच्या ठिकाणी लावलेल्या सीसीटीव्ही कॅमे-यात झालेल्या चित्रिकरणातून फिर्यादीचे



फोटो काढून फिर्यादीची बदनामी व्हावी या उद्देशाने नोकरीच्या ठिकाणी मेल आयडीवर पाठवून त्यांची बदनामी करतो. यातील फिर्यादीच्या नोकरीला अडचण निर्माण करण्याच्या उदेशाने आरोपी हे करत असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस करत आहेत.

# अकलूज नगरपरिषद निवडणुकीचे वाजू लागले पडघम

### शिवतेजसिंहांनी घेतली प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक

**अकलूज, दि.९ एप्रिल-**

अकलूज नगरपरिषदेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून त्या पार्श्वभूमीवर शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी धडाका सुरू केला असून, त्याची सुरूवात शिवकिर्ती बंगला येथे आयोजित प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीतून करण्यात आली.

नगरपरिषदांच्या निवडणुका अद्याप जाहिर झाल्या नसल्या तरी शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी निवडणुकांच्या दृष्टीने कार्यकर्त्यांची मोट बांधण्यास सुरूवात केली आहे. शिवतेजसिंहांच्या नव्या पर्वाचा हा प्रारंभ असल्याची



चर्चा या निमित्ताने सुरू झाली आहे. आगामी काळात प्रत्येक बुथवर बैठका घेऊन कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याची रणनीती त्यांनी आखली आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या चुका सुधारून गावाच्या सर्वांगिण विकासासाठी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांनी सक्रिय होण्याचे आवाहन त्यांनी केले. या बैठकीत प्रमुख पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी अकलूज ग्राम पंचायतीचे नगरपरिषदेमध्ये रूपांतर करण्याच्या संघर्षाची आठवण करून देतानाच नगरपरिषद झाल्यापासून कोट्यावधी रूपयांची विकासकामे झाल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी पाणीपुरवठ्यासाठी २११ कोटी रूपयांची योजना, १२१ कोटींची अंडरग्राउंड गटार, नगरोत्थान योजनेतून ११९ कोटींचे रस्ते, याशिवाय ५० किलोमीटरचे रस्ते, ५० किलो मीटरच्या गटारी, स्ट्रीट लाईट, बायपास रोडचे सुशोभिकरण अशा प्रमुख विकासकामांची यादी वाचून दाखवली. यावेळी अकलूज नगरपरिषदेवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठीची दिशा स्पष्ट करण्यात आली. शिवतेजसिंह यांनी कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत आगामी रणनीती, स्थानिक प्रश्न आणि विकासाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा केली. अकलूजच्या नवविकासाची सुरुवात असल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले. कार्यकर्त्यांनी एकजूट, निष्ठा आणि जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. शिवतेजसिंह यांच्या ठाम नेतृत्वामुळे कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वासाचे वातावरण तयार झाले आहे.

# सोयाबीन घोटाळ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांची शुक्रवारी बैठक

## आडत्याकडून फसवणूक झालेल्यांनी केली कृती समिती

**अणदूर,दि.९ एप्रिल-**

नवोदित आडत्याने अणदूर परिसरातील शेकडो शेतकऱ्यांचे हजारो क्विंटल सोयाबीन घेऊन जाऊन पेमेंट न केल्याने त्यांची फसवणूक झाली असून हा सोयाबीन घोटाळा जवळपास दोन कोटीच्या आसपास असल्याने शेतकरी हवालदिल झाला असून त्यांनी एकत्रित येऊन नळदुर्ग पोलीसात संबंधित आडत्या विरोधात तक्रार दाखल केली आहे, त्या संदर्भात पुढील दिशा ठरवण्यासाठी उद्या शुक्रवार दिनांक ११ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता नळदुर्ग येथील अंबाबाई मंदिरात अन्यायग्रस्त शेतकऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली असून सदरील बैठकीस परिसरातील बाधित शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन, पीडित शेतकरी कृती समितीने केले आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे की ऐन खरीप हंगामात या नवोदित अडत्याने महालक्ष्मी आडत दुकान अणदूर मध्ये उघडून सोलापूर, लातूर येथील बाजार भाव पेक्षा जास्त दराने शेकडो शेतकऱ्याकडून सोयाबीन खरेदी केले ,खरेदीच्या ६०% रोख रक्कम तर उर्वरित रक्कम एक महिन्यात मिळेल अशी नामी शक्कल लढवत हजारो पोते सोयाबीन खरेदी केले ,उर्वरित ४० टक्के रकमेसाठी काहींना चेक तर काहींना पावती देऊन त्यांची बोळवण केली तर काही शेतकऱ्यांना चेक पन नाही अन् पावती पन न देता आठ दिवसात संपूर्ण रक्कम देणार असल्याचे खोटे सांगितले वअणदूर सोडून पोबारा केला कायम संकटात असणारा शेतकरी त्यांच्या भूलथापांना बळी पडला, फसला गेला,आपली फसवणूक झाल्याचे शेतकऱ्यांच्या लक्षात आले त्यानंतर त्यांनी संघटित होऊन, या आडत्याने केलेल्या फसवणुकी विरोधात पोलिसात तक्रार दाखल केली असून, पोलीस कोणती भूमिका घेतात या कडे त्यांचे लक्ष लागले आहे,त्या संदर्भात पुढील दिशा व रणनीती ठरवण्यासाठी सदरील बैठक आयोजित केली असून या सोयाबीन घोटाळ्यात अणदूर,खुदावाडी ,फुलवाडी , धनगरवाडी, नळदुर्ग, लोहगाव, नंदगाव, केशेगाव, सलगरा, वडगाव ,हिप्परगा , व इतर अनेक गावातील गरीब शेतकरी अडकले असून या महत्वपूर्ण बैठकीस बाधित शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शेतकरी कृती समितीने केले आहे.



# खेळामुळे मन मनगट, मेंदूला बळकटी प्राप्त होते : मल्लिकार्जुन मसुती

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात क्रीडा स्पर्धा

**अक्कलकोट, दि. ८ एप्रिल-**

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी खेळापासून दूर होत आहेत. त्यामुळे कुटुंबात कमालीचे तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा स्थितीत महाविद्यालयांनी क्रीडा स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण केली पाहिजे, असे प्रतिपादन उद्योजक मल्लिकार्जुन मसुती यांनी व्यक्त केले महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्था संचलित मातोश्री गुरु बसवा कल्याण शेट्टी महाविद्यालयातील जिमखाना विभागाने आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ करताना ते बोलत होते. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शामवीताई कल्याणशेट्टी, पुनम कोकळगी, रूपाली शहा, मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे आदी उपस्थित होते प्रारंभी मैदानाचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना विभाग प्रमुख रंजना चव्हाण यांनी केले. कुमार जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर १०० मीटर धावणे, गोळा फेक, थाळीफेक, कबड्डी, खो-खो, व्हॉलिबॉल हे सांघिक खेळ प्राध्यापिका रंजना चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जिमखाना विभागाने आयोजित केले होते. क्रीडा स्पर्धा यशस्वीतेसाठी प्रा. भीम सोनकांबळे, प्रा राजेश पवार, प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील, डॉ. शीतल झिंगाडे, प्रा. मधुबाला लोणारी, प्रा. मनीषा शिंदे, प्राध्यापिका नेहा गंधमल, प्रा शितल फुटाणे, प्रा. प्राची गणेचारी, प्रा. शिल्पा धूमशेट्टी, प्रा. जनाबाई चौधरी, बालाजी कांबळे यांनी प्रयत्न केले.

## महत्वाचे...



### डॉ. ओमप्रकाश शेटे यांची आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र अध्यक्षपदी निवड

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

महाराष्ट्र शासनाच्या आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या अध्यक्षपदी डॉ. ओमप्रकाश शेटे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा त्रिनेत्र फूडमॉल येथे सन्मान करण्यात आला. याप्रसंगी आय.आर.एस. मल्लिनाथ जेऊरे (डिप्टी कमिशनर, कस्टम - मुंबई) यांच्या हस्ते डॉ. शेटे यांना श्री मशरूम गणपतीची प्रतिमा व शाल देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमात शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे, बाळासाहेब वाघमारे, गुरुशांत धूतरगांवकर,कनिष्क वाघमारे, नीलकंठ पाटील, दीपक देशमुख, नागराज हौशेट्टी, राजू हौशेट्टी तसेच मित्र परिवार यांची उपस्थिती लाभली होती.




### महापालिकेच्या दाराशा प्रसुतीगृह येथे सोनोग्राफी मशीनचे लोकार्पण

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून हॅलो मेडीकल फाऊंडेशन, अणदूर व अलायवस लाईफ सायन्सेस यांच्यावतीने कार्पोरेट सामाजिक उत्तर दायित्व निधीतून सोलापूर महानगरपालिका अंतर्गत दाराशा प्रसुतीगृह येथे गर्भवती महिलांच्या तपासणीसाठीची अत्याधुनिक सोनोग्राफी मशीन देण्यात आली. या मशीनचे लोकार्पण उपस्थित तीन गरोदर माता यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी हॅलो मेडीकल फाऊंडेशन, अणदूर या संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉ. क्रांति रायमाने, अलायवस लाईफ सायन्सेसचे कार्यक्रम व्यवस्थापक प्रशांत कांबळे, महापालिकेचे उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी आशिष लोकरे, सहायक आयुक्त गिरिश पंडित, आरोग्याधिकारी डॉ. राखी माने, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सो.म.पा. शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अतिश बोराडे, दाराशा प्रसुतीगृहाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रेणुका लहाडे उपस्थित होते.



### प्रभाग क्र. २२ येथे पिण्याच्या पाईपलाईन कामाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्याने व प्रभाग क्रमांक २२ मधील माजी नगरसेवक किसन जाधव आणि नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या विशेष प्रयत्नातून सोलापूर महानगरपालिका अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक २२ येथील रामवाडी पोगुल मळा परिसरात १९ लाख ८ हजार २९९ रुपये खर्चित पिण्याच्या पाईपलाईनचे उद्घाटन करण्यात आले. राम वाडी पोगुल मळा येथे पाण्याची समस्या भेडसावत होती. बऱ्याच दिवसांपासून काही ठिकाणी आठ दिवसाआड पाणीपुरवठा सुरू होता. सदरची पाईपलाईन जुनी झाल्यामुळे पाण्याचा अपव्यय होत असल्याचे दिसून आले. ही समस्या लक्षात घेऊन येथे नवीन पाईपलाईनचे काम सुरू केले. यावेळी माजी नगरसेवक किसन जाधव म्हणाले की, नव्या पाईपलाईनमुळे पाणीपुरवठा सुरळीत होईल असे सांगितले. याप्रसंगी अनिश जाधव, नागेश यल्लाप्पा जाधव, राजेंद्र शिंदे, आकाश बाबू नाईक, वसीम शेख, गोपाल नाईक, तौफिक शेख, अब्बास बागवान, निहाल गायकवाड, साहिल शेख,बाळू ढाळे, रघुनाथ नाईक फिरोज पठाण अनिता पवार तनुजा गायकवाड सायरा चौधरी समीना चौधरी रिजवान बागवान, आयेशा मकानदार,सरस्वती बनसोडे,श्रीदेवी पोथीनुर शेख, स्वाती जाधव, आदींसह ईच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### पिकअप खड्यात पडल्याने चालक जखमी

**सोलापूर :** पिकअप खड्यात पडल्याने चालक जखमी झाला. हा अपघात उमरगापासून १० किमी अंतरावर मंगळवारी दुपारी १.३० वाजता घडला. रसुल सुलेमान शेख (वय ४०, रा. रानमसले ता. उ. सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. रसुल हा पिकअप टेम्पो चालवित उमरगा येथून पुढे जात होता. उमरगापासून १० किमी अंतरावर अचानक ताबा सुटल्याने पिकअप रोडच्या बाजूला खड्यात आदळली. यात नाकाला जखम झाली असून छातीला मुकामार लागल्याने उमरगा येथे उपचार करून पत्नी फिरदोस यांनी मंगळवारी सायंकाळी सात वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### भाजी मंडईत जागेवरून वृध्दाला मारहाण

**सोलापूर :** रेल्वे स्टेशनजवळी भाजी मंडईत जागेवरून वृध्दाला मारहाण करण्यात आली. हा प्रकार बुधवारी सकाळी ७.३० वाजता घडला. प्रभू बाळप्पा शेळके (वय ७५, रा. गोटेवाडी ता. मोहोळ) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. प्रभु हे भाजी विक्रीसाठी रेल्वे स्टेशन येथील भाजी मंडईत आले होते. तेथे जागेच्या कारणावरून ज्ञानेश्वर चौगुले याने काठीने व लाथाबुक्यानी प्रभु यांना मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने भाऊ मधुकर शेळके याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# डेंग्यू बाधीत क्षेत्रामध्ये महापालिका सुरू करणार लवकरच फिरता दवाखाना

**▸▸ताप, उलटी, जुलाब असणाऱ्या एकूण १६७ रुग्णांची केली आरोग्य तपासणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

शहरातील शामानगर, चिंतलवार वस्ती, ८५ नं. गाळा, जयशंकर तालीम, महात्मा फुले झोपडपटटी भागामध्ये सर्वेक्षण करुन ताप, उलटी, जुलाब असणारे एकूण १६७ रुग्णांची आरोग्य तपासणी करुन संशयित रुग्णांना औषधे देण्यात आली. दरम्यान, डेंग्यू मुळे बाधीत क्षेत्रामध्ये महापालिकेतर्फे लवकरच फिरता दवाखाना सुरू करण्यात येणार आहे.

बाबू जगजीवनराम झोपडपट्टी मधील दोन मुलींचा डेंगूसदृश्य आजाराने मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवली आहे. या अंतर्गत महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांच्या मार्गदर्शनाखाली शामानगर, अंगणवाडी क्रं.६४ चिंतलवार वस्ती, ८५ नं. गाळा, जयशंकर तालीम, महात्मा फुले झोपडपटटी येथे अनुक्रमे डॉ. वैशाली आगवणे, डॉ. शीतलकुमार चिलगुंडे, डॉ.राहूल नवले, डॉ. क्षिप्रा पिजंरकर आणि डॉ. वाळवेकर यांच्यासोबत ए.एन.एम. व संबधित आशाताई मिळून सदर भागामध्ये सर्वेक्षण करुन ताप, उलटी, जुलाब असणारे एकूण १६७ रुग्णांची आरोग्य तपासणी करुन संशयित रुग्णांना औषधे देण्यात आली. त्यांचा मागोवा घेण्यास आशाताई यांना सुचना दिली. त्याशिवाय राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ३० एम पी डब्ल्यू आणि मलेरिया विभागाकडील १२ एम पी डब्ल्यू यांनी कंटेनर सर्व्हे करुन, अबेटींग करताना ज्या कंटेनरमध्ये अळी दिसून आले ते कंटेनर रिकामे केले. त्याचवेळी लोकांना अंडी, अळी यांचे डेंग्यू डासात रुपांतर होते ते सांगून पाणी ओतून त्यांना ते स्वच्छ करुन कोरडे करुन ठेवण्यासाठी जनजागृती केली. पाणी उकळून घेणे तसेच पिण्याच्या पाण्यात तुरटी फिरवणे, वाटप केलेले मेडीक्लोर औषध पाणी आलेले दिवशी ते पिण्याच्या पाण्यात टाकण्यासंबधी माहिती देण्यात आले.



यावेळी आशाताई यांनी ७२१ घरांचे सर्व्हेक्षण केले तर मलेरिया विभागाकडील ११ टीम मिळून ३३२५ लोकसंख्येकरीता ७२१ घरामध्ये रिअबेटींग केले. तसेच एरियामध्ये अळीनाशक औषधाने स्प्रेईंग केले.प्रत्येक विभागात आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांनी भेट देवून प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, ओ.पी.डी, कंटेनर सर्व्हेसाठी सुचना वजा मार्गदर्शन केले. तेथील नागरिकांना वैयक्तीक स्वच्छते विषयी व बाहेरील थंड पाणी व बर्फजन्य खाद्यपदार्थ टाळणेसंबधी सूचना दिले. तसेच परिसर स्वच्छतेच्याही सूचना दिल्या.

## जलजीवन मिशनची २३ कोटींची बिले ७० ठेकेदारांना वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

जलजीवन मिशन अंतर्गत थकित बिलापोटी शासनाकडून जिल्हा परीषद पाणीपुरवठा विभागाला २३ कोटी निधी मिळाल्याने ठेकेदारांमधून बिले मिळविण्यासाठी चढाओढ सुरू होती. मात्र पाणीपुरवठा प्रशासन विभागाकडून शासनाच्या नियमांचे पालन करून व काम पूर्ण करणार्या ७० ठेकेदारांना क्रमानुसार बिल देण्यात आले. यावेळी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व ठेकेदारांमध्ये वाद झाले.

त्यामुळे बिल वाटपाकडे सर्व ठेकेदारांचे लक्ष लागले होते. अखेर प्रशासनाने ७० ठेकेदारांना बिल वाटप करून २३ कोटी निधी खर्च केला आहे. जिल्हा परीषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागांतर्गत जलजीवन मिशनमार्फत जिल्ह्यात मोठया प्रमाणात पाणीपुवरठयाची कामे करण्यात आली आहेत. हर घर जल अंतर्गत प्रत्येक गावात पाणीपुरवठयाची कामे करण्यात आली आहेत. मात्र काम पूर्ण होऊनही बिल मिळत नसल्याने ठेकेदारांनी कामबंद आंदोलन केल्यानंतर पाणीपुरवठा विभागाकडून शासनाकडे निधीची मागणी करण्यात आले. शासनाकडे थकित बिलापोटी ६६ कोटीची मागणी करण्यात आली होती.

मात्र शासनाकडून जिल्हा परीषदेला २३ कोटी मिळाले. उपलब्ध निधीच्या तुलनेत थकित बिल मोठया प्रमाणात असल्याने बिल वाटप करण्याचे जटील काम प्रशासनासमोर होते.

यापूर्वीही नऊ कोटी बिल मिळाल्यानंतर पाणीपुरवठा विभागाकडून शासन नियमानुसार बिल वाटप करण्यात आले होते. मात्र काम पूर्ण होऊन सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधी होऊनही बिल मिळत नसल्याने ठेकेदारांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत होती.

## सम्यक विचार मंचच्यावतीने उद्यापासून मिलिंद व्याख्यानमाला

**भन्ते महावीरो थेरो यांच्या धम्मदेसनने समारोप**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या जयंती सप्ताहात सम्यक विचार मंच, या संस्थेच्या वतीने दि. ११ ते १४ एप्रिल या कालावधीत हुतात्मा स्मृती मंदीर सभागृहात मिलिंद व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे यंदाचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे.

व्याख्यानमालेचे उद्घाटन महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९८ व्या जयंती दिनी शुक्रवार दि.११ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते होणार आहे. भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वाटचाल या विषयावर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प यशदाचे प्रा.डॉ. बबन जोगदंड (पुणे) हे गुंफणार असून अध्यक्षस्थानी प्रा. विक्रम कांबळे तर शिक्षणाधिकारी कादर शेख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प शनिवार दि.१२ एप्रिल २०२५ रोजी प्रा.डॉ. प्रतिभा अहिरे (छत्रपती संभाजीनगर) या फुले-आंबेडकरी विचार व आजची स्त्री या विषयावर गुंफणार असून अध्यक्षस्थानी निशा भोसले राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मिनाक्षी बनसोडे-सोनवणे या उपस्थित राहणार आहेत.

तिसरे पुष्प रविवार दि.१३ एप्रिल रोजी प्रा. सुकुमार कांबळे (सांगली) हे आंबेडकरी चळवळ-दशा, दिशा व सद्यस्थिती या विषयावर गुंफणार असून अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी हे उपस्थित राहणार आहेत. व्याख्यानमालेचा समारोप भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंतीदिनी सोमवार दि.१४ एप्रिल रोजी भन्ते महावीरो थेरो (अहमदपुर) यांच्या भगवान बुध्दांचा कर्मसिध्दांत या धम्मदेसनने होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक धर्मादाय आयुक्त संजय पाईकराव व महापालिकेचे मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर उपस्थित राहणार आहेत. व्याख्यानमालेस उपस्थित रहावे, असे आवाहन मंचचे चंद्रकांत कोळेकर, सुधीर चंदनशिवे, रमेश सुरवसे, मनिष सुरवसे, शांतीकुमार कांबळे, अनिल जगझाप, रविकांत ढावरे, व्ही.बी. भालशंकर, प्रा. डॉ. गौतम कांबळे यांच्यासह सदस्यांनी केले आहे.




## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त प्राध्यापक, शिक्षकांचे वेतन १४ एप्रिलपर्यंत करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त यावर्षीही जिल्ह्यातील सर्वच शाळा महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांचे वेतन १४ एप्रिल पर्यंत करण्याची मागणी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी ,मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्राथमिक व माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे.

सोलापुरात भीम जयंती सप्ताहभर विविध कार्यक्रमाचे, विविध स्पर्धेचे,व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. आंबेडकर अनुयायी नाविन्यपूर्ण गोष्टीची, वस्तूंची खरेदी करतात. कुटुंबातील सर्व सदस्यांना नवीन कपडे खरेदी करतात. या सर्व कार्यक्रमासाठी ,स्पर्धांसाठी ,ग्रंथ खरेदीसाठी पैशाची गरज असते.नेमके अर्थसंकल्पामुळे मार्च पेड इन एप्रिलचे वेतन उशिरा होते. त्यामुळे वेतन १४ एप्रिल पर्यंत करण्याची आवश्यकता आहे, असे निवेदनात म्हटले आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व महासंघाचे प्रदेशाध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांनी केले. या शिष्टमंडळामध्ये राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड, जिल्हाध्यक्ष युवराज भोसले, जिल्हा सेक्रेटरी रवी देवकर महिला संघटक निर्मला मौळे, मुख्याध्यापक अविनाश भालशंकर, दीपक दुधनकर, मनोज भुरले, भीम राव माने इत्यादींचा समावेश होता. या निवेदनावर राज्य अध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर, राज्य सरचिटणीस प्राचार्य बुद्धी प्रकाश गायकवाड, जिल्हाध्यक्ष प्राध्यापक युवराज भोसले, महिला प्रतिनिधी निर्मला मौळे यांच्या सह्या आहेत.

## शहरातील अनधिकृत पार्किंग बंद करून फ्री पार्किंग करा

**संभाजी ब्रिगेडची निवेदनाद्वारे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

सोलापूर शहरांमध्ये सध्या लोकसंख्या व वाहनांची संख्या प्रचंड वाढल्या कारणामुळे पार्किंगचा मोठा प्रश्न उद्भवत आहे ते पार्किंगच्या नावाखाली नागरिकाकडून लूट केली जात असून त्यांच्या ठेका रद्द करून तात्काळ कारवाई करण्यात यावी व पे पार्किंगच्या ऐवजी नागरिकांना फ्री पार्किंग करण्यात यावे अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे वतीने सोलापूर महानगरपालिका उपायुक्त तैमूर मुलांनी यांच्याकडे करण्यात आली.

शहरातील मोठमोठे इमारती बांधकाम परवाना देताना त्यांना पार्किंगची जागा राखीव ठेवणे आवश्यक असताना सुद्धा अनेक इमारतींना पार्किंगची सोय नाही पार्किंगची जागा व्यवसायिक दराने दुकाने थाटलेले आहेत त्याकडे बांधकाम परवाना देताना अधिकाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारातून याकडे दुर्लक्ष केले जात तसेच शहरातील काही ठिकाणी महानगरपालिकेच्या



वतीने पे पार्किंग चा ठेका देण्यात आलेल्या आहे तो ठेका संपून सुद्धा अद्यापही पार्किंगच्या नावाखाली सर्वसामान्य जनतेकडून आर्थिक लूट केली जात आहे. यास महानगरपालिकेतील काही अधिकारी जबाबदार आहेत. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, हर कार्याध्यक्ष जयश्री जाधव, शहर शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, सचिव सिद्धाराम सवळे, शहर संघटक सतीश वावरे, दिलीप निंबाळकर, अभिषेक जागीरदार उपस्थित होते

### पुतण्याची भांडणे सोडविण्यास गेलेल्या काकाला मारहाण

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

दारूसाठी पैसे नाही म्हणाल्याने पुतण्याला मारहाण करताना सोडविण्यासाठी गेलेल्या काकाला दोघांनी बेदम मारहाण केली. हा प्रकार विजापूर रोडवरील अपना बाजार समोरील रस्त्यावर मंगळवारी रात्री ११.३० वाजता घडला.

खतीस अब्दुल सत्तार शेख (वय ३८, रा. आनंद नगर, विजापूर रोड) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. खतीस यांचा पूतण्या यास अभि काकडे व रोहित वाघे हे दारु पिण्यासाठी पैसे मागत होते. त्यावेळी पैसे नाही म्हणाल्याने ते दोघे खतीस यांच्या पुतण्यास मारहाण करत होते. ती भांडणे सोडविण्यासाठी गेल्यानंतर खतीस यास अभि व रोहित या दोघांनी लाथाबुक्यांनी व दगडाने मारहाण केली. सर्वांगास मुकामार लागल्याने बुधवारी रात्री १२.०५ वाजता भावाने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## आयुक्तांनी केली मिरवणूक मार्गाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने महापालिकेच्या वतीने विविध उपाय योजना केल्या जातात. आज महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, आस्थीविहार तसेच मिरवणूक मार्गाची पाहणी केली.

यावेळी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मिरवणूक मार्गावरील रस्त्यावरील खड्डे बुजवणे, विद्युत दिवे चालू स्थितीत ठेवणे, आवश्यक त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात हॅलोजन लावणे,मिरवणूक मार्गावरील रस्त्यावरील अडथळा येणाऱ्या झाडांच्या फांद्या काढून टाकणे, मिरवणूक मार्गावरील रस्त्यांची साफसफाई करून जंतुनाशक फवारणी करणे इत्यादी सोय सुविधा करावे तसेच मिरवणूक मार्ग वरील कामे १३ एप्रिल पूर्वी करण्याच्या सूचनाही आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, विभागीय अधिकारी हिदायत मुजावर, विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर उद्यान प्रमुख किरण जगदाळे उपस्थित होते.

# तामलवाडीच्या श्री विष्णू-महादेव यात्रेस उत्साहात प्रारंभ

**● कावड मिरवणूक सोहळ्यास हजारो भाविकांची उपस्थिती**
**● आज शेरण्या कार्यक्रमासाठी भक्तांची होणार मोठी गर्दी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील ग्रामदैवत श्री विष्णू-महादेव यात्रा सोहळ्यास उत्साहात प्रारंभ झाला. आज (दि.०९) पहिल्या दिवशी कावड मिरवणूक सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. यानंतर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. तर उद्या दि. १० एप्रिल रोजी शेरण्याचा यात्रेतील मुख्य कार्यक्रम पार पडणार असून, यासाठी पुन्हा मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होणार आहे.



येथील श्री विष्णू-महादेवाचा महिमा तसा अगाधच आहे. या मंदिरात श्री विष्णू अन् महादेवाची स्वयंभू पिंड एकत्र आहे. या यात्रा काळात धार्मिक विधी, पारंपरिक कार्यक्रम पार पडतात. गुरूवार, दि. १० एप्रिल रोजी शेरण्या कार्यक्रम पार पडणार. या कार्यक्रमात प्रत्येक घरातील लोक श्रींच्या मंदिरात जावून आपले नवस पार पाडतात आणि महाप्रसाद वाटप करतात. या महाप्रसादात नारळ, पेढे, चुरमुरे, लाडू आदींचा समावेश असतो. या सोहळ्यासाठी मंदिरात मोठी गर्दी होत असते. पहाटे महापूजा झाल्यापासून या कार्यक्रमाला आरंभ होतो. यासाठी तामलवाडी पंचक्रोशीच नाही तर धाराशिव, सोलापूर जिल्ह्यातील अनेक भाविक श्रींच्या दर्शनासाठी येतात.

प्रतिवर्षी चैत्र शु. एकादशीला मानकरी पांडुरंग विभुते यांच्या घरून श्रींची पालखी टाळ, मृदंगाच्या गजरात, फटाक्यांची आतषबाजी अन् पार्वते शिवा हरऽऽ हर महादेव अशा नामघोषात निघते आणि पुढील चार दिवस पालखीतील देव श्री विष्णू-महादेवांच्या मंदिरात वास्तव्यास आले आहेत. द्वादशीला ग्रामदैवतांच्या कावडीची मिरवणूक निघाली. मिरवणुकीत गावातील सर्व जाती-धर्माचे भक्त सहभागी होतात. घरोघरी पुरणपोळीचा स्वयंपाक केला जातो. प्रत्येकाच्या घरी यात्रा काळात पै-पाहुणे आलेले असतात. याच दिवशी दुपारनंतर जंगी कुस्त्यांचा फड भरविला जातो. पंचक्रोशीतील अनेक नामवंत मल्ल या कुस्त्यात सहभागी होवून आपाली कसब व कौशल्य दाखवितात.

**दैनिक तरूण भारतच्या पुरवणीचे आज प्रकाशन**

गेल्या २० वर्षांपासून येथील श्री विष्णू-महादेव यात्रा सोहळ्यासाठी दैनिक तरूण भारतच्या माध्यमातून दै. तरूण भारतचे वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड हे पुरवणी काढत आहेत. शेरण्याच्या मुख्य कार्यक्रमावेळी या पुरवणीचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते केले जाते. यावेळीही सकाळी ११ वाजता या पुरवणीचे प्रकाशन करण्यात येणार असून, यासाठी दै. तरूण भारतचे समुह संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा आवृत्तीप्रमुख राजाराम मस्के, जाहिरात विभागप्रमुख मनोहर बायनी आदींची उपस्थिती राहणार आहे.


**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## डॉ. अतुल लकडे यांच्याकडे विद्यापीठाच्या कुलसचिव पदाचा कार्यभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलसचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.



करमाळा येथे शारीरिक शिक्षण संचालक म्हणून सेवा केल्यानंतर विद्यापीठात ते क्रीडा संचालक म्हणून १० ऑगस्ट २०२४ रोजी झाले होते. रुजू झाल्यानंतर केवळ नऊ महिन्यात त्यांच्याकडे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी हा अतिरिक्त कार्यभार सोपविल्याने त्यांच्यासमोर हे मोठे आव्हान असणार आहे. यापूर्वी कार्यरत असलेल्या योगिनी घारे यांची लीन मुंबई विद्यापीठाने रद्द केल्यामुळे त्यांना ८ एप्रिल रोजी कुलगुरू प्रा. महानवर यांनी कार्यमुक्त केले. ते बुधवारी (दि.९) रोजी मुंबई विद्यापीठात उपकुलसचिव या मूळ पदावर रूजू झाल्या. १५ सप्टेंबर २०२२ रोजी त्या या विद्यापीठात कुलसचिव पदावर रूजू झाल्या होत्या.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### सराईत गुन्हेगार अमित आडके दोन वर्षाकरिता तडीपार

**सोलापूर, दि.९ एप्रिल-**

शहरातील देगाव परिसरामध्ये सराईत गुन्हेगार अमित आडके यास पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर आणि धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्याचे आदेश दिले. अमित उर्फ पप्पू आप्पासाहेब आडके (रा. किरकिर आई चौक देगाव, ता. उत्तर सोलापूर) असे तडीपार केलेल्याचे नाव आहे. आडके याच्याविरुद्ध सन २०१२, २०१९ व २०२४ या कालावधीमध्ये गैर कायद्याची मंडळी जमा करून दंगा व मारामारी करणे, खून करणे, ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी फौजदार चावडी पोलिसांकडून आडके यास तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस उपायुक्त कबाडे यांच्याकडे सादर करण्यात आला होता त्यास पोलीस उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत अडके यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षे तडीपार करण्याचे आदेश दिले तडीपारच्या आदेशानंतर अडके यास नवी मुंबई येथे सोडण्यात आले.



### समर्थ रेसिडेन्सीमध्ये साठ हजारांची चोरी

**सोलापूर, दि.९ एप्रिल-**

शहरातील अक्कलकोट रोडवरील ईश्वर नगर मधील समर्थ रेसिडेन्सी मधील बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत रेवणसिद्ध शिवप्पा कोळी (वय ६४) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सात एप्रिल रोजी रात्री दहाच्या सुमारास चोरट्याने रेवणसिद्ध कोळी यांच्या बंद घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप कशाने तरी तोडून घरातील बेडरूममधील लोखंडी कपाटाच्या लॉकर मधील सोन्याचे बदाम व रोख रक्कम असा साठ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला, अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलीस हवालदार उबाळे पुढील तपास करीत आहेत

### डिव्हायडरला दुचाकी धडकून चालकाचा मृत्यू

**सोलापूर, दि.९ एप्रिल-**

शहरातील हैदराबाद रोडवरील डिव्हायडरला धडकून मरण पावलेल्या दुचाकी स्वाराविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार नवले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रोहन नागनाथ अडगळे (रा. घोंगडे वस्ती भवानी पेठ सोलापूर) या दुचाकी स्वाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ मार्च रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास हैदराबाद रोडवर रोहन अडगळे हे त्यांच्या मोटार सायकल क्रमांक १३ सी वाय ७९३८ यावरून सर्विस रोडच्या डिव्हायडरला धडकले. यात अडगळे हे गंभीर जखमी होऊन मरण पावले, अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे पोलीस उपनिरीक्षक बनसोडे पुढील तपास करीत आहेत



### राजरत्न नगरमध्ये घरफोडी; ९० हजारांचा ऐवज लंपास

**सोलापूर, दि.९ एप्रिल-**


शहरातील नीलमनगर परिसरात असलेल्या राजरत्न नगरमध्ये चोरट्याने बंद घर फोडून ९० हजारांचा ऐवज चोरून नेला. याबाबत शिवशरण आप्पा शिवण आप्पा खद्ये वय ८२ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे ७ एप्रिल रोजी सहा ते सायंकाळी सात या कालावधीत अज्ञात चोरट्याने खद्ये यांच्या बंद घराचा कडीपोंडा तोडून घरात प्रवेश केला बेडरूम मधील लोखंडी कपाटात असलेल्या लॉकर मधील रोख रक्कम व २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण चोरट्याने चोरून नेले अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिव पुढील तपास करीत आहेत.

# मरगळलेल्या शहर शरद राष्ट्रवादीला ‘साहेब’ देणार का उभारी; कार्यकर्त्यांच्या नजरा

### सोलापुरातील कार्यकर्त्यांना मिळणार का संजीवनी?

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.९ एप्रिल-**

राजकारणातील चाणक्य म्हणून ख्यातनाम असलेले माजी केंद्रीय मंत्री राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार हे शनिवार दि.१२ एप्रिल रोजी सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. शनिवारी दुपारी त्यांचे आगमन हॉटेल बालाजी सरोवर येथे होणार आहे. त्यानंतर विजापूर रोडवरील चव्हाण शिक्षण संकुल येथे दलित मित्र, शिक्षण महर्षी चंद्राम चव्हाण गुरुजी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर शरद पवार हे पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत.



आगामी महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, बाजार समिती तसेच विविध प्रश्नांवर चर्चा केली जाणार आहे. सोलापूर शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची (शरद पवार पक्ष) पूर्णपणे वाताहात झालेली आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने मूळच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अनेक पदाधिकाऱ्यांना आपल्यासमवेत घेऊन आपला पक्ष मजबूत केला आहे. त्यामुळे जुन्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला नवी उभारी देण्याचे बाळकडू देण्याचे काम राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांना करावे लागणार आहे. आगामी महापालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाचे अस्तित्व कायम ठेवण्याचे आव्हान देखील त्यांच्यासमोर असणार आहे. त्यासाठी शरद पवार नेमकी कोणती राजकीय व्यूहरचना आखतात हे पाहणे देखील गरजेचे आहे.

विधानसभा निवडणुकीत माजी महापौर महेश कोठे यांनी पक्षाला नवी ताकद आणि उभारी देण्याचे काम केले होते. त्याच पद्धतीने आगामी महापालिका निवडणुकीसाठी देखील त्यांनी राजकीय गणित डोळ्यासमोर ठेवून महापालिकेवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकवण्यासाठी मतांची गोळाबेरीज केली होती. महेश कोठे यांच्या राष्ट्रवादीच्या प्रवेशाने पक्षांमध्ये एक वेगळेच चैतन्य निर्माण झाले होते. परंतु त्यांच्या आकस्मिक निधनाने शरद पवार यांना सोलापूरमध्ये मोठा धक्का बसला आहे. कोठे यांच्या अचानक जाण्याने पक्षांमध्ये तसेच राजकीय क्षेत्रामध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ती पोकळी भरून काढण्याचे काम देखील सर्वेसर्वा शरद पवार यांना करावे लागणार आहे.

### जुन्या-नव्या कार्यकर्त्यांची सांगड घालून जमवणार का मेळ?

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील जुने कार्यकर्ते अद्यापही शरद पवार यांच्या पाठीशी आहेत. अशा जुन्या व नवीन तडफदार तरुण कार्यकर्त्यांना सोबत घेऊन शरद पवार यांना आगामी निवडणुकीची खिंड लढवावी लागणार आहे. आपल्या पक्षाचे अस्तित्व टिकवण्यासाठी शरद पवार जुन्या व नव्या कार्यकर्त्यांची सांगड घालून राजकीय पक्षांना आव्हान देण्यासाठी कार्यकर्त्यांना बूस्टर डोस देणार आहेत. शहर व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचा छोटेखानी संवाद कार्यक्रम संपन्न होणार आहे. यावेळी ते कार्यकर्त्यांना निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राजकीय रणनीती आखणार आहेत हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### प्रभारी हर्षवर्धन पाटील, आ. शशिकांत पाटील यांचे मार्गदर्शन

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद चंद्र पवार पश्चिम महाराष्ट्र प्रभारी राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि आमदार शशिकांत शिंदे इंडियन मेडिकल असोसिएशन हॉलमध्ये कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. आगामी महापालिका, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याकरिता तसेच राज्यात युती सरकार मुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे शेतकरी, कष्टकरी, व महिलांवरील होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात वजन मोट बांधण्यासाठी या बैठकीत ते मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## वृद्धाचे पेन्शनचे पैसे जबरदस्तीने काढून घेणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ एप्रिल-**

देगाव रोडवरील सीएनएस हॉस्पिटलच्या मुख्य रस्त्याच्या पलीकडे असलेल्या मोकळ्या मैदाना जवळून रिक्षातून जाणाऱ्या वृद्धांकडे पेन्शनचे साडे पंधरा हजार रुपये जबरदस्तीने काढून घेऊन पळून गेलेल्या दोघांविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत गोपीनाथ यशवंत परकाळे (वय ७६, रा. हब्बू वस्ती देगाव नाका सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सलगर वस्ती पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे २ एप्रिल रोजी रात्री दहाच्या सुमारास गोपीनाथ परकाळे यांना अज्ञात दोघांनी रिक्षातून सीएनएस हॉस्पिटलच्या पलीकडे असलेल्या मोकळ्या मैदानात नेले. त्या ठिकाणी त्या दोन अनोळखी व्यक्तींनी परकाळे यांच्याकडील पेन्शनचे पंधरा हजार पाचशे रुपये जबरदस्तीने काढून घेतले म्हणून सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक फौजदार चंगरपल्लू पुढील तपास करीत आहेत

# खोदकाम करण्यासाठी जेलमधील कैदी रोडवर

**● सोलापुरातील धक्कादायक प्रकार : कारागृह प्रशासनानं सांगितलं अजब कारण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा कारागृहातल्या कैद्यांबाबत धक्कादायक प्रताप कारागृह प्रशासनाने केल्याचे समोर आले आहे. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांना भर रस्त्यावर गर्दीच्या ठिकाणी उतरवत खोदकाम करायला लावल्याचा प्रकार सोलापूर जिल्हा कारागृह प्रशासनाकडून घडला आहे. कारागृहात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने कारागृह प्रशासनाने हा धक्कादायक प्रकार केल्याचं कबूल केलं आहे.

कारागृहातील कैदी गर्दीच्या ठिकाणी खोदकाम करण्यासाठी उतरवल्याचा गंभीर व धक्कादायक प्रकार समोर आल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. एखादा कैदी पळून गेला असता तर याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित केल्यानंतर खोदकामाचे काम थांबवून कैद्यांना पुन्हा कारागृहात नेण्यात आले.



### पालिकेने कनेक्शन दिलं नसल्याने कैद्यांच्या माध्यमातून खोदकाम

कारागृहात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने जेल प्रशासनाने जानेवारी २०२५ मध्ये पालिकेला पत्र लिहीत कारागृहात नवीन पाण्याच्या कनेक्शनची मागणी केली होती. पाण्याच्या कनेक्शनसाठी पालिकेकडे अर्ज करूनही पालिकेने वेगवेगळ्या कारणांमुळे कनेक्शन दिलं नसल्याने कैद्यांना रस्त्यावर उतरवत खोदकाम केल्याची प्रतिक्रिया कारागृह प्रशासनाचे अधिकारी प्रदीप बाबर यांनी दिली आहे.

# बाजार समिती सुनावणीचा निकाल १५ एप्रिलपूर्वी

**● युक्तिवाद पूर्ण पणन संचालकांच्या निर्णयाची प्रतीक्षा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ एप्रिल-**

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणुकीत आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेत अद्याप एकाही उमेदवाराने आपला अर्ज मागे घेतला नसल्याने, निवडणुकीत चुरस निर्माण होणार आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत चार उमेदवारांचे अर्ज चुकीच्या पद्धतीने नामंजूर केले तर १७ जणांचे अर्ज अपात्र ठरत असताना देखील पात्र ठरविले, याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते मिलिंद मुळे यांनी पणन संचालक यांच्याकडे अपील केले होते. यावर मंगळवारी (दि.८ ) एप्रिल रोजी पणन संचालक विकास रसाळ यांच्यासमोर सुनावणी पार पडली. त्यावरील अंतिम निकाल १५ एप्रिलपूर्वी अपेक्षित आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची रणधुमाळी सध्या सुरू आहे. १६ एप्रिलला उमेदवारांची माघार असून १७ एप्रिलला चिन्हासह अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. दहा दिवस प्रचारासाठी वेळ असून २७ एप्रिल रोजी मतदान तर २८ एप्रिलला मतमोजणी होणार आहे. १८ संचालकांसाठी सुमारे ४०० उमेदवारांचे अर्ज आहेत. अर्जाच्या छाननीवेळी १७ जणांचे अर्ज चुकीच्या पद्धतीने मंजूर केल्याची काहींनी हरकत घेतली होती. तर चार अर्ज पात्र असताना अपात्र ठरविल्याची तक्रार होती. त्यावर मंगळवारी एकत्रित पुण्यातील पणन संचालक कार्यालयात सुनावणी पार पडली. यावेळी हरकतदार, अर्जदारांचे वकील व काही उमेदवारही उपस्थित होते. यावेळी बाजार समितीच्या वतीने ॲड. उमेश मराठे, बाजार समितीचे सचिव श्री. सूर्यवंशी, रजपूत उपस्थित होते. तर जिल्हा उपनिबंधकांच्या वतीने सहायक उपनिबंधक आबा गावडे पुण्याला गेले होते. यावेळी जिल्हा विशेष लेखापरीक्षक विष्णू डोके यांना बोलावण्यात आले होते. पणन संचालक विकास रसाळ यांनी सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीसाठी मंजूर, नामंजूर केलेल्या २१ अर्जांवर सुनावणी घेतली. त्यावेळी प्रत्येकाच्या वकिलांनी त्यांची बाजू भक्कमपणे मांडली. जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक, बाजार समितीच्या वतीने देखील म्हणणे मांडण्यात आले. आता त्यावर सहा ते सात दिवसांत पणन संचालक अंतिम निर्णय देणार आहेत. तो मान्य नसेल तर पुढे काहींनी न्यायालयात जाण्याची देखील तयारी केल्याचे बोलले जात आहे.





# विश्व नवकार महामंत्र दिनानिमित्त सकल जैन समाज एकवटला

## समाज बांधवाचे सामूहिक संगीतमय नवकार मंत्राचे पठण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

जैन धर्मियांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांचा जन्मकल्याणक महोत्सवानमित्त सोलापूर सकल जैन समाजच्या वतीने बुधवार ९ एप्रिल रोजी सकाळी ८.०१ ते ९.३६ या वेळेत बाळीवेस येथील गांधी नाथा रंगजी जैन जनमंगल प्रतिष्ठान येथे विश्व नवकार मंत्र दिवस साजरा करण्यात आला.

जीतो या इंटरनॅशनल संस्थेच्या वतीने जगातील आठशे करोड मनुष्य व प्राणी यांच्या कल्याणासाठी विश्व नवकार मंत्र दिवस साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार मरूधर केसरी मिश्रीलालजी व प.पू.रूपमुनी जी म.सा यांचे आज्ञानुवर्ती सुशिष्या प.पू.रिद्धीश्रीजी व प.पू.सिद्धीश्रीजी म.सा.आदि ठाणा २ यांच्या मंगल सानिध्यात संगीतमय णमोकर मंत्राचे पठण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गांधी नाथा रंगजी जैन जनमंगल प्रतिष्ठानचे संजय गांधी यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात सकल जैन समाजातील मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण, भ.महावीर फोटो अनावरण तसेच दीप प्रज्वलनाने करण्यात आली. ध्वजारोहण संजय गांधी, वैशाली गांधी, इंदरमलजी जैन, हर्षवर्धन बुबणे, सुधीर पंडित, निशा गांधी, स्नेहा वनकुद्रे, डॉ सुजाता मेहता,अंजू गांधी,जितेंद्र बलदोटा यांच्या हस्ते झाले. भ.महावीर फोटो अनावरण मयुरी संचेती, मयुरी विभुते, पंकजा पंडित, कविता चोरडिया, रेखा मेहता, साधना संघवी, संगीता जैन, प्रिया पाटील यांनी केले. दीप प्रज्वलन पदमजी राका, संजय गांधी, सुनील गांधी, इंदरमलजी जैन , श्याम पाटील, कैलास कोठारी, कनुभाई शहा, अनिल माणिकशेटे, सोनाली पालिया, पिंकी कवाड यांनी केले.



गांधी नाथा रंगजी जैन जनमंगल प्रतिष्ठानचे सर्व शिक्षक व कर्मचारी यांच्या सहकार्यातून तन, मन व धनाने स्विकारुन कार्यक्रम यशस्वी केला. सोलापूर मधील सर्व जैन मंदिर, युवा व महिला मंडळ, शैक्षणिक व सामाजिक संघटना ट्रस्टी व पदाधिकारी यांनी संजय गांधी यांना साथ दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.मनीष शहा व प्रथमेश कासार यांनी केले. प्रसिद्धीमाध्यमाचे काम शाम पाटील व प्रा.धनंजय शहा यांनी पाहिले.

### २१ लाख वेळा णमोकार मंत्राचे उच्चारण

चेतनजी बाफना आणि त्यांचे संगीत देणारे साथीदार यांच्या उत्कृष्ट मंत्रमुग्ध नमोकार मंत्राच्या विविध चालीतून संगीतमय सामूहिक नवकार मंत्राचे पठण करण्यात आले. या कार्यक्रमास चारही पंथातील जैन मंदिर ट्रस्टी,पदाधिकारी सहित २ हजार जैन बांधव शुभ्र वस्त्रात उपस्थित होते. त्यांनी एकत्र येऊन विश्वकल्याणाची मनोकामना पूर्ण करण्यासाठी २१ लाख वेळा ''णमो अरिहंताणं, णमो सिध्दाणं, णमो आयरियाणं, णमो उवज्झायाणं, णमो लोए सव्व साहूणं'' या णमोकार मंत्राचे उच्चारण केले. समारोप साध्वींच्या मंगल आशीर्वादाने झाला.




कामगार नेते जानराव लिखित

## ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचा लढा’

**पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन**

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

कामगार नेते अशोक जानराव लिखित ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचा लढा'' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवार दि. १२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे होणार असल्याचे संकल्प प्रकाशनचे प्रकाशक डॉ. धम्मपाल माशाळकर यांनी सांगितले.

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ होणार आहे. यावेळी माजी आमदार नरसय्या आडम, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त रवी पवार, महापालिकेचे मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर, उपायुक्त आशिष लोकरे, ज्येष्ठ साहित्यिक दत्ता गायकवाड, बसपाचे प्रदेश महासचिव एड. संजीव सदाफुले आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.


## ज्ञानामृत आनंदलहरी - १०८२

**गांजा भांग आफु घेऊ नका सुरा। दारिद्र्य संसारा आणाल ते।।**
**धन जाय अब्रू हीन होय बल। शरिराचे हाल दु:ख भोगी।।**

मी उदगीरला शिकायला असतांना व्यसनमुक्ती या विषयावर एका व्याख्यात्याचे एका ठिकाणी व्याख्यान आयोजित केले होते. व्यसनमुक्ती ही काळाची गरज आहे आणि युवकांनी या कामी सक्रीय सहभागी होणे अत्यंत आवश्यक आहे, असे वारंवार आमच्या महाविद्यालयातून सांगीतले जात होते. त्यामुळे आणि हा एक गंभीर सामाजिक विषय म्हणून आम्ही या कार्यक्रमास उपस्थित होतो. संत सेना महाराजांच्या,

**गांजा भांग आफु घेऊ नका सुरा। दारिद्र्य संसारा आणाल ते।।**
**धन जाय अब्रू हीन होय बल। शरिराचे हाल दु:ख भोगी।।**

या वचनाप्रमाणे ते व्याख्याते छान बोलत होते. आम्हा सर्वांना ते बोलणे खूप आवडत होते. खरोखरच त्यांचे व्याख्यान अत्यंत मार्मीक, हृदयस्पर्शी व दिशादर्शक झाले.



त्यांची बोलण्याची पध्दत, इशारे, हावभाव, आवाजातील चढ-उतार सर्वकाही अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी होते. त्यांच्या व्याख्यानाने मी आणि माझे मित्र भारावुन गेलो होतो. कार्यक्रमानंतर मला त्यांना जवळून भेटावे, त्यांच्याशी दोन शब्द बोलावेत असे वाटल्याने मी माझ्या एका मित्रासह ते व्याख्याते जेथे थांबले होते, तेथे गेलो. संयोजक त्यांची योग्य ती व्यवस्था करून निघून गेले होते. आम्ही त्यांच्या परवानगीने आत गेलो. खोलीमध्ये सिगारेट ओढल्याचा वास आणि धुर अद्याप होता. सिगरेटचे बुरकुंडही टेबलावर होते. आम्ही मित्रांनी एकमेकांकडे साशंकतेने पाहिले. पण आमच्या हावभावाचे, चुळबुळ करण्याचे त्यांना कांही विशेष वाटले नाही, असे आम्हाला जाणवले. मला राहावले नाही. म्हणून मी बोलता-बोलता त्यांना याबाबत भीतभीत विचारले. मी लहान असल्यामुळे ते एकेरी भाषेत मला म्हणाले, अरे खूप थकवा आला होता, म्हणून सहज दोन झुरके घेतले, अन्यथा तल्लफ म्हणुन मी कधीही सिगारेट ओढत नाही. असे बोलतांना त्यांना किंचीतही खेद वाटल्याचे किंवा मुलांना आपण असे उत्तर कसे दयावे याबाबत काही वाटल्याचे मला त्यांच्या बोलण्यातून किंवा हावभावावरुन जाणवले नाही. असो, ज्या उत्सुकतेने आणि आदराने आम्ही त्यांच्या भेटीसाठी आलो होतो, ती उत्सुकता आणि आदर आपोआप मावळला होता. थोडेफार बोलून आम्ही तेथून निघून आलो. आपण सांगतो काय आणि करतो काय ? याचा ताळमेळ घालण्याचा जो प्रयत्न करीत नाही, त्याच्या कोरड्या शब्दांना भारावून जाण्यात अर्थ नाही, असा विचार माझ्या मनात वारंवार येत होता. यांच्या ऐवजी अन्य कोणीही सिगारेट, बीडी ओढली असती तर मला एवढे वाईट वाटले नसते; पण त्यांच्या सिगारेट ओढण्याचे मला खूप वाईट वाटले. कारण यामुळे माझ्या भावनेला, विश्वासाला तडा गेला होता. असो, कुणाच्याही भावनेशी खेळण्याचा किंवा विश्वासाला तडा देण्याचा आधिकार कोणालाही नसतो. इतरांचे तर सोडाच; पण स्वत:च्या कुटुंबातील सदस्यांच्याही भावनेला, विश्वासाला तडा देण्याचा अधिकार आपणाला नसतो. हे ज्ञानामृत लक्षात ठेवुन वागले तर आपल्या कुटुंबात आनंदाच्या लहरींना उणीव असणार नाही, असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. १० एप्रिल २०२५ | श्री महावीर जयंती |
| विक्रम संवत् २०८१ | आसरादेवी यात्रा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. त्रयोदशी (२५.००) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पु. फालुग्नी (१२.२३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वृध्दि (१८.५७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (११.५५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ** : आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन** : सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क** : व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह** : प्रतिस्पध्र्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या** : उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ** : आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक** : कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु** : सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर** : दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ** : व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन** : श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.

# थॅलेसेमिया मुक्त भारतासाठी सर्वंकष, संघटित प्रयत्नांचा पुण्यात निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ९ एप्रिल-**

थॅलेसेमिया या रक्ताच्या गंभीर आजारावर रुग्णांचे उपचार व्यवस्थापन, वाहक शोध आणि समाजप्रबोधन या त्रिसूत्रीवर काम करण्यासाठी 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती' आणि 'जनकल्याण रक्त केंद्र साखळी' यांच्या वतीने संयुक्त प्रयत्न केले जाणार असून त्याचा प्रारंभ पुण्यातून करण्यात आला.



पुण्यातील 'सेवा भवन' येथे जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून या उपक्रमासंबंधीची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य भय्याजी जोशी, 'जनकल्याण समिती'चे अध्यक्ष डॉ. अजित मराठे, 'जनकल्याण रक्त केंद्र साखळी'चे अध्यक्ष डॉ. दिलीप वाणी आणि राज्य रक्त संक्रमण परिषदेचे सहाय्यक संचालक डॉ. महेंद्र केंद्रे यांची कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती. थॅलेसेमिया या समस्येच्या संदर्भात काम करणारी रक्त केंद्र आणि सामाजिक संस्थांना एकत्र आणून त्यांच्या कार्याचे सुसूत्रिकरण 'जनकल्याण समिती' आणि 'जनकल्याण रक्त केंद्र साखळी' यांच्यातर्फे केले जाणार आहे.

जेव्हा सामूहिक व प्रभावी प्रयत्न होतात तेव्हा वैद्यक क्षेत्रासमोर येणाऱ्या नित्य नवीन आव्हानांवर मात करता येते, असे पूर्वीचा इतिहास सांगतो. अशाच पद्धतीचे प्रयत्न सर्वांनी मिळून आणि सर्वंकष पद्धतीने आपण केलेतर आपण याही आव्हानावर मात करून थॅलेसेमिया मुक्त समाजाच्या दिशेने वाटचाल करू शकतो, असा विश्वास भय्याजी जोशी यांनी यावेळी व्यक्त केला.रेड क्रॉस सोसायटीचे सचिव डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी या समस्येच्या वेगवेगळ्या अंगांचा विचार प्रतिनिधींसमोर मांडला. डॉ. चिन्मय उमरजी यांनी आजाराची शास्त्रीय माहिती आणि सध्याचे प्रचलित व्यवस्थापन याची माहिती दिली. थॅलेसेमिया सोसायटी पुण्याच्या अध्यक्ष डॉ. नीता मुन्शी आणि राज्य रक्त संक्रमण परिषद, सहाय्यक संचालक, डॉ. महेंद्र केंद्रे यांनी थॅलेसेमिया आजार आणि त्याच्याशी सामना करण्यासाठी आवश्यक प्रयत्न या विषयावर मार्गदर्शन केले. थॅलेसेमिया रुग्णांचे व्यवस्थापन या विषयावर संभाजीनगरच्या डॉ. मंजुषा कुलकर्णी आणि डॉ. लिझा बलसारा यांनी थॅलेसेमिया मुक्त समाजासाठी थॅलेसेमिया तपासणी या विषयावर डॉ. अतुल कुलकर्णी आणि डॉ. अमर सातपुते यांनी तसेच थॅलेसेमिया विषयाचे व्यापक समाज प्रबोधन या विषयावर प्रदीप पराडकर आणि डॉ. आशुतोष काळे यांनी चर्चा समन्वयन केले. थॅलेसेमिया हा रक्ताचा एक अनुवांशिक आणि अतिशय गंभीर आजार आहे. वाहक पती-पत्नी एकत्र आले तर मुलांना हा आजार होतो. या आजारावर आज किफायतशीर उपचार नसल्यामुळे ठराविक कालावधीनंतर वारंवार त्यांना रक्त द्यावे लागते. या आजाराबाबतचा सर्वंकष विचार कार्यशाळेत करण्यात आला. राज्यातील १८ जिल्ह्यांतील २४ संस्थांचे तसेच १५ रक्त केंद्रांचे प्रतिनिधी कार्यशाळेत उपस्थित होते.



# वारांगणा व तृतीयपंथी यांचे मोफत वैद्यकीय तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने समाजातील उपेक्षित व दुर्लक्षित समाज घटक असलेल्या वारांगणा व तृतीयपंथी यांच्यासाठी श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत अशा प्रकारच्या उपेक्षित व दुर्लक्षित समाज घटकांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिर राबवणारे डॉ. वै. स्मृ. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय ठरले आहे.

मोफत वैद्यकीय शिबिरात ११२ महिला व २८ तृतीयपंथी यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय शिबिरामध्ये स्तन कर्करोग, लठ्ठपणा, थायरॉईड मोतीबिंदू, मुख आरोग्य, गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर तसेच शुगर, एच.आय.व्ही. इत्यादी तपासण्या करण्यात आल्या व रुग्णांना आभाकार्ड देण्यात आले. डॉ. विद्या तिरणकर, डॉ.अग्रजा चिटणीस, डॉ. औदुंबर मस्के, डॉ. पायल सैयम, डॉ. वैभव गोटे, डॉ. वैष्णवी, डॉ. श्रमा कोरेमोरे, डॉ. रायखेलकर, डॉ. शशिकला जगताप, श्री. जवंजाळ, राजू माने, स्वरूप इंदापुरे, ॲड. देवयानी किणगी, श्रीमती. रेणुका जाधव यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



# स्वच्छता कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

महानगरपलिकेच्या वतीने दि. ३ ते १७ एप्रिल या कालावधीमध्ये आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील झाडूवाला, बिगारी, सफाई कामगार (रोजंदारी व बदली कामगारासह) या सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी कार्यशाळा घेण्यात येत आहे.

कार्यशाळेस अतिरिक्त आयुक्त रवि पवार, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधिक्षक अनिल चराटे, संबंधित झोनचे मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक होते. घनकचरा व्यवस्थापन विभाग क्र.१ ते ८ कडील सर्व चतुर्थ श्रेणी सेवकांना दैनंदिन वेळेवर उपस्थित राहणे, स्वच्छता, झाडलोट, डिव्हाडरलगत व फुटपाथलगत साचलेली माती काढणे, डिव्हाडरमधील कचरा काढणे, डिव्हाडरमधील वाढलेली झाडे छाटणी करणे, सेवापुस्तक वेळेवर अद्यावत करून घेणे, रजेचे अर्ज वेळेवर जमा करणे इत्यादी कामकाजामध्ये सुसूत्रता येण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. आजतागायत झोन क्र.१ ते ३ ची क्षमता बांधणी कार्यशाळा घेण्यात आली आहे. झोन क्र.४ ते ८ चे नियोजन आहे.

## रविवारी बौध्द वधू-वर परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मंगल परिणय ग्रुप लातूरतर्फे रविवार, दि. १३ एप्रिल रोजी उपलप मंगल कार्यालय येथे सकाळी ११ ते ६ या वेळेत बौध्द वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले असून सदरील मेळाव्यास सोलापूर, पुणे, सांगली, सातारा, उस्मानाबाद, लातूर, बीड, अहमदनगर जिल्हयातील विवाह इच्छुक मुले - मुली व त्यांचे पालक उपस्थित राहणार आहेत, तसेच विधवा, विधूर, घटस्फोटीत व अपंग विवाह इच्छुक मुले मुली सुध्दा उपस्थित राहणार आहेत. मेळाव्याला येताना बायोडाटा व फोटो सोबत घेऊन यावे, असे आवाहन मंगल परिणय ग्रुपचे अध्यक्ष अनिल गायकवाड (मो.नं. ९६८९९८४२६१) हरिभाऊ कोनाळीकर, इंजि, मारुती कांबळे, पी. आर. शिंदे, प्रभाकर कांबळे, रमाकांत घोडके, रमेश जाधव यांनी केले आहे.

# सोनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालय येथे सोनी इंटरकॉलेज स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये १) ॲप्टीट्युड टेस्ट २) सी प्रोग्रॅमिंग ३) वेबसाईट डिझाईन ४) जनरल नॉलेज या चार स्पर्धा घेण्यात आल्या.

स्पर्धेसाठी सोलापूर शहरातून १२ महाविद्यालयातून २५२ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष लक्ष्मीकांतजी सोमाणी, सदस्य जवाहरजी जाकेटिया, सदस्या उमाजी बलदवा, काननजी मिणीयार व महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. वासंती अय्यर, प्राचार्या प्रा. डॉ. आशा रोकडे, कॉम्प्युटर विभाग प्रमुख नवनाथ भंडारे हे सर्व मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या सर्वांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली.



### या विविध स्पर्धेचा निकाल (प्रथम दोन)

ॲप्टीट्युड टेस्ट स्पर्धा - सादिया नदाफ (डी.एच.बी. सोनी कॉलेज), झायबुनीसा नदाफ (संगमेश्वर कॉलेज). सी प्रोग्रॅमिंग स्पर्धा - अंबादास गणपा- (के.पी. मंगळवेढेकर कॉलेज), योगेश कुरडुले (डी.एच.बी. सोनी कॉलेज) वेबसाईट डिझाइन स्पर्धा - सागर माशाळे (संगमेश्वर कॉलेज), झवेरिया मुजावर (ए.आर. बुर्ला कॉलेज) व अमन मर्चेंट ( डी.एच.बी. सोनी कॉलेज). जनरल नॉलेज स्पर्धा : सुप्रित फुलारी ( व्ही. जी. शिवदारे कॉलेज), प्रथमेश झिंगाडे (डी. एच.बी. सोनी कॉलेज).

प्रस्ताविक प्रा.अरविंद बगले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शरयु महाजन व आभार सुष्मिता इंगळे यांनी मानले. चारही स्पर्धा प्रत्येकी १०० मार्क व ७५ मिनिटे कालावधीत घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. वासंती अय्यर, प्राचार्या प्रा. डॉ. आशा रोकडे, विभाग प्रमुख प्रा. नवनाथ भंडारे व प्रा. अरविंद बगले यांच्या हस्ते ट्रॉफी, सर्टीफिकेट, रोख रक्कम प्रथम क्रमांकासाठी रु. १५००/- व व्दितीय क्रमांकासाठी रु. १२००/- देऊन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# रेल्वे पुलावरील 'ते' बॅरिकेट्स काढावेत

## बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**


भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्तच्या मिरवणुकीसाठी दि. १९ ते २१ एप्रिल दरम्यान साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकातील रेल्वे पुलावरील बॅरिकेट्स गर्डर (लोखंडी कमान) काढण्यात यावी या मागणीचे निवेदन बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने वरिष्ठ वाणिज्य अधिकारी योगेश पाटील यांना देण्यात आले.



शहरातील विविध भागातील २० ते २५ मंडळे मिरवणूकीमध्ये देखावे, डेकोरेशनच्या गाड्या घेऊन मध्यवर्ती मंडळात सहभागी होत असतात. त्यास अडथळा होऊ नये म्हणून गर्डर (लोखंडी कमान) काढून घेण्यात यावीत. कमान काढून घेतल्यास तेथील अंदाजे २० ते २५ मंडळाची गैरसोय टळेल. मंडळांना मिरवणूकीत सामील होता येईल, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी विश्वस्त समितीचे बाळासाहेब वाघमारे, आनंद चंदनशिवे, मिलिंद प्रक्षाळे, विकी शेंडगे, रॉकी बंगाळे, अजित बनसोडे, अशितोष नाटकर, विनोद वाघमारे, अविनाश भडकुंबे, दत्ता शिंदे, चंद्रकांत सोनवणे, लखन भंडारे, उमेश रणदिवे, विनोद वाघमारे, पंकज ढसाळ, चेतन भडकुंबे, अजय कांबळे, नितीन ओव्हाळ, रियाज दिना मेंबर, बाळासाहेब बनसोडे, दीपक गवळी, अमोल कदम, भीमा मस्के, रवी बनसोडे, जयराज सांगे उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०).



आपल्या समोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१


### अलक: १०३
### सामाजिककार्य

समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात काम करणारी रा. स्व. संघ ही संघटना आहे. राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी संघ धावून जातो. ठडड च्या सामाजिक कार्यात राष्ट्रहिताची भावना असते. उदाहरणार्थ १९७७ च्या आंध्र प्रदेश मधील चक्रीवादळाच्या वेळी संघाने भारतभरातून धन एकत्र करून त्यांना विविध रूपात मदत केली. १९८४ च्या भोपाळ गॅस त्रासदीच्या वेळी पीडित परिवारांना मेडिकल हेल्प दिली. २००१ च्या गुजरात भूकंपात संघाची स्वतः ची उपचार केंद्रे होती. २००४ च्या सुनामी च्या वेळेस १५० गावांना मदत पोहोचवली. २००६ च्या सुरत महापुराच्या वेळी जरुरी सामान पोचवले. २०१३ च्या उत्तराखंड महापुरात एकट्या संघाची १० कार्यालय होती व तिथे हजारो कार्यकर्ते मदत करत होते. २०१६ च्या बिहार पूरा मध्ये ११००० संघ कार्यकर्त्यांचा सहायता विभाग काम करत होता. २०१७ चा गुजरात महापूर, २०१८चा केरळ महापूर अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

**- क्रमशः**

# भगवान महावीर आणि विश्वशांती

स्पर्धेच्या युगात जीव मुठीत धरून सैरावैरा धावणाऱ्या मानवाला शाश्वत आनंद न भेटल्याचे दु:ख भेडसावत आहे. जगात सगळीकडे अस्थिरता असताना एकीकडे जवळ काहीच नाही म्हणून गरीब दु:खी आहे, तर दुसरीकडे सर्व काही असताना सुद्धा मानसिक समाधान नसल्याने व्याधीग्रस्त कुबेरपती सुद्धा दु:खी आहे. हे असे का ? खरे सुख कशात आहे, खरा आनंद कशात आहे ? अमाप संपत्ती असताना सुद्धा जीवन कंटकमय वाटत असेल तर खरा सुखी कोण हा प्रश्न आपल्यासमोर उभा राहतो. अशावेळी आपल्याला भोग म्हणजे जीवन नाही तर त्याग म्हणजेच जीवन आहे, असा संदेश देणारे, दुसऱ्यांच्या कल्याणामध्ये आपले कल्याण आहे असे म्हणणारे, आपला आत्मा हाच वैभवशाली आहे असे म्हणणारे, 'जगा आणि जगू द्या' ही शिकवण देणारे जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर यांची आठवण होते. त्यांचे संपूर्ण जीवनच एक शिकवण आहे, कारण इसवी सन पूर्व ५९९ मध्ये चैत्र शुक्ल त्रयोदशी रोजी जन्म घेणारे आणि वर्धमान, सन्मती, वीर, अतिवीर, महावीर अशी पाचही नावे सार्थक करणाऱ्या महावीरांनी ३० व्या वर्षी राजवैभवाचा त्याग करून जगाला 'आप्पा हा परमाप्पा' म्हणजेच आत्मा हाच परमात्मा असून आत्मिक वैभव हेच खरे वैभव आहे असल्याचे सांगितले. त्यांनी तिसाव्या वर्षी घराचा त्याग करून बारा वर्षे, पाच महिने, पंधरा दिवस तपश्चर्या करत घाती कर्म नाश करून पुढे तीस वर्षे काशी, कोशल, त्रिगर्त, पांचाल, कलिंग, कुरुजांगल, कैकय, आत्रेय, कंबोज, यवन, सिंध, गांधर तसेच उत्तर दिशेतील तार्ण, कार्ण यासारख्या देशांत विहार करत सत्य, अहिंसा, अचौर्य, अपरिग्रह, ब्रह्मचर्य यासारख्या नैतिक



मूल्यांचा प्रचार प्रसार करीत मानवतेचा संदेश दिला. भगवान महावीरांनी अनेकांतवाद सांगत असताना सर्वांना आपल्या सोबत घेऊन पुढे जाण्याचा सल्ला दिला. पण आज समाजात सामाजिक विषमता, स्त्री पुरुष भेदभाव, भ्रष्टाचार, वाढत्या आत्महत्या, पर्यावरणाचा ऱ्हास अशा समस्या भेडसावत आहेत. अशा परिस्थितीतही मानव आपल्या अस्तित्वासाठी आत्मिक सुखासाठी संघर्ष करीत आहे. भगवान महावीर यांचे विचार आपल्याला मन शुद्धीसाठी मोह, राग, द्वेष, लोभ, ईर्ष्या इत्यादी त्याग करून, चार कषायांचा त्याग करून सन्मार्गावर जाण्यासाठी प्रवृत्त करतील यात शंका नाही. भगवान महावीरांनी जगाला अहिंसेचा मार्ग दाखवला. याच मार्गाने भारत स्वतंत्र झाला. महावीरांची अहिंसा म्हणजे शत्रूसमोर गुडघे टेकणे असा अर्थ नसून शत्रूला सुद्धा आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रवृत्त करणे असे आहे. आज आपण भारतीय संविधानाच्या दृष्टीने सर्वजण समान आहोत पण भगवान महावीरांनी आपल्या समवशरणात सर्वसामान्य व्यक्तींसह, तीन लाख अठरा हजार महिलांना स्थान दिले. एवढेच नव्हे तर त्यांच्या समवशरणात छत्तीस हजार आर्यिकांना स्थान देण्यात आले होते. इसवीसन पूर्व काळात महावीरांनी दासी प्रथेचा विरोध करत महिलांना संपत्तीचा अधिकार आहे, असे नमूद केले. स्त्रियांना दासी, गणिका म्हणून तुच्छ लेखण्यापेक्षा त्यांच्यात दडलेले चांगले विचार स्विकारले पाहिजे असे म्हणणाऱ्या भगवान महावीरांनी स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. त्यांच्या समवशरणात हिंस्र पशु देखील महावीरांच्या अमृत वाणीने आत्मकल्याण साधत होते. आज मानव दीर्घायुष्यासाठी प्रयत्न करत आहे पण महावीरांनी शरीर शुद्ध ठेवण्यासाठी सप्त व्यसनांचा त्याग करून आपल्याला अष्ट मूलगुण व मुनींना अठ्ठावीस मूलगुण पालन करण्यास सांगितले. त्यांचे विचार आचरणात आणल्यास आरोग्य संपन्न राहिल यात शंका नाही. जगातील अनेक देशांमध्ये होणारे युद्ध, दहशतवादी हल्ले, महायुद्धाची भिती पाहता महावीरांनी दिलेली अहिंसेची शिकवण महत्त्वाची वाटते. त्यांचे विचार ग्रंथात बंद न ठेवता आचरणात आणल्यास जगात शांतता प्रस्थापित होईल यात शंका नाही.

**- प्रा. धन्यकुमार बिराजदार,**
सोलापूर
९४२३३३०७३७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### लिटिल मास्टर स्कूलमध्ये कागदी पिशव्या बनविण्याची कार्यशाळा

**माढा, दि. ९ एप्रिल-**

लिटिल मास्टर इंग्लिश मीडियम स्कूल, शेटफळ येथे रद्दी कागदापासून कागदी पिशव्या बनवण्याची कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना घरातला टाकाऊ कागद व वस्तू पासून कागदी पिशव्या बनवण्याचे प्रात्यक्षिक कलाशिक्षक अण्णाराव खंडागळे यांनी दाखवले. विद्यार्थ्यांनी सुरेख, सुंदर, रंगीबेरंगी पर्यावरण पूरक अशा कागदी पिशव्या तयार केल्या. जणू शाळेला कागदी पिशव्या बनविण्याच्या बाजारपेठेचे स्वरूप आले होते. या कागदी पिशव्या विद्यार्थी आपल्या घरामध्ये वापरणार आहे. असे विद्यार्थ्यांनी सांगितले. या कार्यशाळेत ३२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ही कार्यशाळा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजयराजदादा डोंगरे, मार्गदर्शक अजय डोंगरे, यांच्या मार्गदर्शनाने घेण्यात आली. प्राचार्य फराह शेख, कार्यालयीन अधीक्षक चेतन कोरके, कलाशिक्षक अण्णाराव खंडागळे, श्रीकांत पुजारी, संतोष कवडे, रवीकिरण वसेकर, गजानन क्षिरसागर, स्वप्नील चव्हाण, जयसल पवार, शुभम डुचाळ, लक्ष्मी वागज, सुषमा भोसले, योगिनी चांदेकर, अमृता वाघमारे, अंजना दाडे, शुभांगी ढोले, सपना भोसले, वैशाली कोळेकर यांनी परिश्रम घेतले.




### रामनवमीनिमित्त रसना पेयाचे वाटप

**बार्शी, दि. ९ एप्रिल-**

येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय,बार्शी सोमवार पेठ येथे वाचनालयातर्फे श्रीराम नवमीनिमित्त मिरवणुकीतील भाविक भक्तांना दि. ६ एप्रिल रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत पाच हजार नागरिकांना रसनाचे वाटप करण्यात आले. वाचनालयाचे पदाधिकारी व संचालक मंडळ यांच्यातर्फे रसना वाटप करण्याचे नियोजन करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, ऑ. सेक्रेटरी आनंद पुनमिया, संचालक धीरज कुंकूलोळ,आनंद सुराणा, प्रमोद भंडारी उपस्थित होते. रसना वाटप करण्यासाठी श्री वर्धमान स्थानकवाशी जैन श्रावक संघ (श्री जैनाश्रम) बार्शीचे ऑ. सेक्रेटरी ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ, संचालक गौतम बोथरा जेष्ठ श्रावक मणिलाल बोथरा हे उपस्थित होते. तसेच युवक वर्ग माणिक सुराणा, महावीर दुगड, सुजित गुंदेचा,अतुल गुगळे, किरण श्रीश्रीमाळ, पवन श्रीश्रीमाळ, रोहन श्रीश्रीमाळ,यश कुंकूलोळ,राज कुंकूलोळ,वैभव बोथरा, शौर्य गुगळे, शर्वरी भंडारी, निलेश वखारिया, संजय लोहिया,राहुल भंडे, भगवान डोईफोडे, देवराज व देवांश पतंगे या युवकांनी रसना वाटप करण्यासाठी योगदान दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव व क्लार्क विराज पतंगे यांनी परिश्रम घेतले.



### सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात भाजपचा स्थापना दिवस साजरा

**सांगोला, दि. ९ एप्रिल-**

सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात भाजपचा स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पाच विधानसभा मतदारसंघातील १४ मंडलामध्ये दोन हजार ५६ पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या ऑनलाइन कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, संघटन पर्वचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मार्गदर्शन केले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली. यावेळी मार्गदर्शन करताना दीड कोटी सदस्य नोंदणी झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात २ लाख ७८ हजार ९१३ सदस्य नोंदणी झाली आहे. माजी आमदार राम सातपुते, राजेंद्र राऊत, प्रशांत परिचारक यांनी भाजपच्या स्थापना दिवसाच्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. चेतनसिंह केदार-सावंत यांनी सांगोला तालुक्यातील जुजारपूर येथे भाजप पक्ष कार्यालयात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी भाजपच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी ऑनलाइन कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, बाळाप्पा येलपले, लक्ष्मण येलपले, अनिल चौगुले, विनायक बाबर, विष्णू हिप्परकर, मोहन बजबळे, सागर बजबळे, विश्वास करडे, विजय पवार, गणेश घाडगे उपस्थित होते.

### डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त बार्शीत शांतता कमिटीची बैठक

**बार्शी, दि.९ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पोलीस प्रशासनाच्यावतीने सोमवारी (ता. ७) स्व. यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृहात शांतता समितीची बैठक आयोजित केली होती. यावेळी व्यासपीठावर तहसीलदार एफ.आर. शेख, पोलीस उपाधीक्षक जालिंदर नालकुल, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, उपमुख्याधिकारी विठ्ठल पाटोळे, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, महावितरणचे अधिकारी तगारे उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने बैठकीस सुरुवात करण्यात आली. बैठकीस रिपाईचे पश्चिम महाराष्ट्र सदस्य सूर्यकांत लोंढे, तानाजी बोकेफोडे, दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे, संदीप आलाट, ॲड. प्रसन्नजीत नाईकनवरे, संदेश काकडे, प्रमोद गायकवाड यांनी विविध प्रश्न व अडचणी मांडल्या. यात प्रामुख्याने जयंतीनिमित्त पाणी पुरवठा सुरळीत करणे, रस्त्यातील खड्डे बुजवणे, मिरवणूक मार्गातील झाडांच्या फांद्या कापून घेणे, मिरवणुकीत दरम्यान रुग्णवाहिका, पाण्याचे वाहन ठेवणे याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी सनी गायकवाड, आबासाहेब बोकेफोडे, आबासाहेब थोरात, ॲड. अविनाश गायकवाड शरद बनसोडे, भाऊसाहेब कांबळे, हिंदू महासभेचे अनिल पवार, अजय वाघमारे सोनू भोसले, आनंद चांदणे उपस्थित होते. सूत्रसंचालन मिलिंद ताकपीरे यांनी केले. पिंटू जगदाळे, गुप्तवार्ताचे अमोल वाडेकर यांनी परिश्रम घेतले.

# अखेर फिश माफिया गँगच्या मुसक्या आवळल्या

## उजनी धरणात अवैध मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ९ एप्रिल-**

बंदी घातलेल्या वडाप व पंड्याच्या साहाय्याने बेसुमार मासेमारी करून मत्स्य संपदेचा व जैविकतेचा ऱ्हास करू पाहणाऱ्या उजनीतील फिश माफिया गँगवर जलसंपदा, महसूल, मत्स्यविभाग, पोलिसांनी धाडी टाकण्याची जोरदार मोहिम हाती घेतल्याने अवघ्या उजनीच्या कडेला कालपासून अवैध मासेमारी करणाऱ्या फिश माफियांचे कंबरडे मोडले आहे,

करमाळा तालुक्यातील कात्रज येथून या कारवाईला सुरुवात झाली. दिवसभर कात्रज, टाकळी, केत्तूर नं. १ आदी भागात ही कारवाई दिवसभर चालू होती. यामध्ये अधिकाऱ्यांच्या हाती लागलेल्या वडाप व पंड्याच्या जाळ्या नष्ट करण्यात आल्या. उजनीच्या काठी सुकवलेली मासळी गायब करण्यात आली. तर कारवाईच्या धास्तीने अनेक वडाप व पंड्याच्या जाळ्या खोल पाण्यात बुडवून ठेवण्यात आल्या. कारवाई सुरू झाल्याची माहिती मिळताच परराज्यातून, शेजारच्या जिल्ह्यातून आणलेले अवैध मासेमारी करणारे कामगारांना त्यांचे ठेकेदार व मालकांनी पळवून लावले. यामध्ये कोणी उसाच्या फडात, झाडा झुडपात, डोंगर मध्यावर, पाण्यातील मध्यभागी असलेल्या टेकड्यावर पळ काढून लपून बसले आहेत. जलसंपदा, मत्स्यव्यवसाय, महसूल विभागासह करमाळा पोलिस यांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली.



**अवैध मासेमारीमुळे विविध जाती नामशेष व प्रदूषणही वाढले**

दरम्यान उजनी जलाशयात वडाप व पंड्याच्या साहाय्याने झालेल्या बेसुमार मासेमारीमुळे धरणातील गावरान जातीच्या चाळीस ते पन्नास जाती दुर्मीळ व नामशेष झाल्या आहेत. तर प्रमुख कार्प जातीही त्यातून वाचल्या नाहीत. केवळ चिलापी, मांगुर, सकर या माश्यांच्या जातींचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे मत्स्य उत्पादन घटून रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. तसेच मासे हे नैसर्गिकरित्या प्रदूषण रोखण्याचे कार्य करीत असतात परंतु उत्पादन घटल्याने प्रदूषणही वाढले आहे.

**राज्यातील पहिला धोरणात्मक निर्णय**

दरम्यान घटलेले उत्पादन, रोजगाराचा निर्माण झालेला प्रश्न व वाढलेले प्रदूषण आणि स्थानिक मच्छिमार संघटनेची मागणी यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार व कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे, माजी आमदार संजय शिंदे यांच्या पुढाकाराने उजनीत २०२४ पासुन धरणात मत्स्यबीज सोडण्याचा राज्यातील पहिला धोरणात्मक निर्णय घेतला. या बीजाचे व इतर गावरान जातींच्या माश्यांचे संवर्धन व्हावे यासाठी वडाप व पंड्याच्या साहाय्याने मासेमारीवर बंदी घातली आहे.वडाप व पंड्याच्या जाळ्यात लहान, मोठे असे सर्वच मासे मारले जातात.

### मंद्रुपमध्ये ऐन ऊन्हाळ्यात विजेचा लपंडाव

#### उकाडयाने अबालवृध्द हैराण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

ऊन्हाचा पारा ४१ अंशावर पोहोचल्याने उकाडयाने नागरिकांच्या शरीराची लाही लाही होत आहे. अशातच वीज मंडळाकडून लपंडाव सुरू असल्याने नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. दुरूस्तीसाठी वीज कर्मचारी उपलब्ध नसल्याने नागरीकांकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

मंद्रुपमध्ये फेब्रुवारी महिन्यापासूनच ऊन्हाचा त्रास जाणवत आहे. अधिक ऊन्हामुळे वीजेची मागणी वाढली आहे. वीज मागणी वाढली असताना वीज मंडळाकडून अनियमित वीजपुरवठा करण्यात येत आहे. वीजपुरवठयात व्यत्यय येत असल्याने वारंवार वीजपुरवठा खंडीत करण्यात येत आहे. यामुळे अबालवृध्दांना त्रास सहन करावे लागत आहे. दिवसभर ऊन्हाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेल्याने उकाडयाने नागरीक हैराण होत आहेत. त्यामुळे वीज कर्मचारी उपलब्ध करून सुरळीत वीजपुरवठा करण्याची मागणी होत आहे.

**वारंवार वीज पुरवठा खंडीत**

मंद्रुपमधील हद्दवाढ भागात दिवसातून आठ ते दहा वेळा वीजपुरवठा खंडीत होते. वीज कर्मचार्यांकडे तक्रार केल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. यामुळे नागरीकांना त्रास सहन करावे लागत आहे. उकाडयामुळे अबालवृध्द हैराण होत आहेत. म्हणून वरीष्ठ अधिकार्यांनी सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी प्रयत्न करावे.

**- सावन चव्हाण,** उपाध्यक्ष, आरके फाउंडेशन मंद्रुप

### कुसमोडच्या उपसरपंचपदी रेखा पालखे बिनविरोध

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ९ एप्रिल-**



कुसमोड (ता. माळशिरस) येथील रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी रेखा पालखे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे उपसरपंचपदी रेखा पालखे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. येथील उपसरपंच स्वाती मदने यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्यामुळे हे पद रिक्त होते.

सरपंच शहाजी लेंगरे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व सदस्यांची आज बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी स्वाती मदने यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिला. ल्यानंतर रिक्त झालेल्या उपसरपंचपदासाठी निवडणूक घेण्याचे ठरेल. यावेळी रेखा पालखे यांचा एकमेव अर्ज दाखल झाले. त्यामुळे सरपंच लेंगरे यांनी रेखा पालखे यांची उपसरपंचपदी निवड झाल्याचे घोषीत केले. यावेळी माजी सरपंच तुषार लवटे, महावीर धायगुडे, माजी उपसरपंच स्वाती मदने ,ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब धायगूडे उपस्थित होते. निवडीनंतर नुतन उपसरपंच रेखा पालखे यांचा माजी उपसरपंच स्वाती मदने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नेते मनोहर लवटे, माजी उपसरपंच संजय पाटील, लक्ष्मण पवार, सुभाष जाधव, पोलीस पाटील विकास सरगर, उत्तम मोरे, ग्रामसेवक विजयकुमार नवले, उमाजी बोडरे, देवानंद चव्हाण, विशाल बोडरे उपस्थित होते. निवडीनंतर नुतन उपसरपंच रेखा पालखे व सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

### उमरडचा सिद्धेश वलटे राज्याच्या गुणवत्ता यादीत

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.९ एप्रिल-**

केतुर नं.१ (ता.करमाळा) येथील दत्तकला आयडियल स्कूलचा विद्यार्थी सिद्धेश किरण वलटे याने मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परिक्षेत राज्याच्या गुणवत्ता यादीत नववा आणि जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळविला आहे.

२ फेब्रुवारी २०२५ रोजी मंथन वेलफेअर फाऊंडेशन मार्फत घेण्यात आलेल्या मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परिक्षेत इयत्ता दुसरीचा विद्यार्थी सिद्धेश वलटे याने १५० पैकी १३४ (८९.३३ टक्के) गुण मिळवुन राज्यात नववा आणि जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळविला.



या यशासाठी दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामदास झोळ, उपाध्यक्ष राणा सूर्यवंशी, सचिवा माया झोळ, स्कूल डायरेक्टर नंदा ताटे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विशाल बाबर, प्राचार्य विजय मारकड यांनी अभिनंदन केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रातिष्ठानचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

#### पंढरपुरात १४ एप्रिल रोजी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ एप्रिल-**

येथील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानच्यावतीने १३४ व्या जयंतीनिमित्त सोमवारी (ता.१४) विविध क्षेत्रातील मान्यवरांचा शिवतीर्थ छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सायंकाळी ६ वाजता राज्यस्तरीय पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पंढरपूर शहराचा नावलौकिक केल्याबद्दल मान्यवरांचा विशेष सन्मान देखील करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक डी. राज सर्वगोड यांनी दिली.

**या वर्षीच्या पुरस्काराचे मानकरी**

प्रबुद्ध विधीज्ञ पुरस्कार- ॲड.प्रशांत चंदनशिवे, ॲड. संदीप कागदे, महर्षि वाल्मिकी शौर्यरत्न' पुरस्कार-सुनील कोताळकर. वर्धमान महावीर अहिंसारत्न' पुरस्कार-अरुण खडके. राष्ट्रसंत रोहिदास महाराज प्रबोधनरत्न' पुरस्कार प्रा.भारत पाटील, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासनरत्न' पुरस्कार डॉ. दीपक वाघमारे, राजमाता अहिल्यादेवी होळकर उद्योगरत्न' पुरस्कार संजय कबाडे, स्नेहा सिंदोल, रामभाऊ वाघमोडे, महात्मा बसवेश्वर समाजभूषण' पुरस्कार- सिद्धेश्वर कोरे, राष्ट्रपिता महात्मा फुले समाजरत्न' पुरस्कार- गौतम सोनवले(सांगली), प्रवीण पवार, श्याम बेंद्रे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिक्षणभूषण' पुरस्कार-शशिकला साबळे, शोभनतारा मेटकरी (सांगोला). राष्ट्रसंत गाडगे महाराज शिक्षणरत्न' पुरस्कार- डॉ.कुमार लोंढे (माळशिरस), विवेक चौगुले (पंढरपूर), अमोल देशमुख (बार्शी). नारायण मेघाजी लोखंडे कामगाररत्न' पुरस्कार-अनिल गोयल( पंढरपूर). डॉ. सी. के. बोले वैद्यकीयरत्न' पुरस्कार- डॉ. महेश सूडके,(पंढरपूर). राजश्री शाहू महाराज क्रिडारत्न' पुरस्कार- हेमंत रायगावकर (सांगोला), गणेश पाटील(सोलापूर). विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्येष्ठ पत्रकार' पुरस्कार- (प्रिंट मिडीया) - शिवाजी शिंदे, (पंढरपूर). इलेक्ट्रॉनिक्स मिडीया-नितीन शिंदे(पंढरपूर). आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर युवा पत्रकार' पुरस्कार (प्रिंट मिडीया)-श्रीकांत साबळे(पुणे). इलेक्ट्रॉनिक्स मिडीया- नागनाथ सुतार(पंढरपूर). साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न' पुरस्कार-डॉ. तानाजी मगर (अकलूज). स्वप्निल जमदाडे(पंढरपूर). महाकवी वामनदादा कर्डक कलारत्न' पुरस्कार- फुलचंद नागटिळक. डॉ.पंजाबराव देशमुख कृषीरत्न' पुरस्कार-रघुनाथ गोडसे, पंढरपूर, मिलिंद फडतरे, पंढरपूर. भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरया स्थापत्यरत्न' पुरस्कार-सोमनाथ दा, सोलापूर. भारतरत्न डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम विज्ञान रत्न' पुरस्कार-सिद्धार्थ बंगाळे, रणजीत शिनगारे. राजमाता जिजाऊ आदर्शमाता' पुरस्कार-भामाबाई बंगाळे, पंढरपूर. माता रमाई आदर्श पत्नी' पुरस्कार-अनुराधा सोनवणे, पंढरपूर. वीर शिवा काशीद वीररत्न' पुरस्कार-मेजर विक्रम नाईकनवरे, पंढरपूर. कर्मवीर भाऊराव पाटील जीवन गौरव पुरस्कार-अशोक कोर्टीकर, पंढरपूर. गौतम राजाध्यक्ष फोटोग्राफररत्न' पुरस्कार-किशोर काकडे, पंढरपूर. पंढरीरत्न पुरस्कार-रोहन कांबळे (इतर मागास कल्याणकारी अधिकारी), डॉ. प्राजक्ता क्षीरसागर (एमबीबीएस. एमडी भूलतज्ञ सोलापूर), सुहान जाधव (राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा तसेच क्लस्टर हॉलीबॉल मध्ये विशेष प्राविण्य), प्रसाद शिंदे (मोटर मेकॅनिक ट्रेडमध्ये देशात प्रथम).

उत्कृष्ट कृतिशील महिला बचत गट-विष्णुपंत दादरे महिला बचत गट-अध्यक्षा प्रियंका गेंड, पंढरपूर, रुक्मिणी महिला बचत गट, पंढरपूर-वर्षा साळुंखे, माही महिला बचत गट, पंढरपूर विद्या राऊत, स्मृती महिला बचत गट, पंढरपूर अनुराधा भुतडा, माऊली बेघर निवारा महिला बचत गट, पंढरपूर मधुमिता दुपारगुडे, यशोधारा महिला बचत गट, पंढरपूर, राणी गायकवाड, प्रगती महिला बचत गट, पंढरपूर रेश्मा गोयल. वसुंधरा पुरस्कार-डी.बिल्डर दत्ता बागल, गादेगाव पंढरपूर, सतीश खडके, पंढरपूर याचबरोबर दारू व्यसनमुक्तीसाठी अमलदीप टापरे, आदर्श पोलीस पाटील तोफिक शेख, आनवली यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

### हन्नूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव अध्यक्षपदी बाळशंकर

**अक्कलकोट, दि. ९ एप्रिल-**



हन्नुर (ता. अक्कलकोट) येथील न्यू भिम क्रांती तरूण मंडळ व लिंबुणी बुद्ध विहार यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त चंद्रमणी बाळशंकर यांची एक मतांनी निवड करण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष उमेश बाळशंकर, सचिव अजय दुपारगुडे सहसचिव रामचंद्र बाळशंकर, खजिनदार लक्ष्मण बाळशंकर, मिरवणूक प्रमुख संतोष बाळशंकर, गौतम बाळशंकर यांची निवड करण्यात आली. दि. २८ एप्रिल रोजी संध्याकाळी ठिक ९ वाजता भिम गीताचा कार्यक्रम होणार आहे. तसेच दि. २९ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता गावातून मिरवणूक काढण्यात येणार आहे.

### शासनाचा १०० दिवसांचा कृती कार्यक्रम ३६५ दिवस राबविण्याची गरज : आ. देशमुख

#### उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाच्या वतीने शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

लोकांचे स्थानिक पातळीवरील प्रश्न गाव, तालुका व जिल्हा पातळीवर सुटल्यास मंत्रालयातील गर्दी कमी होईल त्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेला १०० दिवसांचा कृती आराखडा ३६५ दिवस राबविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

राज्य शासनाच्या १०० दिवसांचा कृती आराखड्यात उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाने राबविलेल्या उपक्रमांतील लाभार्थ्यांना आदेश वाटपासाठी आ. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आ.देशमुख बोलत होते. अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे,तहसीलदार निलेश पाटील, गटविकास अधिकारी बाबासाहेब पाटील, राष्ट्रीय न्यास या दिव्यांगांच्या केंद्र सरकारच्या समितीचे जिल्हा कमिटी सदस्य पत्रकार दत्ता मोकाशी यावेळी उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्यात पहिल्यांदा हा उपक्रम राबविण्याचा मान उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाने पटकाविल्याचे सांगून आ. देशमुख म्हणाले, आता गाव पातळीवरील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी गावस्तरावर कृती आराखडा कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. उपविभागीय अधिकारी पडदुणे यांनी प्रास्ताविक केले.तहसिलदार निलेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. या विशेष शिबिरात सातबारा उता-यावरील पोट खराब नोंद असलेल्या २८० शेतकऱ्यांच्या उता-यावरील नोंद कमी करण्याचा आदेश दिला.याशिवाय ४२ ड खाली १५ शेतकरी,४२ ब अकृषिक ९० आदेश, २९ शेतकऱ्यांचा उता-यावर असलेला भूविकास बँकेचा बोजा, तगाईचा १३६ शेतकऱ्यांच्या उता-यावरील बोजा कमी केल्याचे उतारे, ५० लोकांना नवीन शिधापत्रिका, मार्डी येथील आठ बेघर लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेसाठी गावठाणातील भूखंड वाटप, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेतून दोन लाभार्थ्यांना मंजुरी आदेश आदी लाभाचे आदेश, सनद या शिबिरात वाटण्यात आल्या.



**निलेश पाटील यांचे कौतुक**

पूर्वी उत्तर सोलापूर तहसील कार्यालयातील कर्मचारी चहाच्या टपरीवर जास्त असतात, अशा तक्रारी यायच्या पण निलेश पाटील यांच्याकडे पदभार आल्यावर त्यांनी शिस्त लावली त्यामुळे लोकांच्या कामांचा निपटारा होत असल्याचे सांगून उपविभागीय अधिकारी पडदुणे यांनी तहसीलदार पाटील यांच्या कामाचे कौतुक केले. आ.देशमुख यांनीही त्यांचे कौतुक केले.

मी याच तालुक्यातील पण लोकांना मी आपला वाटत नसल्याची खंत व्यक्त करून आता प्रशासनातील अधिकारी आपले आहेत,असे या तालुक्यातील लोकांना वाटेल, असं काम करा,असा सल्ला आ.देशमुख यांनी दिला.आणि लोक मला आपलं का म्हणत नाहीत,याचे उत्तरही त्यांनीच दिले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केली मिरवणूक मार्गाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ एप्रिल-**

दि. १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असते. नमूद दिवशी बार्शी शहरामध्ये मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळातर्फे मोठी मिरवणूक होत असते. सदर मिरवणूकीचा आजरोजी मार्ग पाहण्यात आला. मिरवणूक मार्गावरील रस्त्यावरील असलेले खड्डे, खांबावरील तारा, रस्त्यावर अस्तावस्त वाळू तसेच झाडांच्या फांद्या यांची पाहणी करण्यात आली. सदरचे अडथळे दूर करण्यासाठी संबंधीत विभागाशी पत्रव्यवहार करीत आहोत. शासकीय विभागाचे अधिकारी सविस्तर चर्चा करुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव व मिरवणुकीत कुठेही, कसलीही अडचण येणार नाही याची दक्षता घेत आहोत.

पाहणी करताना पो.नि. बालाजी कुकडे, तहसीलदार एफ. आर. शेख, एमएसईबीचे अधिकारी तगारे, बार्शी नगरपरिषदचे उपमुख्याधिकारी विठ्ठल पाटोळे तसेच मध्यवर्ती जयंती कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

## महत्वाचे...



## पंढरपूर परिसरातील अवैध व्यवसायांवर पोलिसांची कारवाई

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील परिविक्षाधीन सहाय्यक पोलीस अधीक्षक श्रीमती अंजना कृष्णा यांनी पंढरपूर परिसरातील अवैध व्यवसायांवर कारवाई करीत लाखो रुपयांच्या मुद्देमाल जप्त केला. पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या हनुमंत भीमराव लिंगे समाधान ज्ञानेश्वर वाघमारे भीमराव नाना शेरक मुकुंद शंकर लोखंडे यांच्यावर पोलिसांनी छापा मारून कारवाई केली या चौघांकडे मिळून पोलिसांनी एक लाख आठ हजार ९४९ रुपयांचा अवैध देशी विदेशी दारूचा साठा मिळन आला त्यामुळे याबाबत पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंढरपूर तालुक्यातील चिंचोली भोसे येथील भीमा नदीच्या पात्रात ट्रॅक्टरच्या मदतीने अवैधपणे वाळू उपसा करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई करीत सुमारे ४० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला या कारवाईमध्ये नदीपात्रातून पाच ट्रॅक्टर ट्रॉली सह स्विफ्ट कार मोटार सायकल तसेच ६० ब्रास वाळू असा मुद्देमाल जप्त केला या प्रकरणी बालाजी लक्ष्मण पवार संजय पवार व त्यांच्या इतर साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा, पोलीस उपनिरीक्षक अनिल पाटील, वीरसेन पाटील, ज्योती बैनवाड, संजय राऊत, पोलीस हवालदार अमर सुरवसे, पांडुरंग ढवळे, राजकुमार ढोबळे, ईलाई मुलानी, रविंद्र बाबर, गणेश पाटील, हनुमंत हिरेमठ यांनी केली



## गादेगावचे सुपुत्र पंकज फाटे यांचा सत्कार

**पंढरपूर, दि. ९ एप्रिल-**

तालुक्यातील गादेगाव येथील पंकज अण्णासाहेब फाटे यांची आयबीपीएस मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये विविध पदांवर निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उद्योग व व्यापार सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संजय पवार, अण्णासाहेब फाटे, नितीन आसबे, डॉ. माणिक मस्के, डॉ. रमेश फाटे, निवृत्ती पाटील, विनय शिंदे, संग्राम कापसे, संतोष पुणेकर, वैजनाथ चवरे, सुमित बागल, सुरज फाटे, ऋषिकेश बागल उपस्थित होते.

## रानमसले येथील विकासकामांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथील विविध विकासकामे निकृष्ठ झाली असून त्याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी राजकुमार तगारे यांनी केला आहे. तगारे यांनी जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन दिला आहे. रानमसले येथील जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या कामात ठेकेदारांनी मोठ्या प्रमाणात अपहार केला आहे. शिवाय सदर काम अत्यंत निकृष्ट दजाचे केले आहे. योजनेच्या वर्क ऑर्डर प्रमाणे करण्यात आलेले नाही. सरपंच, उपसरपंच, ठेकेदार, ग्रामसेवक, यांनी संगनमताने हे काम करुन मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा केला आहे. तसेच योजना पूर्णतः कागदोपत्री रंगविण्याचे काम सरपंच व उपसरपंच यांनी केले आहे. तरी कामाची पाहणी करुन दोर्षीवर कारवाई करण्याची मागणी तगारे यांनी केली आहे.

## पिलीव येथील दोन्ही कावडयांचे शिखर शिंगणापूरकडे प्रस्थान

**पिलीव, दि. ९ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथून दोन कावडया शिंगणापूर यात्रेला पायी चालत नेण्याची फार वर्षांपासूनची परंपरा आजही कायम आहे. यामध्ये पिलीव गावची कावड व दुसरी झिंजेवस्ती, कुसमोडसह इतर गावातील एक कावड अश्या दोन कावडी दरवर्षी शिंगणापूरला जातात. खरेतर गुढीपाडव्यालाच या दोन्ही कावडया गावातील देवांना धार घालून शिंगणापूर यात्रेला जाण्यासाठी सज्ज होतात. नेहमी प्रमाणे मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास पिलीव येथील दोन्ही कावडयाचे पिलीव येथुन वाजत गाजत व फटाकयांची आतिषबाजी करीत शिंगणापूरकडे प्रस्थान झाले. या दोन्ही कावडयासाठी टप्पा पद्धतीने शिंगणापूरकडे युवक नेतात यामध्ये तरुणासह इतर नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होतात. दोन्ही कावडयांमध्ये कोण पहीली धार घालणार यासाठी मोठी चुरस व चढाओढ असते. दोन्ही कावडी शिंगणापूरला गेल्यानंतर त्याठिकाणी सर्वांची नाष्टा, जेवण याची सोय केली जाते. या ठिकाणी मुंगी घाटातून तेल्या भुत्याची कावड शिंगणापूरकडे नेताना पाहण्यास प्रचंड मोठी गर्दी होते.

# कॉरिडोरबाबत पंढरपूरकरांमध्ये संभ्रमावस्था

## जिल्हा प्रशासनाने कॉरिडोरची माहिती सर्वांना देणे आवश्यक

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.९ एप्रिल -**

गेल्या दोन-अडीच वर्षापासून गाजत असलेल्या पंढरपूर कॉरिडोर संदर्भात नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य करुन त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. मुख्यमंत्र्यांना कॉरिडोर बाबतचे प्रेझेंटेशन दाखविल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना कॉरिडोर संदर्भात आपण जिल्हा प्रशासनाला गो अहेड असे म्हटल्याचे सांगितले. मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाकडून कॉरिडोर प्रेझेंजेटन विषयी माहिती घेतली आहे मात्र आता ही माहिती पंढरपूरवासियांसाठी उपलब्ध व्हावी अशी मागणी पंढरपूरकरांकडून केली जात आहे. कारण पंढरपूरकरांमध्ये सध्या या विषयी कमालीची संभ्रमावस्था आहे.

पंढरपूरात वाराणसी, उज्जैनच्या धर्तीवर कॉरिडोर व्हावा ही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींची इच्छा आहे. या संदर्भात देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी मध्यंतरीच्या काळात सूतोवाच केले. पंढरपूर कॉरिडोर हा पंतप्रधान मोदींचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याची त्यांनी माहिती दिली होती. दरम्यान पंढरपूर कॉरिडोरचे घोंगडे गेल्या दोन, अडीच वर्षापासून भिजतच पडलेले होते. यावर जिल्हा प्रशासन, राज्य सरकारकडून कोणतेही सूतोवाच केले जात नव्हते.

### कॉरिडोर बाबतची माहिती सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करुन दिल्याचे फायदे

प्रकल्पाला निष्कारण विरोध होणार नाही. नागरिकांमध्ये गैरसमाजाचे वातावरण पसरणार नाही. नेमका कॉरिडोर काय आहे याची माहिती उपलब्ध झाल्यास बाधितांना पुढचे नियोजन करणे सोपे जाणार आहे. कॉरिडोर मध्ये ज्यांची दुकाने, घरजागा बाधित होणार आहेत त्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या मोबदल्याची माहिती उपलब्ध झाल्यास भविष्याचे त्यांचे नियोजन करणे सोपे होणार आहे. प्रकल्पांबाबत अफवांचे फुटणारे पेव्ह थांबण्यास मदतच होणार. बाधितांच्या हातात जास्तीचा कालावधी मिळाला तर ऐनवेळी होणारी त्यांची तारांबळ कमी होण्यास मदत होईल. शासनाला, जिल्हा प्रशासनाला देखील त्यांची बाजू मांडण्यास पुरेसा कालावधी मिळू शकेल. बाधितांच्या शंका, समाधानास पुरेसा वाव मिळु शकेल. विनाकारण न्यायालयीन गुंता वाढणार नाही. प्रकल्पाबाबत कोणीही अंधारात राहणार नाही. पंढरपूरकरांच्या विश्वासाला तडा जाणार नाही. जागेची घरेदी विक्री करणाऱ्या एजंटमंडळींकडून सर्वसामान्य पंढरपूरकर नागरिकांना नाहक वेठीस धरले जाणार नाही. लोकप्रतिनिधींना देखील नागरिकांची भूमिका शासनस्तरावर मांडण्यास पुरेसा वेळ मिळेल. त्यामुळे बाधित मंडळी आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील वातावरण देखील सौहार्दपुर्ण राहण्यास मदत होईल.

मध्यंतरीच्या काळात राज्याचे वरिष्ठ मंत्री गिरीष महाजन हे पंढरपूरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी येवून गेलेले होते. त्यावेळी त्यांनी पंढरपूर कॉरिडोरचे काम नक्की होणार असून लवकरच त्याची सुरुवात देखील होणार असल्याची माहिती दिली होती. त्यानंतर पालकमंत्रीपदावर वर्णी लागल्या नंतर आमदार जयकुमार गोरे हे पंढरपूरात आलेले होते. त्यावेळी त्यांनी देखील माध्यमांशी बोलताना पंढरपूरात कॉरिडोर होणार असून लवकरच पंढरपूरचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे सांगितले होते.

मात्र त्या नंतर शासकीय पातळीवर कोणत्याही हालचाली होत नव्हत्या. अखरे मागील काही दिवसात मुख्यमंत्र्यांचा अचानक पंढरपूर दौरा जाहीर झाला. या दौऱ्यात त्यांना जिल्हा प्रशासनाकडून पंढरपूर विकास आराखडा अर्थात कॉरिडोरचे प्रेझेंटेशन देण्यात येणार असल्याचे जाहीर झाले. त्या प्रमाणे मुख्यमंत्र्यांना प्रेझेंटेशन देखील देण्यात आले.

दुसरीकडे मुख्यमंत्र्यांनी प्रेझेंटेशन नंतर आपण जिल्हा प्रशासनाला गो अहेड असे म्हटल्याचे माहिती दिली. ऐवढेच नव्हे तर येत्या तीन महिन्याच्या काळात भुसंपादनाची प्रक्रिया पुर्ण करण्यात येणार आहे. आत्तापर्यंतचा सर्वोत्तम मोबदला या मध्ये बाधित होणाऱ्यांना दिला जाणार आहे अशी देखील माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलेली होती. मात्र त्या नंतर पुढे अजून तरी जिल्हा प्रशासनाकडून कॉरिडोर संदर्भात कोणत्याच हालचाली झाल्या नाहीत.

पंढरपूर कॉरिडोर कसा असणार आहे. कोणकोणत्या भागा मध्ये तो राबविला जाणार आहे. कॉरिडोर राबविताना त्याम ध्ये किती दुकानदार, घरमालक, मठ, धर्मशाळा, देवालये बाधित होणार आहे. मुख्य विठ्ठल मंदिरा पासून तो किती मीटर अतरापर्यंत राबविला जाणार आहे. कॉरिडोर मध्ये शहरातील कोणकोणती विकास कामे केली जाणार आहेत. कॉरिडोर राबविताना शहरातील गल्ली,बोळ तसेच अरुंद रस्ते याचा विकास होणार आहे का? हा विकास करताना तो कॉरिडोर अंतर्गत होणार की नगरपालिका रस्ता रुंदीकरणा मध्ये ही कामे घेतली जाणार या बाबत पंढरपूर नागरिक अनभिज्ञ आहेत.

नुकतीच कॉरिडोर मध्ये बाधित होणाऱ्या मंडळींनी येथील नामदेव मंदिरात एका बैठकीचे आयोजन केलेल होते. या मध्ये कॉरिडोरला विरोधाची भूमिका घेतली गेली. अजून कॉरिडोर काय आहे याची सविस्तर माहिती नसताना नागरिक घाबरुन कॉरिडोर विषयी भयभीत होऊ लागलेले आहेत. दुसरीकडे याचा फायदा पंढरपूरातील प्लॉट, घरांची खरेदी विक्री करणाऱ्या एजंट मंडळींकडून उचलला जाऊ लागला आहे. प्लॉटच्या किंमती मध्ये अवाच्या सवा वाढ करुन सर्वसामान्य नागरिकांची एक प्रकारे मोठी पिळवणूकच केली जाऊ लागली आहे.

त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी कॉरिडोर संदर्भात गो अहेड असे जिल्हा प्रशासनाला सांगितल्या नंतर ही जिल्हा प्रशासन कॉरिडोर बाबतची माहिती सर्वसामान्य पंढरपूरकरांपासून अजून का दूर ठेवत आहे असा देखील सवाल आता उपस्थित केला जाऊ लागला आहे. जर तीन महिन्यांमध्ये तुम्हला कॉरिडोर संदर्भातील भुसंपादन पुर्ण करुन घ्यावयाचे असेल तर नागरिकांना त्या संदर्भातील माहिती आता उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन नागरिकांना या विषयां बद्दल अजून किती काळ ताटकळत ठेवणार असे देखील पंढरपूरकर नागरिकांतून बोलले जात आहे.

## सोलापुरात गुंतवणूक परिषदेचे शुक्रवारी आयोजन

### जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली होणार कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ एप्रिल-**

येथे शासनाच्या '१०० दिवसांचा विशेष कार्यक्रम' अंतर्गत शुक्रवारी दि.११ एप्रिल रोजी सकाळी दहा ते चार या वेळेत जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळा होणार आहे.

येथील सात रस्ता परिसरातील हॉटेल सेंटर पॉईंट येथे होणाऱ्या या परिषदेत राज्यात उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीच्या संधी, राज्यातील उत्पादने यांची निर्यातवृध्दी तसेच औद्योगिक विकास, नजिकच्या कालावधीत नविन गुंतवणुक करणा-या उद्योजकांसोबत शासनामार्फत चर्चा करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील गुंतवणुदार आणि व्यवसायांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, राज्याची अर्थव्यवस्था बळकट करणेकरीता गुंतवणुक आकर्षित करणे, महाराष्ट्रामधील जिल्हयांच्या विकासाला चालना देणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा मुख्य उद्देश या परिषदेचा असणार आहे. परिषदेमध्ये उद्योग सहसंचालक, मैत्री कक्ष, न्यु इंडीया अश्युरन्स कंपनी आदी विभागाचे अधिकारी उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत. तसेच उद्योग विभागाशी संलग्न जिल्हास्तरीय विविध विभागाचे अधिकारीही उपस्थीत राहुन उद्योजकांना येणा-या अडचणीबाबत चर्चा करणार आहेत. सोलापुर जिल्हयातील गुतंवणुकीच्या विविध टप्पावर असलेले ११३ उद्योग घटकांची एकुण ३ हजार ३६ कोटींची गुंतवणुक प्रस्तावीत असुन सदर गुंतवणुकीमधुन सात ते साडेसात हजार रोजगारांची निर्मीती होणे अपेक्षीत आहे. सदर नविन गंतवणुक करणा-या उद्योग घटकांना शासनाच्या विविध विभागाकडुन देण्यात येणारे परवाने हे सुलभ रीतीने व विहीत कालावधीत मिळण्याकरीता मैत्री कक्षाकडुन विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. सदर कार्यशाळेस नवउद्योजक, निर्यातदार उद्योजक, शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक यांनी उपस्थीत रहावे असे अवाहन महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र सोलापुर यांनी केले आहे.

## बार्शी न्यायालयात आरोग्य दिन साजरा

### ५२ जणांचे रक्तदान; आरोग्य तपासणी शिबिराचा ३०६ नागरिकांनी घेतला लाभ



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार तालुका विधी सेवा समिती, बार्शी व वकील संघ, लायन्स क्लब व लिओ क्लब बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी न्यायालयात जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने भव्य रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश-१ विक्रमादित्य के. मांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा न्यायाधीश-२ एल. एस. चव्हाण, दिवाणी न्यायालय व स्तराचे ए. पी. खानोरकर, सह दिवाणी न्यायाधीश आर. एम. कंटे, एस. बी. विजयकर, पी. व्ही. राऊत, जी. एस. पाटील, एच. यु. यु. पाटील व आर. पी. बागडे उपस्थित होते. दिवाणी न्यायाधीश आर. पी. बागडे यांनी स्वतः रक्तदान करुन समाजाप्रती आपली सामाजिक बांधिलकी दाखवून दिली. शिबिरात ५२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. ग्रामीण रुग्णालय, बार्शी यांच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर देखील घेण्यात आले. या शिबिराचा लाभ ३०६ नागरिकांनी घेतला. सूत्रसंचालन ॲड. संजय कोकाटे यांनी तर आभार ॲड. विकास जाधव यांनी केले. याप्रसंगी बार्शी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रणजित गुंड, उपाध्यक्ष व इतर पदाधिकारी, लायन्स क्लब व लिओ क्लब बार्शीचे सदस्य उपस्थित होते.

## पंढरपूरातील मेहतर समाजाच्या महिलेला लागली तब्बल २१ लाखांची लॉटरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ एप्रिल -**

घरात अठरा विश्वे दारिद्र्य असलेल्या पंढरपुरातील एका महिलेला तब्बल २१ लाखांची लॉटरी लागली आहे. मनिषा वाघेला असे या कष्टकरी महिलेचे नाव आहे.

घरात अठरा विश्व दारिद्र्य असलेल्या पंढरपुरातील एका महिलेला लाखांची लॉटरी लागल्याची घटना समोर आली आहे. संबंधित महिलेला लॉटरी लागताच महिलेसह तिच्या कुटुंबीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. ही महिला मेहतर समाजातील आहे. पिढ्यानपिढ्या गरिबी अनुभवलेल्या मेहतर समाजातील महिलेला लॉटरी लागल्याने तिला साक्षात विठुरायाच पावल्याची चर्चा महिला रहात असलेल्या ठिकाणी ऐकावयास मिळत आहे. मनिषा वाघेला असं या महिलेचं नाव असून तिला २१ लाखांची लॉटरी लागली आहे. लॉटरी लागल्यानंतर आता मनिषा वाघेला सहकुटुंब वृंदावन येथे जाऊन प्रेमानंद महाराजांची देखील भेट घेऊन त्यांचा आर्शिर्वाद घेणार आहेत. एका गरीब महिलेला अशाप्रकारे लॉटरी लागल्याने अनेकांना आनंद झाला आहे.



खरं तर, मेहतर समाज हा शेकडो वर्षांपासून मैला उचलण्याचं काम करतो. सुप्रीम कोर्टाने १९९३ साली याला कायद्यानुसार गुन्हा ठरवलं, तरीदेखील या समाजाकडून हे काम करुन घेतलं जातं होतं. मात्र केंद्र व राज्य सरकारने पावले उचलली आणि मेहतर समाजाची या कामातून सुटका झाली.याच मेहतर समाजातील महिलेला अचानक २१ लाखांची लॉटरी लागली आणि साक्षात विठुरायाच पावल्याची भावना मनिषा वाघेला आणि त्यांच्या कुटुंबियांची झाली आहे. यामुळे कुटुंबीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. मनिषा वाघेला या घरकाम करतात. त्यांनी पंढरपुरातील गोपाळ कृष्ण मंदिराजवळील शोभा लॉटरी सेंटरमधून लॉटरी तिकीट खरेदी केलं होतं. त्यावर चक्क २१ लाख रुपयांची लॉटरी लागली आहे. रामनवमी उत्सव मिरवणूक सुरू असतानाच त्यांनी तिकीट लॉटरी सेंटरचालकास दाखविले आणि त्यांनी एक नाही,दोन नाही तर तब्बल २१ लाखांच्या बक्षीसांचे मानकरी झाल्याचे वाघेला दाम्प्त्याला सांगितले. काही वेळ लॉटरी सेंटर चालकाने सांगितलेल्या या बातमीवर या दाम्पत्यांचा विश्वास देखील बसेनासा झाला. मात्र अखेर त्यांना ही गोष्ट पटली लॉटरीसेंटर चालकाने त्यांच्या तिकीटाचा क्रमांक आणि आपल्याकडील लॉटरी निकालाचे पत्रक त्यांना दाखविले. त्या नंतर मात्र त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. लगेचच मोबाईलवर आपल्या घरी त्यांनी ही बातमी सांगुन आनंद व्यक्त केला. लॉटरी चालकाने देखील हिंदू महासभेचे पदाधिकारी अभय कुलकर्णी (इचगावकर ) यांच्या वाघेला दाम्पंत्याचा हार घालून, पेढे देवून सत्कार केला.

## जय भारत माता सेवा समितीतर्फे होणार मध्यप्रदेशातील महू येथे भीम जयंती सोहळा

### ११ एप्रिलला निघणार आळंद ते महू रॅली

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. ९ एप्रिल**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त जय भारत माता सेवा समितीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री हवा मल्लिनाथ महाराज यांच्या सानिध्यात कर्नाटकातील आळंद तालुक्यातून ११ एप्रिल रोजी रॅलीद्वारे अक्कलकोट-सोलापूरमार्गे १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मस्थळ असलेल्या मध्यप्रदेशातील महू येथे भीम जयंती सोहळा आयोजित केल्याची माहिती जय भारत माता सेवा समितीचे राष्ट्रीय सदस्य सिद्धार्थ तलवारे यांनी दिली. डॉ. आंबेडकर जयंती महोत्सवा निमित्त जय भारत माता मंदिर लाड चिंचोली तांडा (ता.आळंद) येथून रॅली काढण्यात येणार आहे. ही रॅली चेकपोस्ट आळंद, अक्कलकोट, सोलापूर, भिगवण, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे आदी जिल्ह्यांचा प्रवास करुन मध्यप्रदेशातील महू येथे पोहचणार आहे. १४ एप्रिल रोजी महू येथील चौपडा वाटिका येथे जयंती सोहळा होणार आहे.समितीच्यावतीने अनेक वर्षांपासून डॉ. आंबेडकर यांची जयंती महोत्सव आयोजित करण्यात येत असून सन २०२१ मध्ये बेंगलुरू, सन २०२२ मध्ये नवी दिल्ली, सन २०२४ मध्ये नांदेड जिल्ह्यातील लोहा येथील मारतळा येथे तर यंदा डॉ. आंबेडकर यांचे जन्मस्थळी मध्यप्रदेशातील महू येथे भीम जयंती सोहळा साजरा करण्यात येणार आहे. जयंतीनिमित्त विविध देशभक्ती कार्यक्रमाचे आयोजन केले असून बाबासाहेबांच्या विचारा वरती मान्यवराचे व्याख्यान आयोजित केले आहे. या भव्य दिव्य कार्यक्रमाचा सर्वांनी आस्वाद घ्यावा.या सोहळ्यात श्री हवा मल्लिनाथ महाराज सेवाभावी संस्था बिलोली यांच्या वतीने नामांकित व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. महू येथील जयंती सोहळ्यासाठी जय्यत तयारी सुरू असून ज्यांना महाराष्ट्रातून निघणार्या रॅलीत सहभागी व्हायचे असल्यास त्यांनी सिद्धार्थ तलवारे यांचा ९९२३१६९६१७ या मोबाईल वर संपर्क करावा



श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांना आमच्याही कोटी-कोटी शुभेच्छा..!
※ शुभेच्छुक ※
त्रिंबक दिक्षीत
द्वारका अलंकार
सोन्या-चांदीचे दागिने योग्य दरात मिळतील व ऑर्डरप्रमाणे तयार करुन मिळेल.
मो.9960540545
मेन रोड, पाण्याच्या टाकीजवळ, तामलवाडी




KSR
SYMBOL OF TRUST
किसान इरिगेशन्स आणि इन्फ्रास्ट्रक्चर लि.मुंबई
आमचे असंख्य ग्राहक, विक्रेते, वितरक, कंत्राटदार, कर्मचारी आणि हितचिंतक यांना श्री विष्णू महादेव यात्रा सोहळ्यानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!




श्री विष्णू-महादेव यात्रेस येणाऱ्या तमाम भाविकांना हार्दिक शुभेच्छा..
स्वराज
दोघांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
संतोष
शुभेच्छुक
पवार, घाटोळे, भोसले, घोटकर, नवगिरे, केत, केसरे, शिंदे व अप्पूराजे मित्र परिवार, राजमुद्रा प्रतिष्ठान, शिवरत्न प्रतिष्ठान, तामलवाडी




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांचे
हार्दिक स्वागत
※ शुभेच्छुक ※
रुद्रम गायकवाड




महाराष्ट्र स्वराज्य पक्ष
श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या भाविकांचे
हार्दिक स्वागत
मा.श्री.अप्पूराजे गवळी-भोसले
तालुकाध्यक्ष : स्वराज्य पक्ष, तुळजापूर




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांना आमच्याही
कोटी-कोटी
शुभेच्छा
PPP KISAN PARIWAR
PP Patel & Co.
METAL
POWDER
DIVISION
Regd.Office : 477, Sakhar Peth, Solapur - 413 005
Ph.: 91-217-624954/ 627663 Fax - 91-217-624949
Plant : Gat No. 363, Tamalwadi, Dist. Osmanabad.
Email . ppatel@vsnl.com




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांना आमच्याही
आभाळभर
शुभेच्छा..!
सरपंच
ग्रामसेवक
उपसरपंच
ग्रा.पं.सदस्य
ग्रा.पं.सदस्य
मा.श्री.यशवंतआण्णा लोंढे
मा.सौ. नुरबानो सि.बेगडे
मा.श्री. चैतन्य गोरे
मा.श्री. सुधीर पाटील
मा.श्री. हमीद पठाण
मा.श्री. सचिन राऊत
लिपीक
मा.श्री. सतीश माळी
मा.सौ. मंगलताई गवळी
मा.सौ.शीतल गायकवाड
मा.सौ.अनिता पाटील
मा.सौ. सुरेखा सं.माळी
मा.श्री.श्रीकांत गायकवाड
मा.शशिकांत गायकवाड
संगणक परिचालक
मा.दस्तगीर पटेल
शिपाई
मा.शिवाजी माळी
शिपाई
मा.रहिमान जमादार
घंटागाडी चालक
मा.अभिमन्यू रणसुरे
सफाई कामगार
ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामस्थ, तामलवाडी




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांना मनस्वी
शुभेच्छा
※ शुभेच्छुक ※
साईराम कृषी सेवा केंद्र
साईराम ट्रेडर्स, तामलवाडी, ता.तुळजापूर



श्री हरिहर नगरीतील यात्रा
सोहळ्यास येणाऱ्या
तमाम भाविकांचे
हार्दिक स्वागत
मा.श्री.विठ्ठल घोटकर
मा.श्री.नागेश घोटकर
मा.श्री.कृष्णा घोटकर
मा.श्री.विकास घोटकर
* सौजन्य *
तमाम घोटकर परिवार,
तामलवाडी, ता.तुळजापूर








श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास
येणाऱ्या तमाम भाविकांचे हार्दिक स्वागत...
रवी
इलेक्ट्रिकल
ॲन्ड हार्डवेअर
तामलवाडी, ता.तुळजापूर
प्रो.प्रा.विश्वनाथ कानडे




श्री विष्णू महादेव नगरीतील यात्रा सोहळ्यास
येणाऱ्या सर्व भाविकांना मनःपूर्वक
शुभेच्छा
* शुभेच्छुक *
मोरया स्टोन क्रशर
तामलवाडी, ता.तुळजापूर
प्रो.प्रा.अविनाश शिंदे, मो. 9881155845





श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास
येणाऱ्या तमाम भाविकांचे हार्दिक स्वागत
* स्त्रीयांचे सर्व आजार
* गर्भीणी विषयी मार्गदर्शन
* गर्भसंस्कार व मार्गदर्शन
* मुळव्याध व मुतखड्यावर
योग्य तो आयुर्वेदिक उपचार
* स्थौल्य * दमा * त्वचा रोग
* संधिवात व आमवात * मधुमेह
* रक्त, लघवी व थुंकी तपासणी
* हृदय रोगाविषयी मार्गदर्शन व सल्ला
* लहान बाळावर योग्य तो उपचार
शंभु महादेव
क्लिनीक
डॉ.समाधान अंकुश अंबुरे
B.A.M.S. PGDEMS (PUNE)
Reg.No.I-102242 A1





श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास
येणाऱ्या तमाम भाविकांचे हार्दिक स्वागत...
श्री त्रिंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट, तामलवाडी
शिवाजी नाना पाटील – अध्यक्ष
दत्तात्रय नागनाथ गवळी भोसले – उपाध्यक्ष
सुधाकर अर्जुन लोंढे – सचिव
विनायक भास्कर पाटील – विश्वस्त
तुकाराम किसन गायकवाड – विश्वस्त
तुकाराम धोंडिराम सुरवसे – विश्वस्त
सुदर्शन शिवदास पाटील – विश्वस्त
कृष्णा मारुती घोटकर – विश्वस्त
अनिल रावसाहेब पाटील – विश्वस्त
ज्ञानेश्वर बाळासाहेब जगताप – विश्वस्त
नागनाथ मल्लिकार्जुन मसुते – विश्वस्त
सुधीर अरुण पाटील – विश्वस्त
सचिन मारुती राऊत – विश्वस्त




श्री विष्णू-महादेव यात्रेस
येणाऱ्या तमाम भाविकांचे
हार्दिक
स्वागत
मा. संतोष (दादा) बोबडे
तालुका अध्यक्ष, भाजपा, तुळजापूर
सनराईज इंग्लिश मिडियम स्कूल,
तामलवाडी, ता.तुळजापूर

श्री हरिहर नगरीतील यात्रा
सोहळ्यास येणाऱ्या भाविकांचे
हार्दिक स्वागत
जिजाई माऊली
भारत गॅस ग्रामीण वितरक
प्रो.प्रा.विकास कांबळे मो.८००७२००२७२
तामलवाडी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव फोन ०२४७२-२६५०४४

श्री हरिहर नगरीतील यात्रा
सोहळ्यास येणाऱ्या भाविकांचे
हार्दिक स्वागत
आमच्याकडे सर्व प्रकारचे सोन्या चांदीचे दागिने मिळतील.
महामुनी ज्वेलर्स
सोने-चांदीचे व्यापारी
प्रो.प्रा.हणमंत महामुनी




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास
येणाऱ्या तमाम भाविकांना मनस्वी
शुभेच्छा
* शुभेच्छुक
बाळासाहेब दत्तात्रय जगताप
सामाजिक कार्यकर्ते
प्रोप्रा. ज्ञानेश्वर बाळासाहेब जगताप
महेशकुमार बाळासाहेब जगताप
हर्ष एंटरप्राईजेस, तामलवाडी



श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांचे
हार्दिक स्वागत..!
शुभेच्छुक
त्र्यंबकेश्वर बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,
सरस्वती विद्यालय, तामलवाडी
अध्यक्ष श्री.मसुते बसवणाप्पा चंद्रकांत
उपाध्यक्ष श्री.पाटील ज्ञानेश्वर गणपतराव
सचिव श्री.लोंढे यशवंत (आण्णा) बलभिम
मुख्याध्यापक श्री.वडणे सुहास दादाराव
सर्व संचालक मंडळ, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, तामलवाडी




Vikrant Plastic Industries
Mfg. PVC pipe & Granules
श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास
येणाऱ्या तमाम भाविकांना मनस्वी शुभेच्छा..!
विलास पंतगे : ९४२२४५७५०२
विक्रांत पंतगे : ९५११८४४२०८
संजय पंतगे : ९४२२०६६७०८
अक्षय पंतगे : ९८८१२१३१९८
फॅक्ट : जी.२१९ प्लॉट नं.९, तामलवाडी ४१३६२३, जि.धाराशिव
ऑफिस : ९७/९८, अह्ले नगर, वसंत विहारच्या बाजूला, सोलापूर




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास
येणाऱ्या तमाम भाविकांना मनस्वी
शुभेच्छा
शुभेच्छुक
पोलिस स्टेशन, तामलवाडी
ता.तुळजापूर




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या भाविकांचे
हार्दिक स्वागत..!
शेतकऱ्यांच्या उज्वल भविष्यासाठी एकमेव पर्याय
महानंदी
ठिबक व पाईप कंपनी
स्प्रिंकलर पाईप
रेन पाईप
ड्रीप पाईप
पी. व्ही.सी. पाईप
फिटींग्ज
महानंदी
:Siddu Saheb-9822229197




श्री हरिहर नगरीतील यात्रा
सोहळ्यास येणाऱ्या भाविकांचे
हार्दिक स्वागत
अध्यक्ष
उपाध्यक्ष
मा. शाहीर गायकवाड
मा. इंद्रजीत घोटकर
माजी सरपंच/सचिव
सहसचिव
उपसरपंच/सदस्य
मा. ज्ञानेश्वर माळी
मा. सुधाकर लोंढे
मा. सुधीर पाटील
व सर्व कमिटी सदस्य
श्री विष्णु-महादेव यात्रा कमिटी
तामलवाडी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव




श्री हरिहर नगरीतील
यात्रा सोहळ्यास
येणाऱ्या तमाम
भाविकांचे
हार्दिक
स्वागत
मा.श्री. अनिल तेलंग
सामाजिक कार्यकर्ते, तामलवाडी, ता.तुळजापूर




श्री हरिहर नगरीतील यात्रा
सोहळ्यास येणाऱ्या भाविकांचे
हार्दिक स्वागत
शिवभक्त
समर्थ (भैय्या) घोटकर
सौजन्य
हॉटेल समर्थ तामलवाडी




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास
येणाऱ्या तमाम भाविकांचे हार्दिक स्वागत
शुभेच्छुक
मा.श्री.अलिम पठाणसाहेब
तामलवाडीकर, ता.तुळजापूर




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास
येणाऱ्या तमाम भाविकांना आमच्याही
कोटी-कोटी शुभेच्छा
सचिव
भाजपा युवा नेते
चेअरमन
मा.सुधाकर लोंढे
मा.यशवंत (अण्णा) लोंढे
मा.दादाराव पवार
तामलवाडी वि.वि. कार्य.सेवा.सह.सोसायटी
तामलवाडी, ता.तुळजापूर




बालभक्त
शिवभक्त
कोमल राऊत
बालभक्त
श्री हरिहर नगरीतील यात्रा
सोहळ्यास येणाऱ्या भाविकांचे
हार्दिक स्वागत
प्रथमेश संभाजी माळी
शिवम राऊत
कोमल कलेक्शन
प्रो.प्रा.विठ्ठल बब्रुवान राऊत
तामलवाडी, ता.तुळजापूर
पुनम व्हेजीटेबल अँन्ड फ्रूट सेंटर
प्रो.प्रा.संभाजी बलभिम माळी
तामलवाडी, ता.तुळजापूर



# देहूकर कुटुंबाचे गावासाठी मोठे योगदान!



गतवर्षी तामलवाडी येथे सुवर्णमहोत्सवी सप्ताह साजरा झाला. येथील गावकऱ्यांनी या सोहळ्यासाठी भरभरून वर्गणी दिली होती. लाखो रुपये गोळा झाले आणि रोजच गावजेवण झालं. राज्यातील अनेक नामवंत कीर्तनकारांनी समाजप्रबोधन तर केलेच आणि गावच्या सप्ताह सोहळ्याच्या नियोजनाचेही भरभरून कौतुक केले. यंदा ५१ वा सप्ताह सोहळाही उत्साहात पार पडला. आता सर्वांना वेध लागले ते यात्रा-सोहळ्याचे. यात्रेच्या पहिल्या दिवशी कावड मिरवणूक उत्साहात पार पडली आणि दुसऱ्या दिवशी शेरण्याचा कार्यक्रमही दिमाखदारच होणार आहे. दरम्यान, या गावाच्या जडणघडणीत संत तुकाराम महाराजांचे वंशज असलेल्या पंढरीतील देहूकर कुटुंबाचे मोठे योगदान आहे.

आपल्या राज्यात निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम यांनी बहुमोल संत साहित्य निर्माण करून जनसामान्यांपर्यंत अध्यात्माचे विचार नेले आणि सामान्य जनतेला अध्यात्माची गोडी लावण्याचे एक महान ऐतिहासिक कार्य केले. तामलवाडीपासून मराठवाड्यात निजामशाहीच होती. यामुळे तामलवाडीतील भजन-कीर्तनाची सोय स्व. शामरावअण्णा गायकवाड यांच्याच वाड्यात होती. स्वातंत्र्यानंतर तामलवाडी पंचक्रोषीचे गुरूवर्य स्व. श्रीगुरू सोपानकाका महाराज देहूकर यांनी या गावच्या लोकांना अध्यात्माची ओढ लावली. यानंतर भजन-कीर्तन श्री विष्णू-महादेव मंदिरात होवू लागले. स्व. सोपानकाकांनी भजन, कीर्तनाचे धडे या गावकऱ्यांना दिले. त्यावेळी १०-२० वारकरी होते. यामध्ये तत्कालीन सरपंच स्व. सदाशिवराव पाटील, स्व. तुकाराम पाटील, स्व. गणपतराव शामराव गायकवाड, स्व. चंद्रहार पाटील, स्व. सोपान राऊत, स्व. सुर्यभान राऊत, स्व. शिवराम लोंढे, स्व. विठ्ठल गायकवाड, स्व. गोविंद माळी, स्व. हरिदास माळी, स्व. रामचंद्र कुलकर्णी, स्व. दगडू घोटकर, स्व. हरिदास माळी, स्व. धोंडिबा गायकवाड, स्व. जनार्धन गवळी, स्व. बंडोबा लोंढे आदी अनेक मंडळी होती.



**व्यक्ती विशेष**

**अविनाश गायकवाड**

श्रीगुरू सोपानकाकांचे वैकुंठगमन झाल्यानंतर त्यांची फड परंपरा श्रीगुरू वै. माऊली महाराज देहूकर, श्रीगुरू बापूसाहेब महाराज देहूकर, श्रीगुरू बाळासाहेब महाराज देहूकर यांच्याकडे आली. या तिघांनी या भागात वारकरी सांप्रदायाची चांगलीच मुहुर्तमेढ रोवली. श्रीगुरू देहूकर सांप्रदायिक मंडळाची स्थापना केली. यामध्ये स्व. गणपतराव पाटील, स्व. सुरेश घोटकर, स्व. हरिभाऊ राऊत, स्व. अरूण गायकवाड, स्व. विश्वनाथ नेटके, स्व. गजेंद्र लोंढे, गंगाधर घोटकर, माजी सरपंच दत्तात्रय वडणे, भास्कर पाटील, अर्जुन लोंढे, भाऊसाहेब पाटील, प्रभाकर गायकवाड, नागनाथ पाटील, बाळासाहेब सोपान गायकवाड, शिवाजी पाटील, बलभिम गायकवाड, रामहरी माळी यांनी सहभाग घेतला. सध्या देहूकरांची ३ री पिढी श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर आता चालवित असून, ते तर तामलवाडी पंचक्रोषीसह अवघ्या मराठवाड्यात वारकरी सांप्रदाय वाढविण्यात मोलाची भर टाकत आहेत. त्यांच्या कीर्तन सोहळ्यात दुसऱ्या पिढीतील टाळकरी आणि आता तिसऱ्या पिढीतील या गावचे केशव गुरव, विनायक पाटील, संतोष जगताप, नामदेव पाटील, रामदास गायकवाड, सुनील राऊत, धनाजी घोटकर आदींसह शेकडो टाळकरी आणि हजारो श्रोते मंडळी रमून जातात. या गावात संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशताब्दी समाधी संजीवन सोहळा आणि संत तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वैकुंठगमन सोहळाही वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम, दररोज हरिकीर्तन, हरिपाठ, भजन आदींनी पार पडला. याच कालावधीत श्री विष्णू महादेव मंदिर शिखर जीर्णोद्वार होवून कळसारोहन समारंभ पार पडला आणि सध्या श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर शिखर जीर्णोद्वार झाला असून, याचाही लवकरच कळसारोहण समारंभ पार पडणार आहे. यासाठी यात्रा कमिटीचे पदाधिकारी, सदस्य प्रयत्न करीत आहेत. देहूकरांच्या या तीन पिढ्यांचे तामलवाडी पंचक्रोषीसाठी फार मोठे योगदान आहे. सध्याही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही महाराष्ट्राची संस्कृती आणि अस्मिता या थोर साधुसंतांमुळेच शाबूत राहिली. म्हणून या लाडक्या संतांचे समग्र वाड.मय म्हणजे महाराष्ट्राच्या समाजजीवनाचा एक अमूल्य असा सांस्कृतिक ठेवा आहे. या संतांच्या मालिकेत श्री संत तुकाराम महाराजांचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांनी सोप्या नामभक्तीचा महिमा पटवून आपल्या अभंगांद्वारे सुविचार व सदाचाराचा प्रसार केला व समाजात भक्तिमार्गाच्या द्वारा नवचैतन्य निर्माण केले आणि आपल्याबरोबरच साऱ्या समाजाला सन्मार्गाला लावले. त्यांच्या या बहुमोल वाड.मयाचा ठेवा म्हणजेच श्री तुकाराम महाराजांच्या अभंगांची गाथा पुनर्मुद्रित करून महाराष्ट्र शासनातर्फे काही वर्षांपूर्वी प्रकाशित झाली आहे. त्यांनी हे थोर संतसाहित्य निर्माण केल्याने खालील संतोक्तीचा आठव होतोच....जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती। देह कष्टविती परोपकारे।।

# संत अवताराचे प्रयोजन!

संत अवतार घेऊन प्रत्येक मानवी जीवाचं कल्याण व्हावे, हित व्हावे यासाठी खूपच प्रयत्न करतात. अवतार तुम्हा धरा या कारण । उद्धराया जन जड जीवा ।।

या संत उक्ती प्रमाणे जड जीवांचा, दोषी जीवांचा, अज्ञानी जीवांचा उद्धार करण्यासाठी संत पृथ्वीवर येतात. स्व:विचार न करता जगाचा- जी- वाचा विचार जास्त करतात. संत हे समाज सुधारणेचा ध्यास घेऊन कार्य करणेसाठी अवताराला आलेले असल्यामुळे प्रत्येकाच्या मनाला संस्कारी बनवत जीवनाला आवश्यक ते सर्व प्रबोधन केले आहे . मानवी देह निरोगी राहण्यासाठी पर्यावरण खूपच महत्वाचे आहे हे जाणून पर्यावरणाचा अभ्यासपूर्वक विचारही मांडला आहे .

नगरेची रचावी । जलाशये निर्मावी । महा वने लावावी । नाना विधे।। या ओवीतून संत ज्ञानेश्वर महाराजांनी पर्यावरण प्रेम विस्ताराने व्यक्त केले आहे. प्रत्येक व्यक्तीला निवारा आवश्यक आहे. त्यासाठी घर बांधले जाते. परंतु ते घर सुंदर अशा शहरामध्ये असावे म्हणून महानगर - नगर तयार करणे गरजेचे आहे. तो विचार, ती रचना नियोजन युक्त असावी असे या ओवीतून माऊलीनी सांगितले आहे. या सर्वांचेसाठी पाणी खूपच गरजेचे असलेने जलाशय म्हणजे धरण निर्माण करावे अशी त्यांच्याकडे दूरदृष्टी दिसून येते. ते जलाशय स्वच्छ रह- ावे यासाठी श्रीकृष्ण भगवतांनी यमुनानदी प्रदूषण मुक्त करणेसाठी नदीमध्ये कालिया सर्प असल्याने स्वतः यमुना नदीमध्ये उडी घेऊन नदी कालिया मुक्त केली. कारण ते पाणी दुषित होत होते. त्यासाठी पाणी प्रदूषण मुक्त केले. पाण्याची मानवाला, सर्व प्राणी मात्राला व वृक्ष लागवडीला असलेली आवश्यकता विचारात घेऊन जालशय उभारणी सांगितली आहे. शिवाय ते पाणी प्रदूषण मुक्त असावे. घाण व केमिकल युक्त पाणी वृक्ष वाढीसाठी उपयुक्त ठरत नाही तर मानवी देहाला कसे उपयुक्त ठरेलं. तसेच या सर्व जीव सृष्टीसाठी वृक्ष लागवड करून वने उभी करावीत. महावन उभे करावे. ते केल्यामुळे पर्यावरण संतुलित राहते. निसर्ग हा सुद्धा आनंद प्राप्त करणेसाठी महत्वाचा आहे; हा विचार करून वन उभे करण्यासाठी जागृती केली. वृक्षतोड करू नये. कारण त्याचा परिणाम प्रदूषण वाढीवर होतो म्हणून

वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे ।

असा उपदेश करून प्राणी मात्रा सहित वृक्ष वेली यांना सोयरे म्हणजे स्नेही बनवा. त्यांचेवर प्रेम करा. त्यांना सांभाळून रक्षण करा. जीवन जगण्यासाठी ज्या-ज्या गोष्टी आवश्यक आहेत. त्या सर्वांचा विचार मांडून जागृती करताना पर्यावरण प्रेमही व्यक्त केले आहे. संतांनी व्यापक विचार स्वीकारून कार्य केले आहे. आपणही प्रत्येक व्यक्तीने पर्यावरण संतुलित ठेवण्यासाठी प्रयत्न करताना प्रदूषण मुक्त पर्यावरण व्हावे म्हणून प्रामाणिक प्रयत्न करावे व त्या संबंधी जागृतीही करावी कारण ते आपले आद्य कर्तव्य आहे. स्वहित प्राप्त करताना राष्ट्रहितही पाहिले पाहिजे, असा ही संदेश दिला आहे. देव- देश आणि धर्म या विषयी प्रत्येकाला सजग राहणं गरजेचे आहे. सध्या पर्यावरण वाचविण्यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न होताना दिसून येत आहे. शासनाचा पर्यावरण विभागच नाहीतर इतर विभागही यावर काम करताहेत; इतकेच काय तर आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हेही पर्यावरण वृध्दीचे कायम संदेश देतात. यामुळे देशातील प्रत्येक नागरिकांनी पर्यावरण वाचविण्यासाठी कायम प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे.



**पर्यावरण विशेष**

**हभप सुधाकर महाराज इंगळे**




# तामलवाडी : समृद्ध विकासाची दिशा!

मराठवाड्याच्या दक्षिणेकडील तामलवाडी हे शेवटचे गांव, सुमारे दहा हजार लोकसंख्या आणि आठशेच्या जवळपास कुटुंब असलेले गाव. शिवार तसं कोरडवाहूच; शेतीसाठी शाश्वत पाण्याचा स्त्रोत नाही, अलिकडच्या काळात झालेल्या तलावांचाच शेतीला थोडा आधार मिळालेला.

पारंपारिक समृद्ध गावगाड्यांमध्ये १९५० साली स्व. निंगप्पा मसुते यांनी या परिसरात पाण्यावर चालणारी पहिली पिठाची गिरणी चालू केली. तेव्हा आजूबाजूच्या पंचक्रोशीतून बैलगाड्यातून दळणासाठी लोक येथे यायचे. हा तामलवाडीतील पहिला यांत्रिकी व्यवसाय होता. त्यानंतर जवळपास १९ वर्षांनी १९७० साली गावात वीज आली. यानंतर कै. चंद्रकांत मसुते व त्यांच्या सहकारी मित्रांकडून कुक्कुटपालन, दूध डेअरी अशा सहकारी संस्था सुरु झाल्या, या संस्था अनेक वर्ष समर्थपणे चालल्याही. परंतु पुढील काळाच्या ओघात त्या बंदही झाल्या. पुढे १९८० च्या दशकात कटारे स्पिनिंग मिल चालू झाली आणि गावचे औद्योगिकरण विस्तारायला सुरुवात झाली. तीन पाळीत १८०० कामगार काम करू लागले. यामुळे तामलवाडीसह पंचक्रोशीतील लोकांना रोजगार मिळाला. विविध ठिकाणाहून अनेक कामगार तामलवाडीत राहायला आले. गाव विस्तारले. यानंतर भारती सिमेंट, विमल पेपर मिल अशा छोट्या उद्योगांची सुरुवात होतांना गावाला एक वेगळी ओळख मिळत होती. तेव्हा गावात पुढील शिक्षणाची सोय व्हावी यासाठी कै. चंद्रकांत मसुते यांच्या संकल्पनेतून कै. वसंतराव पाटील,कै. गणपतराव पाटील, कै. वजीर शेख, कै. हसन पटेल, कै. बलभीम लोंढे या सहकार्यांना सोबत घेवून त्रिंबकेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, तामलवाडी या नावाने शिक्षण संस्था स्थापना केली व सरस्वती माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय सुरू केले. १९९० मध्ये गावात बालाजी अमाईन्सची उभारणी झाली आणि या ठिकाणी इतरही लहानमोठे कारखाने निर्माण होवून एक प्रकारची लहान औद्योगिक वसाहतच निर्माण झाली. बालाजी अमाईन्समुळे गावाची आर्थिक उन्नती होत गेली आणि युवकांच्या हातालाही गावातच रोजगार मिळाला. या कंपनीमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर तामलवाडीचे नाव पोहोचले. बालाजी फाऊंडेशच्या माध्यमातून गाव परिसरात मोठ मोठी सामाजिक, शैक्षणिक, वृक्षारोपन, धार्मिक आणि इतरही विविध स्तरावरील कामे उभारली गेली.

आज तामलवाडी हे गाव सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, औद्योगिक, व्यावसायिक, आरोग्यदृष्ट्या सोयीसुविधा, शेती अशा सर्व बाबतीत पुढारलेलं अन् जागृत गाव असल्याचे दिसून येते. गावाला मोठी अध्यात्मिक परंपरा आहे; दरवर्षी चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे पाडव्यापासून सात दिवसाचा दिमाखदार अखंड हरिनाम सप्ताह साजरा होतो. संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे विद्यमान वंशज गुरूवर्य बापूसाहेब महाराज यांचा आशिर्वाद व मार्गदर्शनाखाली आणि गुरुवर्य श्री कान्होबा महाराज देहकर यांच्या संनियंत्रणाखाली दरवर्षी हा भक्ती सोहळा उत्साहात पार पडतो. त्यानंतर द्वादशीपासून ग्रामदैवत श्री विष्णू- महादेवाची यात्रा मोठ्या आनंदात, उत्साहात साजरी केली जाते.



**उद्योग विषयक**

**महादेव मसुते (शिक्षक)**

आज गाव एक औद्योगिक, व्यावसायिक वाढ होणारे केंद्र म्हणून उदयास येत आहे; अजूनही मोठेमोठे उद्योग उभारले जात आहेत. व्यावसायिक विस्तार मोठ्या प्रमाणात होत आहे. अनेक प्रकारच्या वैद्यकीय सोयीसुविधा उपलब्ध होत आहेत. या पंचक्रोशीतील मोठे शैक्षणिक वाढीचे केंद्र म्हणून गाव नावाजलं जात आहे. पारंपारिक वारकरी फड परंपरेची जोपासना करणारी नवी पिढी गावात तयार झाली आहे. आज गावात उच्चशिक्षित तरुणांचीही मोठी संख्या आहे. उद्योग, व्यवसाय, स्पर्धा परीक्षा, नोकरी, कृषी क्षेत्रात त्यांना विधायक संधी मिळवून देण्याची आवश्यकता आहे. इतकेच कायतर व्यसनापासून त्यांना दूर ठेवून संस्कारशील, सुज्ञ, संवेदनशील नागरिक म्हणून त्याला कसा आकार देता येईल, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. एकंदरीत, आपणा सर्वांना अभिमान वाटेल, असे गाव सर्वांनी मिळून घडविले पाहिजे...इतकीच अपेक्षा!

# शिव भोळा चक्रवर्ती। त्याचे पाय माझे चित्ती।।

श्रीमहादेवाचे वर्णन करताना संत एकनाथांनी आपल्या अभंग रचनेतून म्हटले आहे; शिव भोळा चक्रवर्ती। त्याचे पाय माझे चित्ती।। वाचे वदता शिवनाम। तया न बाधी क्रोधकाम।। धर्म अर्थ काम मोक्ष। शिवदेखता प्रत्यक्ष।। एका जनार्दनी शिव। निवारी कळी काळाचा भेव।। तामलवाडी गावचे ग्रामदैवत श्री विष्ण-महादेव हे एक जागृत देवस्थान असून, जो त्यांची मनोभावे भक्ती, सेवा करतो त्यांची मनोकामना तो पूर्ण करतो. हे मंदिर प्राचीन कालीन हेमाडपंथी असून, गाभार्यातील मुख्य दोन मूर्ती आहेत. एक चतुर्भुत विष्णूची मूर्ती तर पुढे मोठे शिवलिंग आहे. गाभार्या बाहेरील हेमाडपंती सभामंडपात दोन्ही बाजूला नागफणा असून, मध्यभागी मोठा दगडी नंदी आहे तसेच हेमाडपंथी सभा मंडपात चार आकर्षक असे दगडी खांब आहेत व त्यापुढे आता नवीन सभामंडप झालेला आहे. तामलवाडी व परिसरातील भाविक भक्त या देवाची खूप श्रद्धेने उपासना, दर्शन व नामस्मरण करतात व अनेक आपल्या प्रापंचिक जीवनातील अडीअडचणीतून मुक्त होतात. भगवान श्रीशंकर लवकर प्रसन्न होणारे दैवत असून, सर्वांची तो मनोकामना पूर्ण करतो याची प्रचिती गावातील अनेक भक्त मंडळींनी घेतली आहे म्हणून काही भक्तमंडळी आपल्या इच्छापूर्तीसाठी नवस बोलतात व यात्रेला आल्यानंतर हा नवस पूर्ण करतात.

भारतीय अध्यात्म विद्या सार्या विश्वाला सुख, आनंद, समाधान, तृप्ती आणि शांती याविषयीचा केवळ संदेशच नव्हे तर मार्गदर्शनपर विचार देत आले असून, प्रत्यक्ष अनुभूतीसाठी ती गुरुकृपांकित नामप्राप्तीचा स्मरणोपासनेने करावयाचा आसनसिद्ध साधन मार्ग सांगत आहे. अनेक संप्रदाय असूनही सर्वांचे ध्येय एकच ईश्वर दर्शन मिळणे हेच आहे.ते घडून यावे यासाठी पूजाविधी आणि ग्रंथ पारायण याद्वारे उपासनेचा एक सहज मार्ग ती सांगते आणि हीच भक्ती मार्गावरची पाऊलवाट आहे.

महाराष्ट्रीय संतांनी आपल्या ग्रंथरचनेतून ऐहिक जीवनाची समृद्धी आणि परमार्थिक जीवनातला सुखानंद विशद करीत आत्मबोधासह समाजाला भक्तिमार्ग सांगितला आहे. मानवी जीवन जगत असताना प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही विषयी माणसाला कर्तव्य आणि प्रयत्न याविषयीचा बोध त्यांनी केला आहे. गुरुकृपा अंकित नामाचे स्मरण करून सगुण व निर्गुण देवाचे दर्शन घडावे यासाठी भक्ती करीत राहणे हेच साधकाचे कर्तव्य ठरते. कारण त्याशिवाय सुख, आनंद, समाधान, तृप्ती आणि शांती ही परमार्थाची पंचपदी पूर्ण होत नाही म्हणून ज्ञानप्राप्ती व इच्छापूर्ती या दोन्हीसाठी ग्रंथ पारायण सेवा करावी हेच खरे. भारतामध्ये प्रामुख्याने शैव व वैष्णव असे दोन पंथ प्रामुख्याने आहेंत मात्र महाराष्ट्रात सर्वच संतांनी शिव आणि विष्णू एकच आहेत अशी ग्वाही दिलेली आहे. तुकोबारायांच्या अभंग रचनेतून सांगावयाचे झाल्यास हरी हरा भेद। नाही करू नये वाद।। एक एकाची हृदयी। गोडी साखरेच्या ठाई।। असे सांगितले आहे.



**अध्यात्म विशेष**

**हभप विनायक पाटील**

**श्रींच्या यात्रा कार्यक्रमाचे असे असते स्वरूप**

चैत्र शुद्ध एकादशी दिवशी देवाची पालखीतून दिंडी प्रदक्षिणा केली जाते व देव मंदिरात आणला जातो व त्यादिवशी रात्री कीर्तन सेवा केली जाते. चैत्र शुद्ध द्वादशी दिवसभर यात्रा; सायंकाळी कावड मिरवणूक. चैत्र शुद्ध त्रैयोदशी दिवसभर शेरण्या व नंतर कुस्ती व सायंकाळी मनोरंजनात्मक कार्यक्रम. चैत्रशुद्ध चतुर्दशीला मंदिरातून देवाची पालखी दिंडी प्रदक्षिणा करीत रात्रभर भजन असते. चैत्र शुद्ध पौर्णिमा पहाटे हनुमान मंदिरात पालखी येऊन सूर्योदयाला गुलालाचे कीर्तन होऊन यात्रेची सांगता महाप्रसाद होतो.

**समिती निर्मितीमुळे देवस्थान विकासाला गती येणार**

यावर्षी गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या शिखराचे काम पूर्ण झाले असून, लवकरच कळसारोहणाचा भव्य दिव्य कार्यक्रम होईल. आणखी या वर्षीची वैशिष्ट्ये गावाचे म्हणजे गावातील नव तरुणांनी शिवजन्मोत्सव निमित्त २५ वर्ष म्हणजेच रौप्य महोत्सवी वर्ष किल्ले रायगड ते तामलवाडी शिवज्योत आणून विक्रम केलेला आहे. आणखीन यावर्षी गावातील ग्रामस्थांच्या वतीने नवतरुणांचे त्र्यंबकेश्वर देवस्थान कमिटी स्थापन करण्यात आलेली आहे. यामुळे आता लवकरच या कमिटीच्या माध्यमातून देवस्थान विकास होईल, अशी सर्वांची अपेक्षा आहे.